
भटक्या-विमुक्तांचे अंतरंग

रामनाथ चव्हाण


म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3323



REFBK-0025893

17 FEB 1993


17 APR 1991



संदर्भ निबंध
3323
२५८९३
उ०पु०८९

भटक्या-विमुक्तांचे अंतरंग

रामनाथ नामदेव चव्हाण



सुगावा प्रकाशन, पुणे

भटक्या विमुक्तांचे अंतरंग

© सौ. शीला रामनाथ चव्हाण
नवी वसाहत, कात्रज
पुणे ४११ ०४६

प्रथमावृत्ती : जानेवारी १९८९

मूल्य : ३० रुपये

प्रकाशक
उषा वाघ
सुगावा प्रकाशन
८६१।१, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

मुद्रक
विलास वाघ
सुगावा मुद्रण
५१६, दत्तवाडी,
पुणे ४११०३०

मुद्रणस्थळ
रंगमुद्रा प्रिंटर्स
१६१६, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

उभं आयुष्य पाठीवर बांधून
वर्षानुवर्षं पोटासाठी भटकणाऱ्या
उपेक्षितांची कैफियत–
ज्यांनी
आपल्या झुंजार लेखणीतून पेरली
आणि–
ज्ञान-विज्ञानाच्या प्रेरणा स्वीकारून
'माणसा'च्या साहित्याची निर्मिती केली
त्या
लोकशाहीर आण्णाभाऊ साठे
यांना
कृतज्ञतापूर्वक
अर्पण

अनुक्रमणिका

भटकताना सात

भटकंतीची माणसे तेरा

भटक्या–विमुक्त जमाती

१) मेढंगी १
२) लमाण ५
३) ढवळा नंदीवाला ९
४) गोसावी १३
५) लवंगी गोसावी १७
६) नाथपंथी डवरी गोसावी २२
७) रावळ २६
८) भराडी गोंधळी ३०
९) कैकाडी ३४
१०) मातीवडार ३९
११) गाडी वडार ४३
१२) ओतारी ४८
१३) गाडीलोहार ५३
१४) कुंचीकोरवा ५७
१५) रायरंद ६२
१६) डोंबारी ६७
१७) वाघ्या मुरळी ७२
१८) मरीआईवाला ७५

मुस्लिम जमाती

१९) मदारी ८०
२०) दरवेशी ८४

महाराष्ट्राबाहेरील भटके

२१) सपेरेनाथ–	उ. प्रदेश	८८
२२) मारवाडी भाटी–	गुजराथ	९३
२३) रमय्या–	पंजाब	९७
२४) कठपुतलीवाला–	गुजराथ	१०१
२५) शबरी भिल्ल–	आंध्र (आदिवासी)	१०५

परिशिष्टे १०९

१) महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त जाती–जमातींची यादी
२) मुस्लिम धर्मीयांतील जाती आणि जमाती
३) भटक्या–विमुक्त जमाती आणि त्यांची दैवते
४) भटक्या–विमुक्तांचे सण
५) भटक्या–विमुक्तांची जातपंचायतीची बैठकींची गावे
६) भटक्या–विमुक्त जमातींची व्यवसायाप्रमाणे वर्गवारी

3323

भटक्यांच्या तांड्यावरून भटकताना

गेल्या काही वर्षांपासून भटक्या आणि विमुक्त जमातींच्या प्रश्नांची चर्चा महाराष्ट्रात चालू आहे. वेगवेगळ्या माध्यमांतून त्यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. सभा, सम्मेलने, मोर्चे आणि शोधयात्रा यांतून भटक्या विमुक्तांचं दुखणं प्रस्थापित समाजापर्यंत आणि शासनापर्यंत पोहचविण्याचे काम त्यांच्यातील कार्यकर्ती मंडळी करीत आहेत. परंतु अजूनही हवं तसं यश त्यांना मिळालेलं नाही. मात्र त्या निमित्ताने या समाजात होत असलेली जागृती ही त्यातल्या त्यात मोठी जमेची बाजू आहे असे मला वाटते.

कोणत्याही समाजांच्या प्रश्नांचा विचार करीत असताना त्यांच्या समाज-जीवनाकडे दुर्लक्ष करून चालत नाही. त्यांचे अनेक प्रश्न हे त्यांच्या जनजीवनाशी निगडीत असतात. म्हणून किमान त्यांच्या जगण्याची ओळख होणे आवश्यक वाटते.

पिढ्यान् पिढ्या ज्यांच्या वाट्याला केवळ उपेक्षाच आली, वेशीच्या आत किंवा वेशीबाहेरही ज्यांना स्थान मिळाले नाही, किंबहुना उपरेपणाचे, दुर्लक्षित व अस्थिर जीवन ज्यांच्या वाट्याला आले किंवा गुन्हेगार जमात म्हणून ज्यांना समाज-प्रवाहापासून दूर ठेवण्यात आले आणि ज्यांचे जगणे–मरणेच गुन्हा ठरविण्यात आले, अशा भटक्या आणि विमुक्तांच्या जनजीवनाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तकाच्या निमित्ताने मी केलेला आहे. त्यांची संस्कृती, रूढी-परंपरा, चालीरीती, देवदेवता, उत्सव, सणवार, त्यांची भाषा, पेहराव, दागदागिने, व्यवसाय, कला आणि त्यांची जातपंचायत यांची किमान ओळख वाचकांना व्हावी आणि त्यांच्या प्रश्नांचे व समस्यांचे स्वरूप, काही प्रमाणात का होईना, लक्षात यावे हाच हे पुस्तक लिहिण्यामागील माझा उद्देश आहे.

महाराष्ट्रात एकूण ४२ भटक्या–विमुक्त जमाती आहेत. त्यांपैकी २८ भटक्या आणि १४ विमुक्त आहेत. या ४२ जमातींच्या पोटजातींची संख्या २०० पर्यंत आहे. त्यामध्ये संस्कृतीने, रूढीपरंपरेने, भाषेने, व्यवसायाने, भौगोलिक कारणाने आणि स्वतःहून वेगळेपण स्वीकारलेले असे भटक्यांचे तांडे पहावयास मिळतात. हे तांडे गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात आणि शहरात उपजीविकेच्या निमित्ताने भटकत आहेत. त्यांमध्ये शिकार करून उपजीविका करणारे,

जनावरे पाळून त्यांची खरेदी–विक्री करणारे, पारंपरिक कलेच्या आधारे लोकांचे मनोरंजन करून जगणारे, हस्तरेषा–भविष्य सांगणारे, देवाच्या नावाने भिक्षुकी करणारे, घरोघर भिक्षा मागून जगणारे, धार्मिक विधी-कार्ये करणारे आणि कष्टाची कामे करून उपजीविका करणाऱ्या भटक्या-विमुक्त जातींचा समावेश आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात, विशेषतः इंग्रज राजवटीमध्ये, छोट्या मोठ्या चोऱ्या करणाऱ्या किंवा इंग्रजी सत्ता उलथून टाकण्याचा गुप्तपणे प्रयत्न करणाऱ्या, आणि सतत बंडाळी करणाऱ्या काही जमाती गुन्हेगार जमाती म्हणून इंग्रज सरकारने त्या काळात बंदिस्त केलेल्या होत्या. या जमातींचा बंदोबस्त करण्यासाठी १८७१ साली इंग्रजांनी या देशात गुन्हेगारी कायदा निर्माण केला होता. तो कायदा तब्बल ८१ वर्षे अस्तित्वात होता. या कायद्याखाली इंग्रज सरकारने १९८ जमाती देशातील गुन्हेगार जमाती म्हणून जाहीर केलेल्या होत्या. या गुन्हेगार जमातींना तीन तारेच्या कुंपणात ८१ वर्षे डांबण्यात आलेलं होतं. अशा प्रकारचे माणसांचे तुरुंग, त्यांना त्या काळात 'सेटलमेंट' असे म्हटले जात असे, अशी एकूण ५२ सेटलमेंट वेगवेगळ्या राज्यांत निर्माण करण्यात आलेली होती- स्वातंत्र्यानंतर १९५२ साली- भारत सरकारने इंग्रजांनी अंमलात आणलेला गुन्हेगारी कायदा रद्द केला आणि तीन तारेच्या कुंपणात बंदिस्त केलेल्या १९८ जमाती विमुक्त करण्यात आल्या. त्या जमातींनाच स्वातंत्र्योत्तर काळात 'विमुक्त जमाती' या नावाने ओळखले जाते.

अशा या भटक्या आणि विमुक्त जमातींच्या जनजीवनाचा परिचय करून देण्याच्या निमित्ताने किंवा त्यांची माहिती गोळा करण्याच्या निमित्ताने त्यांच्या अधिक जवळ जाता आले आणि त्यांच्या अंतरंगाचा जवळून परिचय करून घेता आला. त्यांच्या जगण्याचा, व्यवसायांचा, भाषेचा राहाणीमानाचा, देवदेवतांचा आणि सणावारांचा, परिचय करून देणे शक्य झाले. अर्थात अशा तऱ्हेचा परिचय करून देत असताना त्यांच्या वस्त्यांवर, पालांवर, तांड्यांवर, वेळप्रसंगी रस्त्यावर बसून त्यांना भेटून, त्यांच्या समाजाची माहिती, त्या त्या जमातींच्या लोकांच्या तोंडून, घ्यावी लागली. अर्थात हे काम करत असताना अनेक स्वभावांचे, वेगवेगळ्या भाषेचे आणि व्यवसायाचे भटके लोक भेटले. खरे तर अशा अपरिचित, भटक्या समाजाचा शोध घेणे, त्यांच्याशी बोलणे किंवा त्यांची माहिती घेणे तसे कठीणच होते. एकतर ही मंडळी प्रस्थापित समाजप्रवाहातून दूर फेकलेली, पोटासाठी सतत भटकणारी, विचित्र पेहरावातली. अज्ञानी, अशिक्षित आणि दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणारी. त्यामुळे त्यांची ओळख काढणे आणि प्रत्यक्ष त्यांच्याशी बोलणे तितकेसे सहज घडणारे नव्हते. ज्या ज्या वेळेला मी त्यांच्या पालावर किंवा तांड्यावर गेलो त्या त्या वेळेला मी कोणीतरी पोलिसचा आदमी असावा असाच त्यांचा समज होत असे. त्यामुळे ते लोक एकतर माझ्याशी बोलत नसत, बोलण्याचा अधिक आग्रह धरलाच तर सरळ टाळाटाळ करीत असत. त्यामुळे अनेकवेळा तांड्यावर जाऊनही काही जमातींची माहिती मिळू शकली नाही. त्याची इतरही अनेक

कारणे त्यावेळी जाणवली. विशेषतः गेली कित्येक वर्षे त्यांना समाजाने आपल्यात सामावून घेण्याचा प्रयत्न केलेला नाही, भटके विमुक्त म्हणजे कोणीतरी भिकारी, उचले, भामटे किंवा परके, परदेशी आहेत असेच समजून समाज त्यांच्याशी वागलेला आहे. त्यांना आपल्यात सामावून घेण्याचा किंवा त्यांना समजून घेण्याचा आपण कधी प्रयत्न केलेला नाही. किंबहुना परकेपणाचीच भावना त्यांच्या मनात सातत्याने रुजविण्यात आली. त्यामुळे या लोकांच्या स्वभावाची जडण घडण तशा तऱ्हेची झाली आहे, समाजप्रवाहातून दूर गेल्याने त्यांनी स्वतःची वेगळी संस्कृती निर्माण केली, उपजीविकेची साधने शोधली, वेगळ्या प्रवाहातलं जगणं-मरणं स्वीकारलं. आजही ते समाजप्रवाहापासून वेगळे म्हणूनच जगत आहेत, वेगळेपणातच आनंद घेत आहेत. वेगळ्या सणावारांत आणि देवदेवतांच्या विचित्र फेऱ्यात त्यांनी स्वतःला बंदिस्त केलेले आहे.

गेली तीन वर्षे सतत भटक्या-विमुक्तांच्या पालांवर-तांडयांवर फिरत असताना त्यांच्या समस्या, अडीअडचणी, त्यांची अवस्था जवळून पहाता आली, त्यांच्या बदलत्या समाजजीवनाचा जवळून वेध घेता आला. पालावर, तांड्यावर फिरत असताना मी जे अनुभवले ते असे–

१) भटक्या जाती-जमातींना आपल्या भूतकाळाविषयी प्रचंड अभिमान आहे. भूतकाळात जगण्याचे त्यांचे आजही प्रयत्न चालू आहेत. २) इतर जाती-जमातींपेक्षा आपण वेगळे आहोत, किंबहुना श्रेष्ठ आहोत, अशी प्रत्येक जमातीतील व्यक्तींची भावना आहे. विशेषतः भटक्यांच्या मुख्य जातींत आणि त्यांच्या पोटजातींत उच्च-नीचतेचे तणाव कायम आहेत. ३) पूर्वास्पृश्य जातींना आजही अस्पृश्य समजण्याची भावना भटक्या जमातींत तीव्र आहे. (मांग, महार आमच्या पालाला शिवला तर आम्ही ते पाल वाळीत टाकतो, असे मुलाखतीच्या वेळी अनेक भटक्या जमातीतील लोकांनी सांगितले.) ४) स्वजातीचे पारंपरिक पीळ मोडायला लोक तयार नाहीत. ५) पारंपरिक जातपंचायतीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी जुन्या मंडळींची सतत धडपड चालू आहे. आजही, जातपंचायतीचे पारंपरिक अलिखित कायदे वापरले जातात, शिक्षा केल्या जातात. ६) पारंपरिक देवदेवता आणि श्रद्धा जपण्याचे प्रयत्न केले जातात. ७) प्रत्येक जातीच्या जातपंचायतीला त्या त्या जमातीतील जाणकार कार्यकर्ते धावरतात, जातपंचायतीचा कायदा मोडायला सहसा तयार होत नाहीत. ८) तरुण मंडळी वाईट रूढी-परंपरेच्या विरोधात उभे राहाण्याचा प्रयत्न करीत आहेत, पण त्यांना तितकेसे यश येत नाही. ९) आडनावावरून जातजमात कळते म्हणून काही-भटके लोक आडनावे बदलून वावरत आहेत. १०) जातिअंतर्गत नेतृत्वासाठी आपापसात टोकाचा तणाव आहे. ११) जाती–जमातीतील समाज एकसंध नाही, तो गटागटाने विखुरलेला आहे १२) मुख्य जातीत आणि त्यांच्या पोटजातींत बेटीव्यवहार होत नाही. १३) भटक्या जाती-जमातीतील थोडीफार आर्थिक सुधारणा झालेले लोक समाजापासून दूर गेलेले

आहेत, ते समाजात मिसळत नाहीत. १४) भटके जीवन जगण्यातच आनंद मानणाऱ्या काही जमाती आहेत. देवाच्या कृपेनेच हे जीवन मिळाले अशी त्यांची धारणा आहे. १५) पारंपरिक व्यवसाय सोडायला लोक तयार नाहीत. १६) देव-देव्हारे, उपासतापास आणि अंधश्रद्धा जोपासण्याकडे बहुतेकांचा कल आहे. अंधश्रद्धेचा प्रचंड पगडा आहे. १७) भटक्या विमुक्तांची खास बोली किंवा सांकेतिक भाषा टिकविण्याची सतत धडपड चालू आहे. १८) काळाप्रमाणे बदलण्याची तयारी नाही. १९) जातीची खोटी प्रमाणपत्रं घेऊन सरकारी सवलती घेण्याचे प्रयत्न भटके-विमुक्तेतर जातीतील काही मंडळी करीत आहेत. २०) पूर्वीची गुन्हेगारी प्रवृत्ती आजही काही प्रमाणात टिकून आहे. २१) स्त्रियांना भटक्या समाजात स्थान नाही, चूल आणि मूल यापलिकडे त्यांना किंमत नाही. २२) एकाच जातीच्या लोकांना आपल्या इतर पोटजातींविषयी माहिती नाही. २३) प्रस्थापित समाजात मिसळण्याचा किंवा संपर्क ठेवण्याचा प्रयत्न केला जात नाही, आपली जमात आणि आपण हेच मर्यादित क्षेत्र. २४) स्वतःबद्दल अपराधी भावना आजही कायम आहे. वेगळेपणातच आनंद मानणाऱ्या काही जमाती आहेत. २५) टोळ्यांनी फिरणारे भटके आहेत, तसे एकेकटयांनी भटकणारेही भटके आहेत.

त्यांच्या आजच्या अडचणी

१) प्रस्थापित समाज भटक्यांच्याकडे दुराव्याने किंवा परकेपणाने व पारंपरिक दृष्टीने आजही पहातो आहे, परकेपणाची भावना कायम असल्याने प्रस्थापित आणि भटका यांच्यात संवाद घडणे कठीण झाले आहे. २) स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी गुन्हेगार म्हणून नोंद केलेल्या जमातींकडे स्वातंत्र्योत्तर काळातही गुन्हेगार म्हणूनच पाहिले जात आहे. ३) इतर समाज भटक्यांना सहजासहजी सामावून घेत नाही असे आढळले. ४) सतत भटकंतीमुळे आणि अस्थिर जीवनामुळे जातीचे दाखले मिळत नाहीत. ५) इच्छा असूनही काही जमातींना बँका धंद्यासाठी कर्ज देत नाहीत (जातीच्या दाखल्याची मुख्य अडचण). ६) समाजातील शिक्षित वर्ग समाजासाठी काहीही करीत नाही अशी अनेकांनी तक्रार केली. ७) सर्व भटक्या-विमुक्तांना योग्य मार्गदर्शन करेल किंवा त्यांच्यात सुधारणा घडवून आणेल असे आज तरी समर्थ नेतृत्व नाही. भटक्या समाजातील जी कार्यकर्ती मंडळी आहे त्यांच्यात नेतृत्वासाठी आपापसात मतभेद आहेत, त्यामुळे समाजाचे प्रश्न सुटणे अवघड होत आहे. ८) व्यवसायांच्या आधुनिकीकरणामुळे आणि कारखानदारीमुळे पारंपरिक कुटीर उद्योगांना वाव नाही. ९) स्वतःच्या मालकीची शेती नाही, नाव सांगायला कायमचा गाव नाही, त्यामुळे कायमचा निवारा नाही, स्थिर जीवन नाही. १०) उपजीविकेसाठी सततच्या भटकंतीमुळे शिक्षण नाही. त्यामुळे अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य कायम आहेत. मुख्यत: शिक्षणापासून भटका समाज वंचित राहिल्याने विकासाचे मार्ग अडचणीचे झालेले आहेत.

गेल्या काही वर्षातील बदल

१) उपजीविकेसाठी भटकंतीचे प्रमाण कमी कमी होत आहे. २) शहराच्या आश्रयाने कायम वस्ती करून लोक राहात आहेत. ३) शिक्षणाचा प्रसार काही प्रमाणात होऊ लागलेला आहे. ४) राजकारण आणि समाजकारणात तरुण वर्ग रस घेतो आहे, राजकारणात प्रतिनिधित्व मिळत आहे. ५) समाजसुधारणेसाठी सामाजिक संघटन करण्याची वृत्ती वाढत आहे. ६) सामाजिक संस्था निर्माण होत आहेत. सामाजिक जागृतीच्या दृष्टीने प्रयत्न होत आहेत. ७) सरकारी नोकरीत काहींना सहभाग मिळतो आहे, तसे प्रयत्न चालू आहेत. ८) खाजगी व्यवसाय करण्याकडे लोकांचा कल आहे. ९) भटक्यांच्या गृहरचना सोसायटच्या निर्माण होत आहेत. १०) तरुण पिढी परिवर्तनाच्या दिशेने प्रयत्न करीत आहे. ११) अन्याय अत्याचाराची जाणीव त्यांना होत आहे. अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याचे प्रयत्न चालू आहेत. १२) राहणीमान, आवडीनिवडी बदलत आहेत. शहरी समाजाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. १३) समाजातील शिकलेले, जाणकार लोक सरकारी सवलतींचा फायदा घेत आहेत. (मात्र त्यांचे प्रमाण अल्प आहे.) १४) आंतरजातीय विवाह करण्याचे प्रयत्न होत आहेत. १५) भटक्यांना आपल्या अस्तित्वाची जाण येऊ लागलेली आहे, आपल्या हक्कांविषयी तरुण शिक्षितवर्ग बोलतो आहे, संघटित होण्याचा प्रयत्न करीत आहे. बदलत्या काळाचं भान भटक्या विमुक्तांना येऊ लागलेलं आहे.

या ठिकाणी मी नम्रपणे नमूद करू इच्छितो की, समाजशास्त्रीय संशोधनाच्या दृष्टिकोणातून हे पुस्तक लिहिलेले नाही. एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून, केवळ मुलाखतीद्वारा, भटक्या विमुक्तांची जी परिस्थिती मला जाणवली ती येथे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझ्या मर्यादा लक्षात घेऊनच वाचकांनी या पुस्तकाकडे पहावे.

भटक्या-विमुक्त जमातींचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना व कार्यकर्त्यांना प्राथमिक माहिती म्हणून जरी या पुस्तकाचा उपयोग झाला तरी हे पुस्तक लिहिण्यामागील माझा हेतू साध्य झाला असे मी समजेन. प्रस्तुत पुस्तकाबाबत काही सूचना असल्यास वा काही उणिवा आढळल्यास जिज्ञासू वाचकांनी याबाबत कृपया जरूर कळवावे. मी त्यांच्या सूचनांचा आदरच करीन.

या पुस्तकाच्या निमित्ताने अनेकांचे सहकार्य लाभले आहे. प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केलेले भटक्या-विमुक्त जमातींचे सर्व लेख पुण्याच्या दै. तरुण भारतातून (फेब्रु. १९८७ ते जानें. १९८८ या काळात) 'आज इथं, उद्या तिथं' या सदरात प्रसिद्ध झालेले आहेत. तरुण भारतने या कामी खूपच मोलाचे सहकार्य दिले. विशेषतः त. भा. चे माजी संपादक श्री. चित्तरंजन पंडित, सध्याचे संपादक श्री. मनो-

हर कुलकर्णी आणि कार्यकारी संपादक श्री. बाळ भिडे यांनी हे लेख प्रसिद्ध करून अत्यंत चांगल्या प्रकारे सहकार्य दिले. त्यांचे आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते व माझे सहकारी मित्र श्री. सुरेश ओहाळ व श्री. अजय चांदणे यांनी या निमित्ताने खूप मोलाचे सहकार्य दिले आहे. ज्या ज्या वेळी मी त्यांच्याकडे गेलो त्या त्या वेळी त्यांनी, स्वत:ची कामे बाजूला ठेवून, भटक्या–विमुक्तांच्या मुलाखती घेण्यासाठी माझ्याबरोबर भटकंती केलेली आहे. त्यांची साथ विसरणे केवळ अशक्य आहे.

भटक्या–विमुक्त चळवळीतील प्रसिद्ध कार्यकर्ते श्री. शिवलाल जाधव, शिदू शिंदे, विलास वाडेकर, मुसळे गुरुजी, लक्ष्मण लोखंडे यांनी काही भटक्या समाजांतील लोक मुलाखतीचे वेळी बोलते केले, त्यामुळे मी अधिक लिहू शकलो.

माथाडी कामगार मंडळाचे सचिव श्री. वि. स. क्षीरसागर, म. न. पा. सदस्य सुरेश जाधव, मा. हिरामण जाधव, ॲड. बबनराव साळवे, डी. डी. पवारसर, हरी नरके, ज्ञानेश्वर भोसले, वसंत जगताप, दीपक वाघमारे, संपत जाधव, नवरंग रांजणे मास्तर, भीमराव शिरवाळे, अभय कांबळे, फुलचंद शेळके, संभाजी मोरे, प्रभाकर ओहाळ, सेवानंद कडाळे आणि तरुण भारतचे श्रीकांत कुलकर्णी, मोरेश्वर जोशी, कृष्णा देशपांडे यांनी अतिशय मोलाचं सहकार्य दिलं, त्यांचा मी आभारी आहे.

विशेषत: दूरदर्शनच्या माध्यमातून प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केलेल्या काही भटक्या जमातींच्या जनजीवनाचा परिचय करून देण्याची संधी मुंबई दूरदर्शनचे सहाय्यक केंद्रनिदेशक मा. व्ही. एच. भामरे यांनी दिली आणि प्रत्यक्ष कार्यक्रम सादर करण्याच्या दृष्टीने श्रीमती शीला जुन्नरकर (सहनिर्माती) यांनी जे सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

महाराष्ट्रातील लोकसाहित्याच्या थोर अभ्यासक आणि प्रसिद्ध मराठी साहित्यिक आदरणीय डॉ. सरोजिनी बाबर यांनी, तब्बेत बरी नसतानासुद्धा, केवळ स्वत:च्या आवडीचा आणि अभ्यासाचा विषय म्हणून अल्पावधीत या पुस्तकाला अत्यंत बोलकी प्रस्तावना लिहून भटक्या विमुक्ताचे अंतरंग अधिक स्पष्ट केले, त्यांचा मी ऋणी आहे.

समाजप्रबोधनाच्या चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुगावा मासिकाचे संपादक प्रा. विलास वाघ, उषा वाघ यांनी या पुस्तकाच्या संबंधी काही मौलिक सूचना करून भटक्या विमुक्तांचे अंतरंग पुस्तकरूपाने प्रकाशित केले, त्यांचा मी आभारी आहे.

जानेवारी १९८९ **रामनाथ नामदेव चव्हाण**

नवी वसाहत
कात्रज, पुणे ४११०४६

भटकंतीची माणसे

माझ्या लहानपणी एका गोष्टीचं मला भारी कुतूहल असायचं. कुठल्यातरी गावाशिवाला घरच्या लोकांसंगं निघालं म्हणजे हमखास वाटेत काही मंडळी मागं-पुढं तरंगत अशी गावाला निघालेली दिसायची. त्यात काखेला लहानगं न् डोईवर गच्च भरलेली दांडगी पाटी घेतलेली बाई गाढवाला काठीनं ढुश्शा देताना दिसायची. तिच्या मागं–पुढं एवढंसं–तेवढंसं सामान घेऊन खेळत खेळत बिनचप्पलची पोरं अनवाणी जाताना त्यांच्या अंगावर खंडीभर धुरळा बसलेला दिसायचा. त्यांच्या आगंमागं घातल्या पालाचं ओझं लादलेलं गाढव कसंतरी रेटत पुढं सरकताना दिसायचं. पुढं एकादा दुसरा पुरुष माणूस ओझ्याचं सामान घेऊन वाटेनं निघालेला दिसायचा. खांद्यावर लांबड्या काठ्या न् हातात बोचकं घेऊन तो जायचा. तर हे पाहिलं की मी माझ्या वडिलांना विचारायची, 'ही माणसं कुणाची, कोण आहेत? आणि अशी चाललीत तरी कुठं ?' तशी माझे वडील सांगायचे, 'हे भटके लोक आहेत. त्यांचं रहायचं असं आपल्यासारखं गाव नसतं. मिळालं काम संपलं की, वाट फुटेल तिकडं ते जातात. त्यांची अशी अखंड भ्रमंती– भटकंती चालू असते. त्यांचं सामानसुमान एवढंच. बिऱ्हाडातली माणसं ही एवढीच. कुठंही जावं, मिळेल ते काम करावं, पदरी पडेल ते घ्यावं न पुढच्या वाटेला लागावं हेच त्यांचं आयुष्य. ह्या भटक्या जमाती. त्यांची त्यांना चालरीत असते. देवदेव असतो. सणवार असतो. कधीमधी जत्रेयात्रेत ते एकमेकांना भेटतात.'

मला त्यावेळी त्यातलं नीट कळायचं नाही. पण समजुतीचं वय झाल्यावर थोडा थोडा उमग पडत गेला न मग आणखीनच अशा लोकांबद्दलची उत्सुकता वाढत गेली. ह्या लोकांची माहिती आपण करून घ्यायला पाहिजे असं वाटू लागलं. एवढ्याशा तेवढ्याशा वाडविस्तारावर ह्यांचं चालतं कसं, गावोगाव फिरत रहात ह्यांचं भागतं तरी कसं, या संबंधीची माहिती मिळावी म्हणून मी कुणा-कुणाला सांगायची, 'जमलं तर बघा न् मला कळवा.'

पण खरं सांगायचं म्हणजे त्यातलं कधीच काही म्हणावं तसं जुळून आलंच नाही !

होता होता एक दिवस 'तरुण भारत' च्या अंकात 'आज इथं तर उद्या तिथं' या शीर्षकाखाली श्री. रामनाथ चव्हाण यांचं एक नवीन सदर सुरू झाल्याचं

लक्षात आलं न मग खरंच ब्रह्मानंदी टाळी लागावी तशातली गत होऊन बसली. भटक्या जमातीमधल्या एकेका जमातीबद्दलची, थोडीशी का होईना, माहिती श्री. चव्हाण सांगीत गेले न् आम्ही ती आधाशासारखी वाचीत सुटलो.

असलं लेखन मोठ्या कष्टाचं. संशोधनात्मक. गावोगाव फिरायला लावणारं. पदरमोडीनं चालणारं. कुणाच्या तरी ओळखीनं, एक सोडून दहा खेटे घालायला लावीत कामाला जुंपणारं.

लोकसाहित्य गोळा करायचा मला नाद. तसा मला यातला भरपूर अनुभव. त्यामुळं या लेखनाबद्दलचं कुतूहल माझ्या ठायी निर्माण झालेलं. तशी ही माणसं कशी रहात असतील, कोणता विचार धारण करीत असतील यासंबंधी कुतूहलापोटी अधाशीपणानं मी श्री. चव्हाणांचे लेख वाचले आहेत.

ज्यांना आपल्या भाषेविषयी, संस्कृतीविषयी आणि वाडवडिलांच्या कुळाचारांविषयी अपार आदर आहे अशी ही भटकंतीतली मंडळी पैशाअडक्यानं दरिद्री असली न् शिक्षणापासून वंचित झालेली असली तरी अपार श्रद्धेच्या बळावर त्यांनी आपली पारंपरिक कला सांभाळलेली आहे हे या लेखनावरून स्पष्टपणे लक्षात येतं. त्याचप्रमाणं आपल्या आयुष्यात सदैव कष्टकरी म्हणून जगत आलेल्यां या लोकांच्या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनं वागण्याला मनाई असली तरीही त्यांनी मला अमूक नाही किंवा तमूक पाहिजे अशी धडपड केलेलीही इथं आढळून येत नाही. त्या कारणानं आपल्यापेक्षा या मंडळीचं जग खास वेगळं आहे यातली चुणूक या लोकांचा परिचय होत असताना जाणवल्याखेरीज रहात नाही.

समाजशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या लोकांना, संशोधकांना अगर विचारवंतांना या विविध प्रकारच्या भटक्या जमातीतील चालीरीती पुष्कळसं काही सहज सांगून जातात. म्हणून या लेखनाचा बारकाईनं विचार करीत असताना काही प्रसंग असे लक्षात येतात की, तिथं आपली अक्कल एकदम थंडावून जाते. या संदर्भात उदाहरणच द्यावयाचं झालं तर लमाणाच्या एका स्त्रीनं आपल्या अंगावर गोंदलेल्या विविध सजावटीबद्दल विचारलं असता दिलेलं उत्तर चक्रावून सोडणारं आहे. वास्तविक अंगावरचं ठायीठायी आढळून येणारं गोंदण ही एक सुशोभनाची गोष्ट म्हणून आम्ही लक्षात घेतलेली. आमच्या सारख्यांच्या कपाळावर अगर हनुवटीवर जेव्हा आडवी रेघ, चंद्रकोर आणि टिकली गोंदण्यात येते तेव्हा ती एकपरीची निसर्गपूजा मानली जाते. चंद्रसूर्यांचे सान्निध्य आणि आडवी रेघ म्हणजे गव्हाचं समृद्धी देणारं प्रतीक असा त्याचा अर्थ लावण्यात येतो. हातावर पाळणा गोंदला गेला तर तो कृष्णदेवाचा मानण्यात येतो आणिक झाडं गोंदली तर तो ऊसमळा, पानमळा समजला जातो. म्हणजे या गोष्टी वैभवाच्या खाणाखुणा देणाऱ्या ठरतात. पण जेव्हा का लमाणांची स्त्री आपलं सौंदर्य कमी व्हावं, आपण जास्तीच कुरूप दिसाव्यात आणि पुरुषांची वाकडी नजर आपल्यावर ठरू नये म्हणून अधिकाधिक गोंदून घेतलं जातं असं सांगते तेव्हा, तिच्या दृष्टीनं जरी ते एकवेळ खरं मानलं तरी,

आम्हाला मात्र ते पटत नाही न् मग आम्ही विचारांच्या चक्रात गोवले जातो!

स्त्री-मुक्तीच्या सध्याच्या चळवळीच्या संदर्भात या भटक्या जमातींमधील स्त्रियांची ही कल्पना जरी मान्य होण्यासारखी नसली तरी मातीवडार समाजातील हुंडा न घेण्याच्या प्रथेचे मात्र उल्लेखनीय स्वागत होईल. तसेच या समाजात विवाहाचे वेळी मुलाच्या वडिलाने एक हजार एक्कावन्न रुपये मुलीच्या वडिलांना लग्नखर्चासाठी म्हणून देण्याची पारंपरिक रीत एकदम नाविन्यपूर्ण वाटेल.

बालविवाहाची प्रथा मोडत चालली असताना आणि कायद्याने अशा विवाहांना बंदी घातली जात असताना नाथपंथी डवरी गोसावी समाजात जेव्हा गरोदर स्त्रीच्या पोटाला कुंकू लावून लग्न ठरविले जाते ही कल्पना कमालीची आश्चर्यकारक ठरेल यात शंका नाही.

वडार समाजातील स्त्रिया चोळी घालीत नाहीत. तर माझी कल्पना की कामाच्या धबडग्यात चोळचा फार फाटतील या भीतीनं अशी प्रथा पडली असावी! पण श्री. चव्हाणांनी 'गाडीवडार' समाजाची हकीकत सांगताना दिलेली सीतेच्या वनवासातील कथा वाचल्यानंतर मात्र ही माणसं रूढीनं, परंपरेनं, अंधश्रद्धेनं किती गुरफटलेली आहेत याची कल्पना येते.

अंगणातील शिळेवर बसून सीतेने वनवासात असताना केलेली उघड्यावरील आंघोळ एक वडाऱ्यानं चोरून पाहिली तेव्हा त्या शिळेचा मोह अनावर होऊन सीता तिथून गेल्यानंतर शस्त्रानं प्रहार करीत त्याने तिचे दोन तुकडे केले व ते तो घेऊन गेला. हे कळताक्षणीच सीतेनं त्याला शाप दिला की, 'मी आंघोळ करताना तू मला चोरून पाहिलेस. तर लक्षात ठेव की, तुझ्या पुढच्या पिढीतील स्त्रिया चोळीशिवाय समाजात वावरतील!'

ही कथा ऐकायला तशी ठीक असली तरी तिच्या मागची कारणमीमांसा मात्र एकदम बोळीभावडी आहे!

कसरतीची कामं करून लोकांचं मनोरंजन करणाऱ्या डोंबारी लोकांचे खेळ लहानपणापासून आम्ही पहात आलो आहोत. त्यामुळं ही माणसं शारीरिक दृष्टचा सुदृढ आणि चपळ आहेत यापलिकडे त्यांच्याबद्दल फारशी कल्पना नसायची. पण जेव्हा का श्री. चव्हाण यांचा 'डोंबारी समाज' हा लेख मी वाचला तेव्हा लक्षात आलं की हे लोक काही काही बाबतीत फारच कडक आहेत! विशेषत: ही मंडळी त्यांच्याच समाजातील एखादी स्त्री त्यांच्यापैकी कुणी पुरुषानं पळवून नेली तर तो सर्वांत मोठा असा सामाजिक गुन्हा मानतात! म्हणून अशा माणसाला समाजाच्या पंचायतीसमोर खांबाला किंवा झाडाच्या बुंध्याला गच्च बांधून सोट्यानं बडवून काढलं जातं! म्हणजे अगदी कठोर अशी शिक्षा अमलात येऊन एकूणच नीतिनियमांचा वचक बसवला जातो असं या वर्णनावरून दिसून येतं.

या पुस्तकातील अशी समाजरचनेतील जगावेगळी वाटणारी कितीतरी उदाहरणं इथं देता येतील. पण प्रत्यक्षातच सगळं वाचण्यात जी मजा आहे तिच्या-

पासून वंचित होण्यापेक्षा इथंच थांबलेलं बरं म्हणून मी वाचकांना विनंती करीन की, मुळातूनच हे पुस्तक त्यांनी वाचावं, म्हणजे जग काय आहे, कसं आहे, इ. त्यातला बारकावा त्यांच्या लक्षात येईल. समाज सुधारण्याच्या संदर्भात काम करणारांना हे पुस्तक पुष्कळच काही सांगून जाईल असं मी म्हणेन.

मात्र असं असूनही, एक गोष्ट खरी की, श्री. चव्हाण यांनी केलेला हा एक लहानसा प्रयत्न आहे. भटक्या जमातींची ही तोंडओळख होईल. म्हणून संशोधकांनी यापेक्षाही अधिक परिश्रम घेऊन या लोकांची सविस्तर माहिती मिळविली पाहिजे व ती लोकांसमोर ठेवली पाहिजे. समाजबांधणीच्या दृष्टीनं ते अत्यावश्यक आहे.

श्री. रामनाथ चव्हाण ह्यांनी मोठ्या हौसेनं आणि उमेदीनं आज इथं तर उद्या तिथं भटकंती करणारांशी जवळीक साधून, त्यांच्या हाती जे येऊ शकलं ते इथं मांडलं आहे. तथापि त्यांनी अजूनही खोलात जाऊन या संदर्भात संशोधन केलं पाहिजे असं मला वाटतं. शक्यतोवर त्यांचं लोकसाहित्य त्यांनी जरूर मिळवावं म्हणजे आणखीन् खूपसं हाती येईल.

मला माहीत आहे की, हे काम तसं फार कष्टाचं, भ्रमंतीचं तसेच वेळखाऊ काम आहे. पदरमोडीनं जिकीरीला आणणारंही आहे. पण कुणीतरी ते केलं पाहिजे यात शंका नाही. श्री. चव्हाणांना ती आवड असल्यामुळं त्याच्या कार्याला मी उदंड यश चिंतिते.

– सरोजिनी बाबर

मकर संक्रांत
पुणे
१४-१-८९

१. मेढंगी

ज्योतिष भविष्य सांगून परंपरेने उपजीविका करणारी भटकी जमात म्हणून 'मेढंगी' या समाजाला ओळखले जाते. विशेषत: महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात मेढंगी लोक हस्तरेषा, भविष्य सांगणारे 'ज्योतिषी' किंवा 'मनकवडे' म्हणूनही ओळखले जातात. मेढंग्यांना 'मेढंगी जोशी' या नावानेही ओळखले जाते. व्यक्तीची चेहरेपट्टी पाहून किंवा हातावरच्या रेषा पाहून त्या व्यक्तीच्या भावी काळात काय घडणार आहे, किंवा भूतकाळात कोणत्या घटना घडल्या याचे ठराविक आडाखे मेढंगी लोक अत्यंत कौशल्याने भविष्य पाहणाऱ्या व्यक्तीस पटवून देतात, त्यामुळे साहजिकच खेड्यापाड्यातील लोक त्यांच्यावर विश्वास ठेवून धान्य, पैसे किंवा जुने कपडे त्यांना देतात, त्यावरच ते आपली उपजीविका करीत असतात.

विशेषत: सुगीच्या हंगामात मेढंगी मंडळी आपलं भविष्य कथन करण्याचे बाड काखोटीला मारून शेतकऱ्यांच्या खळ्यावर 'भविष्य पाहणार, ज्योतिष सांगणार' असे ओरडत फिरतात. कधीकाळी या मंडळीने सांगितलेले भविष्य चुकून खरे होते आणि लोक त्यांच्यावर विश्वास ठेवतात. धान्याच्या राशी पासून ते स्वत:च्या अंतापर्यंत त्यांच्याकडून भविष्य कथन करून घेतात आणि हे लोकसुद्धा समोरच्या व्यक्तीच्या स्वभावावरून आणि स्वत:च्या विशिष्ट बोलीच्या ढंगाद्वारे आपली छाप पाडण्यात अत्यंत चलाख, हुशार आणि प्रसंगानुरूप वागणारे, हजरजवाबी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या भविष्य सांगण्याच्या विशिष्ट कलेवरून 'लोकज्योतिषी' ही पदवी ग्रामीण भागातील लोकांमध्ये त्यांना रूढ झाली आहे.

महाराष्ट्रात अशा प्रकारच्या ज्योतिष सांगणाऱ्या अनेक भटक्या जमाती आहेत. कोणी पोपटाच्या सहाय्याने भविष्य सांगतो, कोणी पंचांग घेऊन घरोघर फिरत असतो, तर कोणी भाळी पुराण घेऊन त्याच्या आधारे भविष्य सांगतो, तर काही जण, तंत्रमंत्राच्या सहाय्याने भविष्य सांगण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या भविष्यकथनाच्या वेगवेगळ्या प्रकारांवरून त्यांना वेगवेगळ्या नावाने महाराष्ट्रात ओळखले जाते. उदा: कुडमुडे जोशी, बुडबुडकी जोशी, डमरूवाले, पिंगळा, राघूवाले, उपरी अशा कितीतरी जमाती भविष्यकथनावर स्वत:चा उदरनिर्वाह करताना आढळतात. 'मेढंगी' ही त्यांपैकीच एक मुख्य जमात आहे.

पूर्वीचे रूप

पूर्वी मेढंगी समाजातील लोक पंचा नेसून, गळ्यात जानवे घालून, उघड्या

अंगाने, हातात भाडळी पुराण घेऊन घरोघर फिरत. डोक्याचे लांबसडक काळेभोर केस अत्यंत टापटिपीने मागे फिरवून चोपून बसवलेले, कानात पितळेच्या मोठ्या रिंगा लोंबत असलेल्या, गळ्यात बारीक मण्यांची माळ आणि जानवे, कपाळावर चंदनाचा टिळा, अतिशय स्वच्छ जरीकाठी रंगीत पंचा, अशा थाटात तळहातावर ठेवलेल्या भाडळी पुराणाला खांद्याचा आधार देऊन अनवाणी पायाने घरोघर भटकणारा त्या काळचा मेढंगी, खेड्यापाड्यातील बायाबापड्यांना भविष्य घडविणारा त्राताच वाटत असे. त्यामुळे मनातलं अचूक ओळखणारा आणि मनाप्रमाणे अचूक सांगणारा मेढंगी खेड्यात अत्यंत लोकप्रिय असे.

भविष्य सांगणे ही या समाजाची पारंपरिक कला समजली जाते. ही कला परंपरेने चालत आलेली आहे. एवढेच नव्हे तर ही कला म्हणजे आम्हाला देवाने दिलेले खास देणे आहे असे यांच्यातील काही मंडळी अभिमानाने आजही सांगतात. परंतु पूर्वीच्या काळची ग्रामीण समाजातील त्यांची लोकप्रियता किंवा लोकांचा त्यांच्या भविष्यावरील असणारा विश्वास आज औषधालाही पहावयास मिळत नाही, असे त्यांच्यापैकी एकाने सांगितले.

मेढंगी समाज हा मूळ महाराष्ट्रातील समाज असून त्याची मातृभाषा मराठी आहे. मात्र, व्यवसायाच्या वेळी ते लोक समोरच्या व्यक्तीला कळणार नाही अशा, प्रकारची विशिष्ट सांकेतिक भाषा बोलतात. त्या भाषेला ते 'फारशी' किंवा 'पारसी' भाषा असे म्हणतात. इतर भटक्या समाजांतील सांकेतिक किंवा 'पारसी' भाषेला मेढंग्यांची पारसी मिळती-जुळती अशी आहे. मराठी, गुजराथी, वऱ्हाडी, मारवाडी आणि हिंदी भाषेच्या एकत्रित मिश्रणातून निर्माण केलेली त्यांची पारसी भाषा असल्याचे सांगण्यात येते. 'मेढंगी पारसी' या नावानं ती भाषा ओळखली जाते. मेढंगी हे जातनाव सुद्धा त्यांच्या पारसी भाषेची निर्मिती आहे, असे त्यांच्यातील काही लोकांचे म्हणणे आहे, तर काहीजण असे सांगतात की, 'आमच्या भविष्य सांगण्याच्या विशिष्ट पारंपरिक 'ढंगा' मुळे आम्हाला 'मै-ढंगी' किंवा 'मेढंगी' या नावाने ओळखले जाते.

महाराष्ट्रातील इतर भटक्या विमुक्त जातीजमातींप्रमाणे मेढंगी समाजातही जातपंचायत अस्तित्वात आहे. जातीची न्याय व्यवस्था म्हणून किंवा जमातीची सुप्रीम पॉवर म्हणून जात पंचायतीचे अस्तित्व या समाजाने टिकवून ठेवल्याचे सांगितले जाते. समाजातील न्याय निवाड्याचे मुख्य काम जात पंचायत करीत असते. समाजातील भांडणतंटा असो, धार्मिक कार्य असो किंवा लग्नकार्य असो, जात पंचायतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. लग्न ठरविण्यापासून लग्न लावण्यापर्यंत पंचायत काम करते. पंचायतीच्या मध्यस्थीशिवाय किंवा खास परवानगीशिवाय कोणतेही कार्य या समाजात पार पडत नाही.

आज पंचायतीमध्ये प्रमुख पाच पंच आणि एक पंचप्रमुख असतो. पंचांनी केलेल्या न्यायनिवाड्यावर शेवटी पंचप्रमुखाने शिक्कामोर्तब करावे लागते. शेवटचा

निकाल किंवा निवाडा पंचप्रमुखच करीत असतो. पंचप्रमुखाला किंवा जात पंचायतीच्या प्रमुखाला 'मेढेदार' असे म्हटले जाते.

मेढेदार हा मेढंगी जातीचा जातप्रमुख मानला जातो. त्याने दिलेला निर्णय अंतिम आणि पवित्र समजला जातो. मेढेदार हे पद परंपरेने विशिष्ट घराण्यात पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेले असते.

जात पंचायतीचे नियम हे अलिखित असून पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेले आहेत, आजही ते त्या जमातीवर बंधनकारक आहेत. असे एकाने सांगितले.

मेढंग्यांचा 'मेढेदार' हा जातप्रमुख असल्याने तो अर्थातच जातीतील इतर लोकांच्यापेक्षा पैशाने आणि संपत्तीने गब्बर असतो. वेळप्रसंगी जमातीतील लोकांना तो व्याजाने पैसे देत असतो, त्यामुळे त्याला मेढंग्यांचा सावकार या नावानेही ओळखले जाते.

दंडविधी

मेढंग्यांच्या जात पंचायतीच्या शिक्षेचे स्वरूपही इतर भटक्यांपेक्षा विचित्र आहे. एखाद्या व्यक्तीने समाजात अनैतिक संबंध ठेवला, चोरीमारी केली किंवा परजातीतील स्त्री घरात ठेवली तर अशा व्यक्तीस जातपंचायत जाब विचारते. त्याने गुन्हा कबूल केला तर, तीन पंधरा (पंचेचाळीस) किंवा सात पंधरा अशा हिशोबाने पैसे दंड म्हणून वसूल केले जातात, किंवा त्याची एक मिशी काढली जाते किंवा केसाची बट कापून घेतली जाते. त्याला शिक्षा मान्य नसल्यास समाजातून बहिष्कृत केले जाते.

मेढंगी समाजात कुळींना आणि गोत्रांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कुल-गोत्रानुसार सोयरेसंबंध ठेवणे हे जातकायद्यानुसार योग्य समजले जाते. प्रत्येक गोत्राचा आणि कुळीचा विशिष्ट दर्जा ठरलेला असतो. त्या त्या दर्जाप्रमाणेच कुळे-गोत्रात लग्ने केली जातात. या कुळांत काळे, पतंगे, पोटे, पाचिगे, वाकडे शिंदे, कानडे, बिधाते, गोढे, गंगावने, भिसे अशी काही प्रमुख आडनावे आहेत. काही कुल-नावे त्यांच्या स्थाईक गावांच्या नावावरूनही पडलेली आहेत. नगरकर, मेडदकर, लासूरकर अशी काही प्रमुख नावे आहेत प्रत्येकाचे गोत्र वेगळे आहे, तसे कुलदैवतही वेगळे आहे. प्रत्येक कुळाचे देवक निराळे आहे. उदा. कुऱ्हाड, सूर्यफूल, जांभूळ, आंबा अशी काही देवके त्यांत मुख्य आहेत.

मेढंगी समाजातील लग्नसोहळा तीन दिवस चालतो. पहिला हळदीचा, दुसरा विश्रांतीचा आणि तिसरा लग्नाचा असतो. लग्न पंचायतीमार्फत जमविले जाते. मुलाने मुलीला हुंडा देण्याची पद्धत या समाजात रूढ आहे. दोन ते तीन हजारापर्यंत मुलगा मुलीला हुंडा देतो. अर्थात प्रत्येक कुळाच्या प्रतिष्ठेनुसार हुंड्याची रक्कम कमी-जास्त असते. हुंड्याच्या रकमेचा काही भाग पंचायतीला द्यावा लागतो, तर काही भाग पंचप्रमुखाला द्यावा लागतो.

या समाजात अनेकपत्नीत्वाची चाल रूढ आहे, तशी पुनर्विवाहाची किंवा मोहतूर लावण्याची प्रथा चालू आहे. एखाद्या जोडप्याने लग्नानंतर काडीमोड घेतला असेल तर काडीमोड घेतलेल्या पुरुषाला दुसऱ्या स्त्रीबरोबर लग्न करण्याची मुभा जातपंचायत देते. परंतु काडीमोड घेतलेल्या स्त्रीला मात्र ज्याच्यापासून काडीमोड घेतला असा पुरुष मेल्याशिवाय दुसरे लग्न करता येत नाही.

या समाजात पुनर्विवाहाला मोहतूर लावणे असे म्हणतात. मोहतूर लावण्याचा कार्यक्रम विशेषत: रात्री केला जातो. अशा वेळी जिच्याबरोबर मोहतूर लावायचा तिच्या कपाळी कुंकवाऐवजी शेणटिळा लावतात आणि साडीऐवजी तिला धोतर नेसवतात. ब्राह्मणाच्या साक्षीने, मोहतूराच्या कार्यास जमलेल्या लोकांना ऐपतीप्रमाणे जेवण देतात.


मोहतूराच्या बायकोला समाजात महत्त्वाच्या प्रसंगी मानपान दिला जात नाही. शेणाचा टिळा लावलेली किंवा घरघूशी असे तिला हिणविले जाते.

मेढंगी हा हिंदूधर्मीय समाज आहे. तो धार्मिक आणि टोकाचा अंधश्रद्धाळू समाज आहे. भैरोबा, कान्होबा, मुंजाबा, मरिआई ही त्यांची कुलदैवतं आहेत. कुलदैवताच्या नावाने बकरे, कोंबडे कापणे, उपासतापास करणे, नवस करणे, इत्यादी प्रकार या समाजात नियमित केले जातात. मेढंग्यांच्या प्रत्येक घरात कुलदैवताचा खास देव्हारा असतो. त्यात चांदी–पितळेचे किंवा पत्र्याचे देवाचे मुखवटे ठेवलेले असतात. त्यांना ते 'टाक' असे म्हणतात. हे टाक अत्यंत पवित्र समजले जातात.

पूर्वीच्या काळी हे लोक सतत गावोगावी भटकत असल्याने त्यांच्या कुलदैवतांचे देव्हारे ते बरोबर घेऊन भटकत असत. त्यांची रोज नियमाने पूजा–अर्चा करीत असत. अलिकडे काही वर्षांपासून हे लोक गावोगावी स्थिर होण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे त्यांचे देवदेव्हारेही स्थिर होऊ लागले आहेत.

मेढंगी हा हिंदूधर्मीय समाज असला तरी या समाजात मृतास पुरण्याची प्रथा आहे. विशेषत: मृत व्यक्तीस उजवीकडे चेहरा करून खड्ड्यात बसवतात. त्याच्या कपाळावर अबीरबुक्का लावून पैसा चिकटवतात आणि विधिपूर्वक त्याला पुरतात. पुरलेल्या ठिकाणी एक भलामोठा दगड ठेवतात आणि त्याला शेंदूर लावून त्याची पूजा करतात. मृताचे तीन किंवा सात दिवस सुतक पाळतात आणि कडूघास काढण्याच्या निमित्ताने समाजाला ऐपतीप्रमाणे जेवण देतात.

असा हा गावोगावी सतत भटकणारा आणि राशीभविष्य कथन करून उपजीविका करणारा मेढंगी समाज अलिकडे काही प्रमाणात स्थिर होतो आहे. मात्र पोटासाठी वणवण, भटकंती आजही त्याची चालू आहे. अनेक ढंगाने भविष्य सांगणारा मेढंगी स्वत:च्या भविष्याबद्दल मात्र पूर्णपणे अंधारात आहे. स्थिर समाजप्रवाहात सामील होण्याची तो धडपड करतो आहे. त्याला भटक्या जगण्याचा तिरस्कार वाटतो आहे. तो तसे उघडपणे बोलतो आहे. आतल्या आत घुसमटतो आहे. परंपरेच्या उपऱ्या जगण्यातून मुक्त होण्याचा तो प्रयत्न करतो आहे. ❋



२. लमाण

जन्मापासून मृत्यूपर्यंत केवळ पोटाची भूक शमविण्यासाठी, पायाला चक्र बांधल्यासारखे वर्षानुवर्षे भटकणारांची संख्या या देशात कमी नाही. पोटाला मिळावे म्हणून दारोदार भीक मागून जगणारे, समाजाचे मनोरंजन करून जगणारे, देवाचे ओझे डोक्यावर घेऊन जगणारे, भविष्य सांगत फिरणारे, कसरतीचे प्रयोग करीत गावोगाव फिरणारे आणि शारीरिक कष्टावर मिळेल ते काम आणि देईल ते दाम घेऊन कसेबसे जगत राहाणारे भटके समाज. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात ते 'आज इथं उद्या तिथं' अशा अवस्थेत मरण जवळ करताना दिसतात. त्यांच्या अनेक जातीजमातींचे कळप गावाबाहेरच्या माळरानावर, तांड्यांवर, वस्त्यांवर आपले स्वतंत्र अस्तित्व जोपासत जगत आहेत. प्रत्येकाचे जगणे· मरणे वेगळे आहे. रूढी–परंपरा, देव–देव्हारे वेगळे आहेत, भाषा वेगळी आहे, व्यवसाय–पोट भरण्याची साधने वेगळी आहेत. मात्र सर्वांच्या वाट्याला भटकेपण आलेले आहे. एवढेच काय ते समान.

मूळचा आंध्र प्रदेशातील समाज

लमाण हा अशाच भटक्यांपैकी एक कष्टकरी समाज आहे. हा समाज मूळचा आंध्र प्रदेशातील ओतापेठ, महेबूब, एगंटापूर, महमदाबाद, तोपारगी, कोयलकोंडा अशा विविध भागातून आलेला, त्या काळच्या मुस्लीम धर्मांतराच्या भीतीने आंध्रातून परागंदा झालेला असा समाज आहे. त्यांची मूळ भाषा तेलगू असली तरी 'लमाणी' नावाची स्वतंत्र भाषा असल्याचे ते सांगतात.

लमाण हा समाज आंध्र प्रदेशात अस्पृश्य समाज म्हणून ओळखला जातो. ते स्वत:ची ओळख गिरीजन या नावाने सांगतात. लमाणी, मारवाडी, बंजारी अशी वेगवेगळी नावे या समाजास रूढ आहेत. चव्हाण, राठोड, पवार, काळे अशी प्रमुख आडनावे त्यांच्यात पाहावयास मिळतात. या आडनावांना ते समाजातील प्रतिष्ठित 'कुळ नामे' किंवा 'कुळे' समजतात. कुळांचा उच्चनीचपणा किंवा समाजातील कुळाचे श्रेष्ठत्व, विशिष्ट नावाचे लोक अभिमानाने सांगतात. ठराविक कुळातच रोटीबेटी व्यवहार केले जातात, मानपान दिला जातो.

बालविवाहाला प्रतिष्ठा

वर्षानुवर्षे भटकणारा हा समाज बालविवाहाला महत्त्व देतो. लहान वयात

लग्न केले तर पंढरी पुण्य पडते अशी भ्रामक कल्पना यांच्यात आहे. मुलाच्या बापाने मुलीच्या बापाला हुंडा म्हणून काही रक्कम द्यावी लागते. लग्न ठरल्यानंतर लग्नाचा करार होतो, तेव्हा हुंड्याचा पहिला हप्ता शंभर रुपये आणि लग्नानंतर हजार रुपये देण्याची रीत आजही हे लोक पाळतात. लग्न हे मुलीच्याच घरी व्हावे लागते. लग्नातील जेवणाबरोबर भरपूर दारू प्रत्येकाला प्यायला द्यावी लागते. दारूशिवाय झालेल्या लग्नाला समाजमान्यता मिळत नाही.

या समाजात शिखांचे धर्मगुरू गुरूनानक यांना पूजनीय स्थान आहे. लग्नानंतर प्रत्येक नवविवाहित जोडप्याने, गूळभाकरी आणि तूप चुरून त्याचा एकत्रित मलिदा नांदेड येथे जाऊन गुरूनानक यांना नैवेद्य म्हणून दाखविण्याची प्रथा आहे. आपण हिंदूधर्मीय असल्याचे हे लोक सांगतात, परंतु शीख पंथाच्या काही प्रथा पाळतात.

तिरुपती–बालाजी, अंबाबाई, मरिआई, काळूबाई आणि मारुती ही त्यांची प्रमुख कुलदैवते आहेत. या देवदेवतांचे देव्हारे त्यांच्या घरोघर पहावयास मिळतात. काळूबाईला बकरे, कोंबडे कापून नवस करण्याची प्रथा या समाजात आहे. उपासतापास करणे, अंगात येणे, यावर त्यांचा विश्वास आहे. अंधश्रद्धेचे प्रमाण समाजात मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळते.

पाडव्यानंतर पंधरा दिवसांनी दरवर्षी आंध्र प्रदेशात 'लोकालाल' नावाच्या देवाची जत्रा मोठ्या प्रमाणात भरते. 'लोकालाल' नवसाला पावतो अशी यांची श्रद्धा आहे. विशेषत: नवविवाहित जोडप्यांना घेऊन या देवाला जाण्याची रीत आहे. लग्नानंतर देवाच्या दारी जावयाच्या शेंडीवरून सासू पाणी सोडते आणि पिते असे सांगण्यात आले. शेंडीवरून सोडलेले पाणी सासूने पिण्याच्या या विधीला 'चोटी' असे म्हणतात. या विधीनंतर लग्न झाले असे समजले जाते.

जात पंचायतीचे वर्चस्व

इतर भटक्या समाजांप्रमाणे या समाजातही जात पंचायतीचे महत्त्व आजही टिकून आहे. आंध्र प्रदेशातील या समाजाची जात पंचायत ही न्यायाची सर्वोच्च संस्था मानली जाते. जात पंचायतीच्या नियमांना डावलणारी व्यक्ती समाजबहिष्कृत केली जाते किंवा दोन ते चार हजार रुपये दंडाची शिक्षा संबंधित व्यक्तीस दिली जाते. अशा प्रकारच्या दंडाची रक्कम भरण्याची क्षमता नसेल तर त्या व्यक्तीने शेठ सावकाराकडे सालाने (वेठबिगार) राहून कर्ज काढून ते पंचायतीला द्यावे लागते.

लग्न, पूजाअर्चा, जन्म–मृत्यू यावेळी जात पंचायतीला महत्त्वाचे स्थान असते. पंचायतीच्या परवानगीशिवाय लग्नकार्ये केली जात नाहीत किंवा प्रेताची विल्हेवाट लावली जात नाही.

समाजात नैतिकतेला प्राधान्य दिले जाते. अनैतिक संबंध ठेवणाऱ्या स्त्रीला अथवा पुरुषाला जात पंचायत जातीबहिष्कृत करते, एवढेच नव्हे तर खोटे बोलणाऱ्याला सुद्धा गुन्हेगार ठरवून जातपंचायत १०५ रुपयांपर्यंत दंड करू शकते.

खरे बोलणे ही नैतिकता समजली जाते.

स्त्रीचे वेगळेपण

नीती-अनीतीचे अलिखित नियम पाळणाऱ्या या समाजाला मात्र केव्हा केव्हा पोटासाठी नैतिकतेचाही बळी द्यावा लागतो. पंचायतीचे नियम, जातीची परंपरा आणि त्यांचे वास्तव जगणे यात खूप अंतर असल्याचे दिसते. मुळातच हा समाज शारीरिक कष्टाची कामे करणारा. विशेषतः मोठमोठ्या कंत्राटदारांकडे इमारतीच्या बांधकामावर रात्रंदिवस मजूर म्हणून रावणारा, तिथेच बांधकामाच्या आडोशाला पालात विसावणारा असा परावलंबी समाज आहे.

लमाण पुरुषांपेक्षा त्यांच्या स्त्रियांचे वेगळेपण चटकन नजरेत भरते. तो घागरा, ती आरसे लावलेली चोळी, डोईवरून घेतलेली रंगीबेरंगी ओढणी, काखेपासून मनगटापर्यंत हस्तीदंतासारख्या पांढऱ्या दिसणाऱ्या बांगड्या, अनवाणी पायात खुळखुळणाऱ्या वाक्या किंवा पट्ट्या, गळाभर मण्यांची पोत, कानावर लोंबणारी आणि केसांना चोपून चापून बसवलेली झुंबरं, नाकात चमकी हा लमाण स्त्रीचा खास पेहराव. तिला दागदागिन्यांची, कलाकुसरीची भारी हौस. तिच्या कपड्यावरची कलाकुसर ती स्वतःच करते.

अशाच लमाणांच्या तांड्यावर गेलो तेव्हा अंगभर गोंदून घेतलेल्या एका बाईला तिच्या गोंदणाबद्दल विचारले तेव्हा ती म्हणाली, 'सौंदर्य कमी व्हावं, जास्तीत जास्त कुरूप दिसावं, परपुरुषाच्या नजरेत न भरावं, म्हणून आम्ही सर्वांगावर गोंदून घेतो.'

सर्वांगावर गोंदून स्वतःचे चारित्र्य जपणाऱ्या या लमाण स्त्रिया, पुरुषांच्या बरोबरीने बांधकामावर रात्रंदिवस राबत असतात. पोटासाठी ठेकेदाराची मर्जी, नवऱ्याचे नवरेपण आणि चिमुकल्या जिवाबद्दलचे वात्सल्य त्या सांभाळत असतात.

समाज प्रवाहापासून दूर

आंध्रापासून परागंदा झालेला हा लमाण समाज महाराष्ट्रात सर्वत्र दिसतो. जिथे तिथे इमारतीची बांधकामे सुरू आहेत तिथे तिथे लमाण स्त्री, पुरुष मजूर म्हणून काम करतात. काम संपले की, तेथील त्यांचा मुक्कामही संपतो. पोटासाठी पुन्हा नव्या बांधकामाच्या शोधात ही मंडळी भटकत असतात. जिथे काम तिथे त्यांचे पाल, प्रपंच आणि पोरंबाळं रांगत असतात. मोठमोठ्या इमारती, बंगले बांधणारी ही माणसं निवाऱ्याशिवाय वर्षानुवर्षे भटकत असतात.

पोटासाठी सतत भटकंतीमुळे निश्चित राहण्याचा ठिकाणा नाही, पोटाबरोबर प्रपंच अन् पोरांचं लचांड. सतत भटकत असल्याने मुलांचे शिक्षण नाही. देश नावाचा प्रकार त्यांच्या स्वप्नातही नाही. स्वातंत्र्यात त्यांचा सहभाग नाही. लोकशाहीत त्यांना मतांचा अधिकार नाही. शिरगणतीत त्यांचा समावेश नाही. शास-

नाचा आणि त्यांचा संबंध नाही. अशी याच देशातली परंतु इथली नसल्यामुळे ही उपरी झालेली माणसे समाजप्रवाहापासून कितीतरी दूर राहून स्वतःचे वेगळे अस्तित्व आणि जगणं–मरणं गोंजारीत कशीबशी जगत आहेत.

लमाण कष्टकरी आहे, मजूर–कामगार आहे, परंतु प्रस्थापित मजूर- कामगारांचे नियम त्यांना लागू नाहीत. पोटासाठी फक्त मरमर काम करायचे आणि मिळेल ते दाम स्वीकारायचे इतके मर्यादित त्यांचे जगणे आहे. कामाची शाश्वती, फंड, निर्वाहनिधी आणि पगारी रजा या गोष्टी तर त्यांच्यापासून कित्येक मैल दूर आहेत.

लमाण या देशातला आहे, तोही आपल्यासारखाच भारतीय आहे. त्याचाही या देशावर अधिकार आहे. देशातल्या संस्कृतीशी आणि परंपरेशी त्याचं नातं आहे. त्याला माणूस म्हणून प्रतिष्ठेने इथं जगता आलं पाहिजे, हे सारं त्याला कोण समजावून देणार? त्याचं जगणं, मरणं आणि उपरेपण कोण समजावून घेणार?



3. ढवळा नंदीवाला

गेल्या अनेक वर्षापासून पिढ्यान् पिढ्या निरनिराळ्या प्राण्यांचा खेळ करून स्वत.ची उपजीविका करणारे अनेक भटके समाज महाराष्ट्रात आहेत. माकडांचा खेळ करणारा माकडवाला, अस्वल पाळणारा दरवेशी, साप खेळविणारा मदारी किंवा सापवाला, उंटाच्या कसरती करून दाखविणारा रायरंद, साप पाळणारा गारुडी, तसा नंदीबैलाचा खेळ करून दाखविणारा 'ढवळा नंदीवाला' हा समाज अनेक वर्षापासून महाराष्ट्रात आहे.

विशेषत: सुगीच्या हंगामात नंदीबैल घेऊन ही मंडळी गावोगाव सतत भटकत असतात. शेतकऱ्यांच्या खळ्यावर किंवा मळ्यात धान्य गोळा करीत ते फिरत असतात. तसेच खेड्यापाड्यात आणि शहरातसुद्धा 'गुबुगुबू... डुबूक् डुबूक्' असा ढोलाचा ठेका वाजवीत, सनईच्या सुराच्या तालावर स्वत: नाचत, दारोदार पै-पैसा आणि जुनेपाने कपडे मागत कित्येक नंदीवाले फिरत असतात.

पोटाचे साधन

नंदीबैल हे या लोकांचे जगण्याचे प्रमुख साधन आहे. 'ढवळा' हे बैलाचे विशेष नाम आहे. त्यामुळे हे लोक स्वत:ची ओळख ढवळा नंदीवाला याच नावाने करून देतात. यांच्याकडे तब्बेतीने मजबूत, उंचेपुरे आणि मोठमोठ्या शिंगांचे बैल असतात. उत्तर प्रदेश, काशी-बनारस या भागातून चार ते पाच हजार रुपये किंमत देऊन हे बैल आणलेले असतात. त्यांना हवे त्या इशाऱ्याबरहुकूम ढोलाच्या ठेक्यावर नाचायला शिकविलेले असते. 'पाऊस पडेल का?' असे विचारल्यावर मान कशी डोलवायची, लहान मुलांच्या पोटावर चारी पाय ठेवून अलगद कसे उभे राहायचे किंवा खोटी खोटी लढत कशी द्यायची, याचे शिक्षण दिले जाते. बैलांना अशा-प्रकारे शिकविणारी खास माणसे या समाजात आहेत. त्यांना 'गुरुमावली' असे म्हणतात.

ढवळा नंदीवाले हे लोक 'फार पूर्वी आम्ही मराठे होतो' असे सांगतात. मात्र त्यांची मातृभाषा तेलगूसदृश असून त्यांच्या भाषेत मराठी, हिंदी शब्दांचे मिश्रण आढळते. बैलाचा खेळ करताना हे लोक वेगळ्या ढंगात मराठी बोलत असतात. व्यवहारासाठी ते सांकेतिक भाषेचाही वापर करतात. या समाजात बारा प्रमुख कुळे मानली गेलेली आहे. त्यांत गोंड, वायकर, सोनवणे, साळुंके, पाथरकर, शिंदे,

चव्हाण, गावकर आणि साळवे ह्या आडनावांची कुळे प्रमुख समजली जातात. या कुळांत आपापसात रोटीबेटीव्यवहार केले जातात.

विवाह पद्धती

या समाजात बालविवाहाची प्रथा पूर्वीच्या काळी रूढ होती. अलिकडे ही प्रथा बंद झाल्याचे सांगण्यात आले. बारा ते पंधरा या वयात हल्ली विवाह होतात. विवाहात हुंडा घेण्याची चाल या समाजात आहे. मुलीकडून हुंडा घेणे हे जात-कायद्यानुसार बंधन मानले गेलेले आहे. हुंड्याशिवाय समाजात लग्नं होत नाहीत. लग्नसोहळा तीन दिवस चालतो. लग्नाचा पहिला दिवस हा देवकार्याचा मानला जातो. या दिवशी देवाच्या नावाने बकरे कापून समाजाला जेवण दिले जाते. दुसरे दिवशी हळद खेळली जाते. त्या दिवशीही बकरे कापले जाते. आणि तिसरे दिवशी लग्नाचा मुख्य विधी पार पाडला जातो. लग्न ब्राह्मण लावतो. त्याला पंचवीस ते पन्नास रुपयांपर्यंत दक्षिणा दिली जाते. त्या दिवशी मात्र समाजाला गोड जेवण दिले जाते.

या समाजात विधवाविवाह मान्य नाही. मात्र पुरुषाला पुनर्विवाहाला परवानगी दिली जाते. असे विवाह फक्त अकरा कुळांतच केले जातात. 'गोंड' कुळास पुनर्विवाह अथवा विधवाविवाह करण्यास बंदी आहे.

जातपंचायत अस्तित्वात

या समाजात आजही जातपंचायतीला महत्त्वाचे स्थान आहे. समाजांतर्गत भांडण-तंटा सोडविणे, महत्त्वाचे आर्थिक व्यवहार पाहाणे, लग्नकार्ये उरकणे किंवा व्यक्तिगत हितसंबंधाचे व्यवहारात लक्ष घालून न्यायनिवाडा करणे ही कामे पंचायत करीत असते. समाजातील कोणताही व्यवहार पंचायतीच्या सल्ल्याशिवाय केला जात नाही. पंचायतीच्या प्रमुखास 'सरपंच' किंवा 'पाटील' या नावाने ओळखतात.

परंपरेने चालत आलेले जातपंचायतीचे अलिखित नियम या समाजात आजही पाळले जात असल्याचे सांगण्यात आले. पंचायतीचे नियम मोडणाऱ्या व्यक्तीस पंचायत आजही शिक्षा करते. विशेषत: या समाजातील एखाद्या व्यक्तीने जातीबाहेर लग्न केले किंवा अनैतिक संबंध ठेवले तर संबंधित व्यक्तीस जातीबहिष्कृत केले जाते. त्याला किंवा त्याच्या कुटुंबातील इतरांना लग्नपंक्तीत जेवू दिले जात नाही. त्यांच्याशी संबंध ठेवले जात नाहीत. एवढेच नव्हे तर, अशा व्यक्तीची किंवा त्याच्या कुटुंबातील अन्य व्यक्तींची मयत झाली तर मयतीलासुद्धा स्पर्श केला जात नाही.

समाजातील एखाद्या स्त्रीने अनैतिक संबंध ठेवले तर पंचायत तिला दोन वेळा समज देते. नंतर तिच्या वागण्यात जर सुधारणा झाली नाही तर तिला एक हजार रुपये दंड केला जातो. त्या दंडाचे रकमेतून बकरे आणून कापले जाते आणि समाजाला जेवण दिले जाते. त्यानंतरही ती सुधारली नाही तर पंचायत तिच्या डोक्यावर भली मोठी दगडी शिळा देऊन तिला एका पायावर उभे राहण्याची शिक्षा करते.

पुरुषाने व्यभिचार केला तर समाजातील वारा लोकांना उचलेल असे शेणाने भरलेले मोठे टोपले किंवा 'हारा' त्याच्या डोक्यावर देतात. जर एखाद्या व्यक्तीने डोक्यावर शेण घेण्यास विरोध केलाच तर त्याला चाबकाचे फटके मारले जातात. इतके करूनही तो सुधारला नाही तर त्याला वाळीत टाकले जाते.

कमालीची अंधश्रद्धा

या समाजातील लोक अत्यंत धार्मिक वृत्तीचे असून टोकाच्या अंधश्रद्धा पाळतात. म्हसोबा, नाथबाबा, धावजीबाबा आणि महाकाली ही त्यांची प्रमुख कुलदैवते आहेत. श्रावणात या देवदेवतांचे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. देवदेवतेच्या नावाने बकरे, कोंबडे बळी दिले जातात. देवतांचे वारे अंगात संचारते अशी या समाजात भावना आहे. देव अंगात येतो यावर त्यांचा विश्वास आहे. त्यामुळे कुटुंबात कोणी आजारी पडले, भूत–पिशाच्चाची बाधा झाली (अशी कल्पना) किंवा विवाह जमत नसेल अथवा घरात सुखस्वास्थ्य नसेल तर कुलदैवताला कौल लावला जातो, नवस केला जातो, देवाच्या नावाने उपवास केला जातो. वेळप्रसंगी देवाला 'साकडे' घातले जाते किंवा देव वाढविला जातो. देवाच्या नावाने कोंबडे-बकरे कापले जाते.

दैवी चमत्कारावर या लोकांचा विश्वास असल्याने असे चमत्कार करून दाखविणारे लोक या समाजात आढळतात. गंडे, दोरे, ताईत तयार करणारे व विकणारे लोक या समाजात पाहावयास मिळतात. गाय–म्हैस दूध देत नसेल, चारा पाणी घेत नसेल तर त्यावर इलाज म्हणून जनावरांच्या गळचात बांधण्यासाठी खास 'ताईत' देणारे लोक आहेत.

विशेषतः श्रावण महिन्यात अंगात सुतळीचे पोते (गोणपाट) किंवा बारदान घालून संपूर्ण महिनाभर घरप्रपंच सोडून वनवासाला जाण्याची प्रथा पूर्वीपासूनच या समाजात चालत आलेली आहे. जो माणूस अशाप्रकारे वनवासाला जातो त्याच्या हृदयात अमृतकुंभ निर्माण होतो असे या समाजातील एकाने सांगितले.

रामायणातील रामाचा आदर्श मानणारा हा समाज असल्याने चौदा वर्षांच्या वनवासात रामाला झालेल्या त्रासातून मुक्तता व्हावी या हेतूने हे लोक श्रावण महिन्यात वनवासाला जातात. या काळात पायात चप्पल अगर बूट घालायचे नाहीत, कोणाच्याही घरचे पाणी प्यायचे नाही, कोणालाही काही मागायचे नाही, कोणी जेवण देऊ केले तरच स्वीकारायचे आणि शक्यतो गावापासून दूर जंगलात झोपायचे अशा प्रकारची पथ्ये पाळली जातात. वनवासाला गेलेली व्यक्ती केळी खात नाही असे त्या वनवासाचे वैशिष्ट्य म्हणून सांगण्यात आले.

पुण्याजवळील मांजरी फार्मशेजारी राहणाऱ्या भगवान चंद्रभान गोंड या तरुणाची मुलाखत घेत असताना तो अभिमानाने सांगत होता– मला महाकाली प्रसन्न झालेली आहे, महाकालीचं वारं माझ्या अंगात येतं.

ढवळा नंदीवाला हे हिंदूधर्मीय असल्याचे सांगतात. हिंदू देवतांबरोबरच हसन–हुसेन हीही त्यांची प्रमुख दैवते असल्याचे सांगण्यात आले. तसेच मुसलमानांप्रमाणे हे लोक पंजे बसवीत असल्याचेही एकाने सांगितले. मयताचे दहन करण्याऐवजी आम्ही दफन करतो, त्यावर थडगे बांधतो असेही एकाने सांगितले.

महाराष्ट्रातील वस्ती

महाराष्ट्रात या लोकांची वस्ती माळेगाव, जळूशी, बारामती, जळगाव, मेडद, कोळपेवाडी, नेवासा, नगर, भेंडा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आहे. वरील ठिकाणी प्रत्येक गावात या समाजाचा चारपाचशे उंबरठा आहे. तेथे स्वतःच्या मालकीची पक्की घरे आहेत. शेती व्यवसायात या समाजातील लोकांची मोठी संख्या आहे.

परंपरेने चालत आलेल्या नंदीबैलाच्या खेळाशिवाय ज्योतिष सांगण्याचा फिरता व्यवसाय काही लोक करतात, तर काही म्हशींचा व्यापार करताना दिसतात. या व्यवसायात कित्येक लोक आर्थिकदृष्ट्या मजबूत असल्याचे एकाने सांगितले.

पुरुषांनी नंदीबैलाचा खेळ करावा, ज्योतिष सांगावे किंवा म्हशीचा व्यापार करावा, तर कुटुंबातील स्त्रियांनी घरोघर जाऊन गोधड्या शिवून चार पैसे प्रपंचाला लावावेत, असा यांचा जीवनक्रम चाललेला असतो. व्यवसायाच्या निमित्ताने किंवा पोटासाठी सतत भटकावे लागत असल्याने शिक्षणापासून हा समाज खूपच दूर राहिलेला आहे. वडिलांचा व्यवसाय मुलाने करावा किंवा जातगंगेची परंपरा टिकून राहावी यासाठी या समाजातील लोक सतत प्रयत्न करीत असतात. आपल्या भोवतालच्या सामाजिक बदलाचे भान न ठेवता आजही हे लोक 'पाऊस पडेल का?' असे नंदीबैलालाच विचारीत असतात.

❊

४. गोसावी

भारतीय हिंदू धर्म समाजव्यवस्थेत 'गोसावी' हे संन्यस्त वृत्तीचे प्रतीक मानले गेलेले आहे. पूर्वीच्या काळी अखंड बालब्रह्मचारी अवस्थेत जंगलात एकांतात योग अभ्यास करणारे किंवा तपश्चर्या करीत आयुष्य घालविणारे अनेक ऋषी– मुनी होऊन गेलेले आहेत. त्यांची परंपरा पुढच्या काळात चालू ठेवण्याचे काम 'गोसावी' हा समाज करतो आहे. मात्र या परंपरेत पूर्वी ब्रह्मचर्य हे व्रत मानले जात असे. तसे व्रत गोसावी समाजात हल्ली मानले जात नाही. प्रपंच करून परमार्थ साधणे हा त्यातला प्रमुख उद्देश मानला जातो. गोसावी आणि ऋषी किंवा संन्याशी यांमध्ये महत्त्वाचा असा आणखी एक फरक आहे की, गोसावी लोक पूर्वीप्रमाणे जंगलात किंवा गिरीकंदरात ध्यानधारणा, तपश्चर्या करताना क्वचित आढळतात. जटा वाढवायच्या, गळ्यात रुद्राक्षांची माळ घालायची, भगवी वस्त्रे नेसायची आणि देवाच्या नावाने दारोदार पै-पैसा मागत फिरायचं हा हल्लीच्या गोसावी लोकांचा उद्योग आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून अशा प्रकारे, संन्याशाच्या वेशात दारोदार भिक्षा मागून स्वतःची उपजीविका करणारा विशिष्ट जमातीचा समूह भटकत आहे, त्यांना भटके 'गोसावी' या नावाने ओळखले जाते. महाराष्ट्र शासनाने 'गोसावी' ही भटकी जमात म्हणूनच नोंद केलेली आहे. यांना 'गाव गोसावी' असेही म्हणतात.

या गोसावी समाजामध्ये गिरी, पुरी, भारती, सरस्वती, वन, आख्य, तीर्थ, आश्रम आणि सागर असे भेद आहेत. या सर्वांना मिळून 'दसनाम गोसावी' असे म्हटले जाते.

गोसाव्यांतील वरील सर्व प्रकार 'संभूदलातील' गोसावी म्हणून ओळखले जाणारे. हे लोक शिवभक्त असून शिवाची अखंड पूजा करणारे आहेत. यांपैकी काही जंगलात राहतात, तर काही गावगाडच्याच्या आश्रयाने प्रपंचातून परमार्थ साधत असतात.

गोसावी समाजात साडेबारा जाती किंवा साडेबारा पंथ मानले जातात. यामध्ये कुंभ मेळचातले संन्यासी आणि दसनामींचा समावेश आहे. याशिवाय, नाथ पंथातील आदिनाथ, उदयनाथ, सत्तनाथ, संतोषनाथ, अचलपीरनाथ, अच्छबेनाथ, गजबला कंथळ नाथ, ज्ञान पारशी चौरंगी नाथ, मायारूपी मच्छिंद्रनाथ आणि पवनरूपी गोरक्षनाथ यांचा समावेश होतो.

साडेबारा पंथांतील जो अर्धा पंथ आहे, तो कानात अर्धी मुद्रा घालणारा पंथ म्हणून ओळखला जातो. हा पंथ उत्तर प्रदेशात मोठ्या प्रमाणात आहे.

गोसावी समाजात साडेबारा जातींशिवाय आणखी तीन मुख्य दल मानले गेले आहेत. त्यात रामाला मानणारे 'रामदल', शिवाला मानणारे 'संभूदल' आणि 'छटदर्शनीदल' असे मुख्य तीन प्रकार आहेत. संभूदलात नाथपंथीय लोकांचा समावेश होतो, तर रामदलामध्ये रामानंदी, निर्मोही, बैरागी आणि उदासी हे मुख्य पंथ मानले जातात. हे लोक विशेषतः कुंभ मेळ्यात सामील होतात. हे जंगलात राहातात आणि अखंड ब्रह्मचर्याचे पालन करतात. याशिवाय योग–अभ्यास आणि प्रवचनेही करतात. यांना अनेक शिष्यगण असतात. हे सर्व लोक रामाला मानणारे आहेत.

गोसावी समाजातील तिसरे दल म्हणून जे ओळखले जाते, त्याला 'छटदर्शनी' असे म्हणतात. या छटदर्शनीमध्ये कापडी, दरवेशी आणि न्याय गोसावी यांचा समावेश होतो. हे सर्व साधूलोक म्हणूनही ओळखले जातात. हे सतत गावोगावी भटकत असतात.

नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ सापडणे कठीण असे म्हणतात, परंतु संन्याश्यांची परंपरा चालविण्यासाठी अनेक वर्षांपासून संन्याशी वेशात दारोदार भिक्षा मागून उपजीविका करणारा महाराष्ट्रातील गोसावी समाज मात्र, आपलं मूळ स्थान गुजरात राज्यात असल्याचे सांगतो. हे लोक सहा पिढ्यांपूर्वी पोट भरण्याच्या निमित्ताने महाराष्ट्रात आल्याचे सांगितले जाते. या गोसावी लोकांची मातृभाषा गुजराथी आणि मारवाडी मिक्स अशी असून, यांचा आजचा व्यवसाय हा म्हशी सांभाळणे आणि विकणे असा आहे.

गोसावी समाजात कुळांचं प्रस्थ फार मोठं आहे. या समाजात कुळांना महत्त्वाचे स्थान आहे. यात चव्हाण, आटोळे, वाघमोडे, शिंदे, बामणे, शितोळे, पवार, वाघमारे, लोणकर, घाडगे आणि सावंत या नावांची मुख्य कुळे सांगितली जातात. कुळांची ही सर्व नावे महाराष्ट्रीयन आहेत. मात्र या लोकांचे मूळ स्थान गुजराथ आहे हे जरा विचित्र वाटते. तसे त्यांच्यातील काही लोकांना विचारले तेव्हा त्यांनी 'आहे हे असं आहे, हे असं का हे आम्हाला माहिती नाही' असे सांगितले.

इतर भटक्या–विमुक्त समाजांप्रमाणे गोसावी समाजातही जातपंचायत आहे. जातपंचायतीच्या प्रमुखास 'मुखिया' असे म्हणतात. याशिवाय, समाजातील जाणते लोक पंच म्हणून निवडलेले असतात. समाजातील भांडणतंटा, लग्नकार्य अगर इतर धार्मिक कार्याचे वेळी पंचप्रमुखाला आणि पंचांना मानपान मिळतो.

समाजातील गुन्हेगार व्यक्तीस समाजातून बहिष्कृत केले असेल आणि पुन्हा त्याला समाजात घ्यायचे असेल, तर त्याची दाढी आणि मिशी काढूनच समाजात परत घेतले जाते.

गोसावी समाजातील एखाद्या स्त्रीने विवाहबाह्य संबंध ठेवला तर अशा स्त्रीचे डोक्यावरचे सर्व केस काढले जात आणि तिचे नाक कापून तिला समाजातून हाकलून दिले जात असे. गुन्हेगार स्त्रीला समाजात पुन्हा घेतले जात नसे, असे सांगण्यात आले. हल्ली शिक्षेची ही प्रथा बंद झाली आहे.

गोसावी समाजातील वरील विचित्र शिक्षेमुळे समाजातील कोणीही व्यक्ती सहसा गैरकृत्य करण्यास तयार होत नाही, असे एकाने सांगितले.

गोसावी हा धार्मिक समाज आहे. अंबिका देवी हे त्यांचे मुख्य दैवत मानले जाते. या देवीचे देव्हारे घरोघर पाहावयास मिळतात. अंगात येण्याचे प्रकार समाजात सर्रास आढळतात. अंगारेधुपारे करणे, नवस करणे, उपवासतापास करणे हे प्रकार या समाजात टोकाचे पाळले जातात. याशिवाय लक्ष्मी, सितळादेवी, थारदेवी, सातदेवी अशाही काही देवदेवता मानल्या जातात.

या समाजात नवरात्र महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. वर्षातील मुख्य सण म्हणूनही नवरात्रीला महत्त्व दिले जाते. नवरात्री साजरी करण्याची एक वेगळी पद्धत गोसावी समाजात आहे. हे लोक नवरात्रीच्या वेळी घरात राहात नाहीत, तर दहा दिवस आपली घरंदारं सोडून दूर मैदानात किंवा उघड्या माळरानावर राहातात. तिथे देवीची पूजा बांधतात. दहा दिवस कडक उपवास करतात आणि अकराच्या दिवशी देवीच्या नावाने बकरे कापून सर्वजण देवीला मांसाचा नैवेद्य दाखवून मगच दहा दिवसांचा उपवास सोडतात आणि आपापल्या घरी निघून जातात.

गोसावी समाज हा हिंदूधर्मीय समाज आहे, याची विवाहाची पद्धतही हिंदू-पद्धत आहे. होमहवन, मंगलाष्टके, सप्तपदी आदी सर्व प्रकार लग्नवेळी केले जातात. लग्न ब्राह्मणाकडूनच लावले जाते. विवाहप्रसंगी हुंडा देण्या-घेण्याची प्रथा समाजात नाही. मुलामुलीच्या घरच्यांनी लग्नाचा खर्च विभागून करायचा असा पारंपरिक पंचायती ठराव त्या समाजात आहे. पूर्वी पाच-पाच दिवस लग्न चालत असे. हल्ली एक दिवसातच लग्न उरकले जाते. लग्नवेळी गोड जेवण देण्याची प्रथा या समाजात आहे.

गोसावी हा समाज हिंदूधर्मीय असला तरी, मृतास दहन करण्याऐवजी त्याचे दफन करण्याची प्रथा पूर्वीपासून या समाजात आहे. आणखी एक वेगळेपण म्हणजे या समाजात, मयतीनंतर बारा दिवस झाल्यावर, दहावा पाळला जातो. त्या दिवशी मृताच्या मुलाने दाढी-मिशी काढण्याची प्रथा आहे.

संन्याशाची परंपरा सांगणारा हा गोसावी समाज, आता पूर्णपणे गृहस्थी बनलेला आहे, असे दिसते. दाढी, केस, रुद्राक्षांच्या माळा आणि भगव्या कफन्या यांचा जवळजवळ त्या लोकांनी त्याग केलेला आहे. जे काम मिळेल ते करायचं आणि पोट भरायचं हाच त्यांचा दिनक्रम ठरलेला आहे. या समाजातील काही लोक आता एका ठिकाणी स्थिर होत आहेत. म्हशींचा व्यापार करण्याबरोबरच

आता ते शेती करू लागलेत. निरनिराळे व्यवसाय करू लागलेत. पोटासाठी वण-वण भटकंती सोडून एका ठिकाणी मिळेल तो घासतुकडा इज्जतीने मिळावा ही त्यांची इच्छा आहे, तसा त्यांचा प्रयत्न चालू आहे. कालचा संन्यासी आज नावापुरता 'गोसावी' उरलाय. हे त्यांच्या सांगण्यातलं तथ्य त्यांच्या प्रत्यक्ष भेटीत अनुभवायला मिळालं आणि भटक्यांच्यातील किमान एक जमात बदलत्या काळाचं भान ठेवून जगू लागलीय याचं थोडं समाधान वाटलं.



५. लवंगी गोसावी

संध्याकाळचे सहा वाजले असतील. घराच्या ओढीने मी घाईघाईने निघालेलो. अचानक थांबलो... कात्रज गावच्या पूर्वेला ओढ्यापासून थोड्या अंतरावर सात-आठ पालं ठोकलेली दिसली. प्रत्येक पालात तीन दगडाच्या चुली पेटलेल्या. चुलीच्या धुराने पालं आणि आजूबाजूचा परिसर धुरकटून गेलेला, चुलीपुढे बाया भाकरी थापत बसलेल्या, गडीमाणसं पालाच्या खुटल्याला टेकून रेलून बसलेली, काही पालाबाहेर जमिनीवरच आडवी झालेली. तिथंच चुलीभोवती नागडी–उघडी पोरं रेंगाळलेली, प्रत्येक पालागणिक चार–दोन कारवानी कुत्री जणू काही पालांना पहारा देत ठाकलेली.

मी न राहवून पालाजवळ जाऊ लागतो. तशी पहारा देणारी दहा–बारा कुत्री चवताळून अंगावर येतात. मी घाबरतो, त्यांना हटकतो. आमचा कालवा ऐकून पालातली दोन तगडी माणसं बाहेर येतात. त्यांच्या भाषेत काही तरी बडबडतात. तेव्हा, अंगावर चवताळलेली कारवानी कुत्री क्षणात मांजरासारखी त्यांच्या पायात लाडेलाडे घोटाळतात... 'कोन पायजी गाववाले?' माझ्या जवळ येत त्यांच्यातला एक तगडा इसम विचारतो. (अनोळखी माणसांना 'गाववाले' म्हणण्याची त्यांच्यातील पद्धत.)

मी येण्याचे कारण सांगतो, तेव्हा तो इसम पालातली फाटकी गोधडी आणून पालाबाहेर टाकतो. पालातले आणखी चार– पाच जण भराभर जमतात, माझ्या भोवतीने बसतात. मी विचारतो, क्षणभर कोणीच बोलत नाही. 'पाली उठवायला तर हा माणूस आला नसावा ना?' असा आविर्भाव चेहऱ्यावर आणून ते पाहात राहतात. थोड्या वेळाने बोलणे सुरू होते. त्यांच्यातील एकजण सांगायला लागतो. आम्ही लवंगी गोसावी! मूळचे डाडबुदुक पोलीस स्टेशन, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगरातले ... एका दमात त्याने सर्वांचा परिचय करून दिला.

लवंग विकणारे लवंगी

गोसाव्यांचे अनेक प्रकार आहेत. गोसावी, गिरी गोसावी, गाव गोसावी, डवरी गोसावी, दसनाम गोसावी आणि गाफा गोसावी. लवंगी गोसावी त्यांच्यातलाच एक प्रकार. या प्रकारांना त्यांनी स्वतंत्र जातींचे अधिष्ठान दिलेले. गोसाव्यांच्या पोटजाती म्हणून वरील प्रकारांना मानलेले. प्रत्येकाचा व्यवसाय वेगळा,

परंपरा वेगळी, खाणंपिणं वेगळं, भाषा वेगळी, देवदेवता वेगळ्या, जगणं–मरणं प्रत्येकाचं वेगळं, ... गोसावी म्हणून जगत असले तरी, आपापसात काडीचाही संबंध नसलेले असे हे गोसाव्यांचे पोटजात प्रकार. आपापल्या परीनं पिढ्यान्‌पिढ्या भटक्यांचे जीवन जगतात, आजही जगत आहेत. यापैकी काहींना कायमची स्थिरता लाभलीय, कामधंदे मिळालेत. तर बाकीचे, रानोमाळ पोटासाठी वणवण करीत भटकणारे.

लवंगी गोसावी हा असाच एक भटका समाज आहे. बाळी, बुगडी, नथी, मणी पोत, माळा घरोघर फिरून विकणारा आणि नाक–कान टोचण्याचा व्यवसाय करणारा असा हा समाज आहे. यांच्यातील काही मंडळी म्हशींचा व्यापार करणारेही आहेत. शेतकऱ्यांच्याकडून म्हशी घ्यायच्या, त्यांना वलंचिलं खाऊ–पिऊ घालायचं, चांगल्या तगडचा करायच्या आणि गाभण झाल्या की वेतापूर्वी विकायच्या. म्हशीच्या धंद्यावर यांच्यातले काही श्रीमंत झालेत. सावकारीचा व्यवसाय करू लागलेत. नाक-कान टोचून बाळचा–बुगडचा विकून जगणाऱ्यांना वेळ पडलीच तर शे-पाचशेची कर्जाची व्यवस्था करू लागलेत.

लवंगी गोसाव्यांचा मूळ व्यवसाय मसाल्यांचा. पूर्वीच्या काळी, लवंगाचा व्यापार करणारी म्हणून ही मंडळी प्रसिद्ध होती. वेश गोसाव्याचा आणि व्यापार लवंगाचा, त्यामुळे त्यांना लवंगी गोसावी या नावानेच ओळखले जात असे. पुढच्या काळात तेच त्यांचे जातनाव म्हणून कायम झाले. पुढे लवंगांचा आणि मसाल्याचा व्यापार थंडावला, गोसाव्याचा वेषही टाकून द्यावा लागला. पोटासाठी नवीन धंदा शोधला. कोण म्हशी विकू लागला, तर कोणी नाक–कान टोचून पोट भरू लागला. मात्र पूर्वीचे जातनाव 'लवंगी गोसावी' एवढेच काय ते कायम राहिले.

श्रद्धाळू समाज

दिसायला मराठमोळी असणारी ही मंडळी, भाषा मात्र गुजराथी बोलतात. बारकाईनं पाहिलं तर गुजराथी-मराठी अशी त्यांची सरमिसळ भाषा असल्याचे जाणवते. धंद्यासाठी मात्र ही मंडळी सर्रास मराठीचा वापर करतात. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात भटकंती असल्याने, महाराष्ट्रीय जनजीवनाचा परिणाम त्यांच्यावर आढळतो. महाराष्ट्रातील प्रसिद्ध खंडोबा, अंबाबाई, मरिआई, लक्ष्मीआई ही त्यांची कुलदैवते आहेत. या कुलदैवतांच्या नावाने उपासतापास करतात, नवस बोलतात, कोंबडी, बकरी कापतात. तसेच कुलदैवतांचे वारे अंगात येते असे ते सांगतात. देव-देवऋषी यांच्यावर त्यांचा प्रचंड विश्वास असल्याचे आढळते. कुटुंबात शिसंभासं झालं तर डॉक्टरांपेक्षा देव-देवऋषाकडूनच उपचार करून घेण्यात त्यांना विश्वास वाटतो

धर्माने हिंदू असलेली ही माणसे, हिंदू धर्मातील देव–देवतांच्या शिवाय, मुसलमानांच्या पिराला पूर्वीपासून मानतात. पीर हे त्यांच्या दृष्टीने सर्वात मोठे

दैवी स्थान मानलेले आहे. पिराचे ठाणे हे पवित्र समजात. पौष पौर्णिमेला भरणाऱ्या पिराच्या यात्रेत यांचा पहिला मान असतो. महालक्ष्मी, मरिआई जशा त्यांच्या अंगात येतात, तसे पिराचे वारे अंगात संचारत असते असे ते सांगतात.

सावंत, पवार आणि मकवाना या त्यांच्यातील प्रमुख कुळी आहेत. सावंत हे पिराचे भक्त असल्याने त्यांना लिंबू जवळ बाळगता येत नाही, घोडा पाळता येत नाही, शेळी ठेवता येत नाही. पिराला घोडा असल्याने पिराच्या भक्ताने घोडा वापरायचा अगर पाळायचा नाही असा संकेत आहे. आणि जर कोणी पाळला तर त्याचा वंश बुडतो अशी भावना आहे.

हे लोक रोजच्या पोटाचा व्यवसाय सांभाळून शिकारीला जातात. ससे, तरस, कोल्हा मारून खातात. मात्र डुकराला साधा दगडसुद्धा मारायचा नाही असाही त्यांच्यात पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला संकेत आहे. डुकराला दगड मारणे हे अशुभ समजले जाते.

जातपंचायतीचे वर्चस्व

इतर भटक्या समाजांप्रमाणे याही समाजात जातपंचायतीचे अस्तित्व आहे. समाजांतर्गत प्रमुख कार्यासाठी किंवा लग्नप्रसंगी जातपंचायतीला मानाचे स्थान दिले जाते. जातपंचायतीचे पंच हेच विवाहप्रसंगी मानपानाचे प्रमुख धनी असतात.

जातीअंतर्गत भांडण-तंटयाचा न्यायनिवाडा करणे, आर्थिक व्यवहार करताना कोणी जातीजातीत फसवणूक केली तर अशा व्यवहारात योग्य न्याय देणे हे काम पंचायतीच्या पाच पंचांना करावे लागते. किंवा जातीच्या स्त्री अथवा पुरुषाने जातीत किंवा जातीबाहेर अनैतिक संबंध ठेवले तर संबंधित व्यक्तींना जातीबहिष्कृत करण्याची शिक्षा जातपंचायत देते. जातपंचायतीला आंतरजातीय विवाह मान्य नाही. आणि जर एखाद्या व्यक्तीने असा विवाह करण्याचा प्रयत्न केला तर त्याला जातीतून बाहेर तर काढलेच जाते, याशिवाय त्या व्यक्तीचे संपूर्ण कुटुंब जातीबहिष्कृत केले जाते. अशा बहिष्कृत व्यक्तीशी आणि त्याच्या कुटुंबियांशी जमात कसलेही संबंध ठेवीत नाही.

लग्नप्रथा

या समाजातील विवाहाची प्रथा इतर भटक्या समाजांप्रमाणे नाही. विशेष म्हणजे विवाह नात्यात केले जात नाहीत. नात्यात लग्न केले तर पंचायत दोनशे रुपयांपर्यंत दंड करते. मात्र असा दंड भरून नंतर नात्यात लग्नाला मान्यता दिली जाते. लग्नसोहळा तीन दिवस चालतो. तीन दिवस हळदीचे म्हणून मानले जातात, नंतर लग्नविधी पार पडतो. लग्न ब्राह्मणाकडूनच लावले जाते. अनेकपत्नीत्वाची चाल या समाजात आहे.

लग्नप्रसंगी या समाजात हुंडा देण्या-घेण्याची प्रथा नाही. मात्र लग्नखर्च वीस

हजारांपर्यंतही करण्याची पद्धत आहे. लग्नवेळी नवऱ्याकडील आणि नवरीकडील मंडळींनी पंचायतीला 'साठ' रुपयांपर्यंत देणगी देण्याची प्रथा आहे. लग्नात चोरड्या, बाजूबंद, चांदीच्या अंगठ्या आणि चांदीचे मंगळसूत्र वापरण्याची पद्धत आहे. सोन्याचे दागिने वापरणे या समाजात अशुभ मानले जाते. मात्र ज्यांच्या पूर्वजाने पाच बकरे कापून समाजाला जेवण दिले असेल अशाच व्यक्तींना सोने वापरण्याची परवानगी आहे. अर्थात अशी माणसे या समाजात दुर्मिळ आहेत.

या समाजात ज्याचे कुलदैवत 'बोलाई' आहे अशी माणसे बकरे कापत नाहीत. पर्यायाने त्यांना सोने वापरता येत नाही. सोने वापरले तर कुटुंब खलास होते, कुटुंबातील माणसे मरतात अशी त्यांची भावना आहे. पाच बकरे कापण्यापेक्षा सोनं नको अशी त्यांची मानसिक अवस्था आहे.

या समाजात ज्यांना 'बोलाई' देवस्थान नाही अशांकडे किंवा प्रमुख कुळांत बकरे कापले जाते. घरात मूल जन्माला आल्यानंतर बकरे कापण्याचा रिवाज काही कुळांत आहे. विशेषत: मूल जन्मल्याच्या पाचव्या दिवशी बकरं कापून समाजाला जेवण दिले जाते. त्याला 'पाच दिवसांची पंचमी' म्हणतात.

मुलाचे जावळ काढतेवेळी दोन ते तीन बकरी कुलदैवतापुढे कापावी लागतात. बकऱ्याचा नैवेद्य कुलदैवतांच्या पुढे ठेवावा लागतो. असे केल्याने बाळाला इडा-पिडा होत नाही असे मानले जाते.

लवंगी गोसावी हा हिंदूधर्मीय समाज असला तरी हे लोक प्रेताचे दहन करत नाहीत, मुसलमानांप्रमाणे प्रेताचे दफन करतात. मात्र हिंदूंप्रमाणे दहावा पाळतात. समाजाला दहाव्या दिवशी जेवण देतात. मयतीनंतर सर्व समाजात तीन दिवसांचे सुतक पाळतात. त्या तीन दिवसांत दारू पिणे पूर्ण बंद केले जाते.

शिमगा मोठा सण

या समाजाचा सर्वात मोठा सण म्हणून शिमगा मानला जातो. शिमग्याच्या सणादिवशी सर्व व्यवहार बंद केले जातात. पाच दिवस शिमगा साजरा केला जातो. या पाच दिवसांत नाच, गाणी केली जातात. खाणे–पिणे भरपूर केले जाते. वर्षाकाठी फक्त शिमग्याच्याच दिवशी समाजातल्या स्त्रियांना दारू पिण्याची परवानगी दिली जाते. स्त्री-पुरुष मिळून मनसोक्त दारू पितात. नाचगाणी करतात. शिमग्याचा सण स्त्रियांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. पुरुषांच्या बरोबरीनं त्याचदिवशी स्त्रीला मनसोक्त स्वातंत्र्य उपभोगायला मिळतं. बाकी वर्षाचे तीनशे चौसष्ठ दिवस घरचं काम, पोरांचा सांभाळ आणि म्हशींना चारापाणी करण्यात त्या गढून गेलेल्या असतात.

उपेक्षित जीवन

पिढ्यान्‌पिढ्या भटकंती करून कशीबशी जगणारी माणसं स्वातंत्र्यातील

आपल्या घटनात्मक हक्कांना वंचित झालेली आहेत. यांना मतदानाचा हक्क नाही. त्यांच्या अस्थिर जीवनामुळे जातीचे दाखले मिळत नाहीत. शिधापत्रिका नाही, कायमचा निवारा नाही, सतत भटकंतीमुळे शिक्षणाचा संबंध नाही. आपले पोट भले नि आपण भले, इतकंच जगणं. ज्या गावात पोट भरेल तिथं चार दिवस पालं ठोकायची, पोटाला काही मिळालं नाही की पालं उचकटून दुसऱ्या गावाचा रस्ता धरायचा. मरण येईपर्यंत जगायचं आणि जगण्यासाठी वणवण भटकत राहायचं. वर्षानुवर्षे जीवनाचं रहाटगाडगं फिरवत राहायचं !

'आसं हाय बगा आमचं पुथी पुराण' असा शेवट करून एकाने बैठक मोडली. तेव्हा चांगलं कडूसं पडलं होतं. चोहोबाजूला काळोख दाटला होता. पालातल्या चुली थंडावल्या होत्या. अंधारातच आम्ही बडबडत होतो बैठकीतनं एकेकजण उठायला लागला तेव्हा मीही उठलो, आणि 'उद्या तुमचा फोटो काढायला येईन' असं सांगून त्यांचा निरोप घेतला.

दुसरे दिवशी, फोटोवाला सकाळी नऊ वाजेपर्यंत येईल असे सांगून यावे या उद्देशाने सहा वाजता पालाकडे निघालो तेव्हा पालं उखडून आवराआवर चालू होती. पालांचं कलतान, जर्मनची भांडीकुंडी आणि लाकुडफाटा डोक्यावर घेऊन अर्धी-अधिक माणसं रस्त्याला लागली होती. बायापोरं पुढच्या मुक्कामाला निघाली होती. हे निघून गेल्यावर फोटो काढायचा कोणाचा, या संभ्रमात मी काही क्षण नुसताच पहात उभा. न राहवून त्यांच्यापैकी एकाला मी विचारलं- 'कुठे निघालात?' तेव्हा सामानाची बांधाबांध करीत, माझ्याकडे न पाहाताच, तो म्हातारा माणूस पुटपुटला, 'म्होरच्या ठिकान्याला.' त्यावर मी म्हटलं, ' तुमचा फोटो काढून पेपरात छापायला द्यायचाय. तास, दोन तास थांबाल तर फोटो काढता येईल.'

माझं फोटो प्रकरण ऐकून त्याने हातातले काम ठेवले आणि माझ्याकडे पाहात म्हणाला, ' गाववाले, फुटू काढून आन् पेपरात छापून आमचा का पॉट भरनार हाय ? हतं पॉट भरंना म्हून म्होरच्या वस्तीला निघालूय. फुटू काढण्यापरास पॉटाची काय तरी यवस्था करा.'

इतकं बोलून तो पुन्हा आवराआवर करू लागला. पालं मोडली. सारी माणसं निघून गेली. तीन दगडांच्या चुलीकडे पाहात मी कितीतरी वेळ तिथंच उभा होतो.

⁂

हजारांपर्यंतही करण्याची पद्धत आहे. लग्नवेळी नवऱ्याकडील आणि नवरीकडील मंडळींनी पंचायतीला 'साठ' रुपयांपर्यंत देणगी देण्याची प्रथा आहे. लग्नात चोरडचा, बाजूबंद, चांदीच्या अंगठ्या आणि चांदीचे मंगळसूत्र वापरण्याची पद्धत आहे. सोन्याचे दागिने वापरणे या समाजात अशुभ मानले जाते. मात्र ज्यांच्या पूर्वजाने पाच बकरे कापून समाजाला जेवण दिले असेल अशाच व्यक्तींना सोने वापरण्याची परवानगी आहे. अर्थात अशी माणसे या समाजात दुर्मिळ आहेत.

या समाजात ज्याचे कुलदैवत 'बोलाई' आहे अशी माणसे बकरे कापत नाहीत. पर्यायाने त्यांना सोने वापरता येत नाही. सोने वापरले तर कुटुंब खलास होते, कुटुंबातील माणसे मरतात अशी त्यांची भावना आहे. पाच बकरे कापण्यापेक्षा सोनं नको अशी त्यांची मानसिक अवस्था आहे.

या समाजात ज्यांना 'बोलाई' देवस्थान नाही अशांकडे किंवा प्रमुख कुळांत बकरे कापले जाते. घरात मूल जन्माला आल्यानंतर बकरे कापण्याचा रिवाज काही कुळांत आहे. विशेषत: मूल जन्मल्याच्या पाचव्या दिवशी बकरं कापून समाजाला जेवण दिले जाते. त्याला 'पाच दिवसांची पंचमी' म्हणतात.

मुलाचे जावळ काढतेवेळी दोन ते तीन बकरी कुलदैवतापुढे कापावी लागतात. बकऱ्याचा नैवेद्य कुलदैवतांच्या पुढे ठेवावा लागतो. असे केल्याने बाळाला इडा-पिडा होत नाही असे मानले जाते.

लवंगी गोसावी हा हिंदूधर्मीय समाज असला तरी हे लोक प्रेताचे दहन करत नाहीत, मुसलमानांप्रमाणे प्रेताचे दफन करतात. मात्र हिंदूंप्रमाणे दहावा पाळतात. समाजाला दहाव्या दिवशी जेवण देतात. मयतीनंतर सर्व समाजात तीन दिवसांचे सुतक पाळतात. त्या तीन दिवसांत दारू पिणे पूर्ण बंद केले जाते.

शिमगा मोठा सण

या समाजाचा सर्वात मोठा सण म्हणून शिमगा मानला जातो. शिमग्याच्या सणादिवशी सर्व व्यवहार बंद केले जातात. पाच दिवस शिमगा साजरा केला जातो. या पाच दिवसांत नाच, गाणी केली जातात. खाणे–पिणे भरपूर केले जाते. वर्षाकाठी फक्त शिमग्याच्याच दिवशी समाजातल्या स्त्रियांना दारू पिण्याची परवानगी दिली जाते. स्त्री-पुरुष मिळून मनसोक्त दारू पितात. नाचगाणी करतात. शिमग्याचा सण स्त्रियांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. पुरुषांच्या बरोबरीनं त्याचदिवशी स्त्रीला मनसोक्त स्वातंत्र्य उपभोगायला मिळतं. बाकी वर्षाचे तीनशे चौसष्ठ दिवस घरचं काम, पोरांचा सांभाळ आणि म्हशींना चारापाणी करण्यात त्या गढून गेलेल्या असतात.

उपेक्षित जीवन

पिढ्यान्‌पिढ्या भटकंती करून कशीबशी जगणारी माणसं स्वातंत्र्यातील

आपल्या घटनात्मक हक्कांना वंचित झालेली आहेत. यांना मतदानाचा हक्क नाही. त्यांच्या अस्थिर जीवनामुळे जातीचे दाखले मिळत नाहीत. शिधापत्रिका नाही, कायमचा निवारा नाही, सतत भटकंतीमुळे शिक्षणाचा संबंध नाही. आपले पोट भले नि आपण भले, इतकंच जगणं. ज्या गावात पोट भरेल तिथं चार दिवस पालं ठोकायची, पोटाला काही मिळालं नाही की पालं उचकटून दुसऱ्या गावाचा रस्ता धरायचा. मरण येईपर्यंत जगायचं आणि जगण्यासाठी वणवण भटकत राहायचं. वर्षानुवर्षे जीवनाचं रहाटगाडगं फिरवत राहायचं !

'आसं हाय बगा आमचं पुथी पुराण' असा शेवट करून एकाने बैठक मोडली. तेव्हा चांगलं कडूसं पडलं होतं. चोहोबाजूला काळोख दाटला होता. पालातल्या चुली थंडावल्या होत्या. अंधारातच आम्ही बडबडत होतो बैठकीतनं एकेकजण उठायला लागला तेव्हा मीही उठलो, आणि 'उद्या तुमचा फोटो काढायला येईन' असं सांगून त्यांचा निरोप घेतला.

दुसरे दिवशी, फोटोवाला सकाळी नऊ वाजेपर्यंत येईल असे सांगून यावे या उद्देशाने सहा वाजता पालाकडे निघालो तेव्हा पालं उखडून आवराआवर चालू होती. पालांचं कलतान, जर्मनची भांडीकुंडी आणि लाकुडफाटा डोक्यावर घेऊन अर्धी-अधिक माणसं रस्त्याला लागली होती. बायापोरं पुढच्या मुक्कामाला निघाली होती. हे निघून गेल्यावर फोटो काढायचा कोणाचा, या संभ्रमात मी काही क्षण नुसताच पहात उभा. न राहवून त्यांच्यापैकी एकाला मी विचारलं- 'कुठे निघालात?' तेव्हा सामानाची बांधाबांध करीत, माझ्याकडे न पाहाताच, तो म्हातारा माणूस पुटपुटला, 'म्होरच्या ठिकान्याला.' त्यावर मी म्हटलं, ' तुमचा फोटो काढून पेपरात छापायला द्यायचाय. तास, दोन तास थांबाल तर फोटो काढता येईल.'

माझं फोटो प्रकरण ऐकून त्याने हातातले काम ठेवले आणि माझ्याकडे पाहात म्हणाला, ' गाववाले, फुटू काढून आन् पेपरात छापून आमचा का पाँट भरनार हाय ? हतं पाँट भरंना म्हून म्होरच्या वस्तीला निघालूय. फुटू काढण्यापरास पाँटाची काय तरी यवस्था करा.'

इतकं बोलून तो पुन्हा आवराआवर करू लागला. पालं मोडली. सारी माणसं निघून गेली. तीन दगडांच्या चुलींकडे पाहात मी कितीतरी वेळ तिथंच उभा होतो.

६. नाथपंथी डवरी गोसावी

संन्याशाचा वेष धारण करून देवाच्या नावाने भिक्षा मागणारे आणि त्या भिक्षेवरच पिढ्यान् पिढ्या उपजीविका करणारे अनेक भटके लोक महाराष्ट्रात आहेत. भिक्षा मागून जगणे हा जणू काही आपला जन्मसिद्ध हक्कच आहे अशा आविर्भावात हे लोक भटकत असतात. भिक्षा मागणे हाच प्रमुख व्यवसाय किंवा जगण्याचं प्रमुख साधन असे ते समजतात.

महाराष्ट्रात संन्यस्त वृत्तीने भिक्षा मागणारांच्या अनेक तऱ्हा आहेत. कोण कपिली गाईला सोबत घेऊन दारोदार हिंडतो, तर कोणी गळचात देवादिकांच्या तसबिरी अडकवून भटकत असतो, तर काही जण हत्तीवर बसून भिक्षा मागतात. कोणी अंगाला भस्म फासतो तर कोणी गळचात छोटी पेटी अडकवून नाथांची भजने म्हणत भिक्षा मागतो. काही जण गळचात रुद्राक्षाच्या माळा, कपाळाला भस्म, हातात त्रिशूळ, पायात खडावा अशा वेषात भिक्षा मागतो. कोणी स्वतःला संन्याशी समजतो, कोणी तपस्वी तर कोणी विशिष्ट देवाचा सेवक, तर कोणी मच्छिंद्रनाथांचा अवतार समजून 'अलक्‌निरंजन आदेश' असे ओरडत भोळचाभाबड्या माणसांच्या श्रद्धेला हात घालून पैसे, धान्य अथवा जुनीपानी वस्त्रं दान म्हणून मागत असतो.

हे विस्ताराने लिहिण्याचे कारण असे की, वरील निरनिराळचा प्रकारांतील संन्यस्त वेषातील गोसावी मंडळी. प्रत्येक जण स्वतंत्र असल्याचे सांगतो. आपली जात, आपला पंथ, आपला समाज वेगळा असल्याचे सांगतो. हे लोक आपापसात कसलेही व्यवहार करीत नाहीत. यांच्यापैकी काही मंडळी बालब्रह्मचारी असल्याचं सांगतात तर काही प्रपंचातून परमार्थाकडे वाटचाल करतोय असे भासवतात. भिक्षेपुरती भगवी वस्त्रं घालायची, बाकी सर्वकाळ शर्ट, धोतर किंवा पँट अशा ग्रामीण अथवा आधुनिक पोषाखात वावरायचं हे यांच्यापैकी काही भिक्षेकऱ्यांचं वैशिष्ट्य आहे. नाथपंथी डवरी गोसावी हा असाच एक प्रपंच करीत संन्याशी वेषात भिक्षा मागून पोट भरणारा समाज आहे.

भिक्षा हाच व्यवसाय

या समाजाला महाराष्ट्रात काही भागात 'जोगी' तर काही भागात नाथपंथी किंवा डवरी गोसावी या नावाने ओळखतात. भगवे धोतर, अंगात भगवा शर्ट,

गळ्यात खैलिशैलशिंगी, गळ्यात रुद्राक्षाची माळ, कपाळाला चंदनाचे पुंड, हातात डमरू अडकविलेले त्रिशूळ असा या लोकांचा भिक्षा मागण्याचा अवतार. हे लोक स्वत:ला नाथपंथीय संन्याशी म्हणवून घेतात. भिक्षा मागताना डमरू अडकविलेले त्रिशूळ घेतात म्हणून ते आपली ओळख 'डमरू' किंवा डवरी गोसावी अशी सांगतात. या समाजातील पुरुष मंडळी किंवा जाणती मुलंच असा वेष घालून भटकत असतात. यांच्या स्त्रिया प्रपंच सांभाळण्याचं काम करतात. भिक्षा मागण्याच्या उद्देशाने हे लोक सतत गावोगावी भटकत असतात, त्यांच्याबरोबर त्यांच्या बायका-पोरांचं लचांडही सतत भटकत असतं.

नाथपंथी डवरी गोसावी हा समाज मूळचा महाराष्ट्रातला असून ते आपली जन्मभूमी सांगली-सातारा भागात असल्याचे सांगतात. त्यांची मातृभाषा मराठी असून व्यवसायाच्या वेळी इतर लोकांशी व्यवहार करायचा असेल तर हे लोक आपापसात इतरांना न समजेल अशा सांकेतिक भाषेत बोलतात. त्या भाषेला ते 'पारूशी' भाषा असे म्हणतात.

या समाजात सात आणि पाच अशा बारा कुळचा मानल्या जातात. बारा कुळांचा हा समाज आहे असे ते सांगतात. त्यात प्रामुख्याने चव्हाण, कोष्ठा, सितोळा, जगताप, तांववा, माळवा आणि आहेर या सात कुळी आणि सावंत, सेगर (लांडा-पला), बोडका, लगज, बावर या पाच कुळी मानल्या गेलेल्या आहेत. याशिवाय शिंदे आडनावाचं एक स्वतंत्र कूळ मानलं गेले आहे. शिंदेच्या पोटात गुंजाळ, मोरे, पंवार या तीन पोटआडनावांचा समावेश आहे. शिंदे आडनावाच्या लोकांना या समाजात मानाचं स्थान आहे. शिंदे या समाजातील लोक 'पाटील' समजले जातात.

नाथपंथी डवरी गोसावी या समाजाचे मुख्य कुलदैवत 'काळ भैरवनाथ' हे असून त्याची गुरुगादी सोनारी येथे उस्मानाबाद जिल्ह्यात असल्याचे सांगितले जाते. वर्षातून एकदा या समाजातील लोक आपल्या कुलदैवताचे दर्शन घेण्यासाठी सोनारीला जातात. लग्नानंतर, मूल जन्मल्यानंतर अथवा शुभ कार्यानंतर कुलदैवताचा आशीर्वाद घेण्यासाठीही या समाजातील लोक तेथे जात असतात.

हा समाज नाथपंथीय असल्याने नाथ, (किंवा काळ भैरवनाथ) यांचे कारुंड्याला असलेले ठाणे हे समाजाचे तीर्थक्षेत्र मानले जाते. कारुंड्याला वर्षातून एकदा नाथांची मोठी जत्रा भरते. त्यावेळी महाराष्ट्रातील अनेक लोक त्या जत्रेत येतात. तेथे जातपंचायत बसविणे, खऱ्याखोट्याचा निवाडा करणे, लग्न व्यवहार जमविणे किंवा मोडणे, तसेच समाजातील गुन्हेगारास (समाजात गुन्हा केलेल्या व्यक्तीस) त्याच्या गुन्ह्याचा जाब विचारण्यास किंवा आपली कैफियत मांडण्यास मोठ्या संख्येने या समाजातील लोक कारुंड्याला जमतात. त्याला ते 'यव्हार' असे म्हणतात. 'कारुंडे' हे या समाजाचे सुप्रीम कोर्ट समजले जाते.

कारुंड्याचा नाथ नवसाला पावतो अशी या लोकांची श्रद्धा आहे. नाथाला नवस करणे, त्याच्या नावाने उपासतापास करणे किंवा नवस फेडण्यासाठी गुलाल

खोबरं उधळणे असे प्रकार जत्रेत केले जातात. जर एखादी व्यक्ती आजारी असेल आणि नाथाला नवस करून ती बरी झाली असेल तर त्या व्यक्तीच्या वजनाचा गुलाल नाथावर उधळण्याची प्रथा या समाजात आहे.

इतर भटक्या समाजाप्रमाणे या समाजातही जात पंचायतीचं अस्तित्व अजून टिकून आहे. पंचायतीच्या प्रमुखास पाटील असे म्हणतात. समाजातील लग्नव्यवहार पाहणे, भांडणतंटा मिटविणे किंवा समाजबाह्य, जातपंचायतीच्या पारंपरिक अलिखित नियमांना डावलून एखादे कृत्य करणारांना समाजबहिष्कृत करणे किंवा काही रक्कम दंड करणे अशी कामे पंचायतीला करावी लागतात.

विचित्र शिक्षा

या समाजात अनैतिकतेला थारा नाही असे एकाने सांगितले. समाजातील एखाद्या व्यक्तीने समाजातीलच बाई तिच्या मनाविरुद्ध पळवून नेली तर पळविणाऱ्या व्यक्तीस पंचायत बारा रुपये दंड करते. बारा रुपये हा या समाजात नामुष्कीचा दंड समजला जातो. त्यामुळे मरण बरे पण बारा रुपये दंड नको, असे लोक म्हणतात.

या समाजात परंपरेने चालत आलेली आणखी एक विचित्र प्रथा आहे. एखाद्या व्यक्तीने त्याच्या सख्ख्या भावाची बायको भावाच्या मृत्यूनंतर पत्नी म्हणून स्वीकारली किंवा तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले आणि लग्न केले तर अशा व्यक्तीचे उजवे कल्ले आणि डावी मिशी जातपंचायत काढून टाकते किंवा त्याला काढण्यास भाग पाडते. याशिवाय त्याला दोनशे नव्वद रुपये दंड केला जातो आणि बाईकडून साठ रुपये दंड म्हणून वसूल केला जातो. याशिवाय जातपंचायतीला तीन पागोटी, तीन चंदनाचे पाट, साडेतीनशे रुपयांचे बकरे, दंड म्हणून द्यावे लागते. बकरे कापून संपूर्ण समाजाला जेवण दिले जाते.

वरील गुन्ह्याची शिक्षा एवढं करूनही पूर्ण होत नाही, तर समाज जेवण करतेवेळी एक मातीचे मडके आणतात. जेवणाचं उष्टं त्या मडक्यात भरतात आणि ते मडके गुन्हेगार व्यक्तीच्या डोक्यावर ठेवून फोडतात.

मात्र अशा गुन्हेगार व्यक्तीस समाजात पुन्हा घेतेवेळी त्याच्या तोंडात देवाचा अंगारा घालून त्याला शुद्ध केले जाते आणि समाजात घेतले जाते.

नाथपंथी डवरी गोसावी हा समाज हिंदू धर्मीय असून त्यांचा विवाह हिंदू धर्मपद्धतीने होतो. पूर्वी गरोदर स्त्रीच्या पोटाला कुंकू लावून लग्न ठरवले जात असे. तसेच समाजात बालविवाह प्रथा रूढ होती. हल्ली असे विवाह होत नसल्याचे एकाने सांगितले.

या समाजात स्त्रियांना पुनर्विवाह करण्याची मुभा नाही. एखाद्या स्त्रीने विवाह केला आणि तिची तिच्या नवऱ्याजवळ नांदण्याची इच्छा नसेल तर अशा स्त्रीला लग्नाच्या पतीला सोडून दुसरा विवाह करता येत नाही. आणि तसा प्रयत्न

एखाद्या विवाहित महिलेने केलाच तर तिला समाजातून बहिष्कृत केले जाते. त्याला 'गोते' असे म्हणतात.

लग्नवेळी मुलाला हुंडा देण्याची प्रथा या समाजात नाही. उलट मुलाकडून मुलीला काही रक्कम लग्नखर्चासाठी द्यावी लागते. त्याला 'दयाज' असे म्हणतात.

मुलाचा जन्म होणे हे या समाजात आनंदाचे मानले जाते. मुलाच्या जन्माचे वेळी डाळभाताचे जेवण करतात. गव्हाचे पाच मुटके आणि पाच दामट्या करतात आणि एका गाडग्यात घालून शिजवतात.

मुलाच्या पाचवीला 'पुकारे' नावाचा विशिष्ट विधी केला जातो. मुलाचा बाप मुलाच्या पाचवीला अंगणात येऊन फुंकणी फुंकतो आणि समाजातील बारा कुळांच्या नावाने ओरडून 'जेवायला यावं गंगा मायऽऽऽ' असे म्हणत फुंकणी फुंकतो.

मैतीची प्रथा

या समाजातील मैतीची प्रथा वेगळी आहे. हे लोक हिंदू धर्मीय असले तरी प्रेताचे दहन न करता सरसि दफन करतात.

प्रेताला चादरीत किंवा गोधडीत झोळी करून ती बांबूला अडकवून स्मशानात किंवा दफनाचे जागी नेतात. ज्या घरात प्रेत होते त्या घरात सुतक म्हणून कसलेही धुणे धुतले जात नाही. सुतक तीन दिवसांचे मानून त्या काळात डाळ-रोटीचा नैवेद्य प्रेताला पुरले त्या ठिकाणी दाखवला जातो. मृत्यूनंतर शुद्ध होण्यासाठी सहा महिन्यांच्या आत बोकड कापून समाजाला जेवण द्यावे लागते. मात्र मृताच्या घरी सहा महिने सुतक म्हणून मांस खाल्ले जात नाही. सुतकात किंवा मृत्यूनंतर त्याच्या नातेवाईकांचे केस, दाढी कापली जात नाही. हे लोक नाथपंथीय असल्याने केस, दाढी कापणे अशुभ मानले जाते.

मृत माणसाचं स्मरण म्हणून त्याच्या नावाने चांदीचे मुखवटे करून देव्हाऱ्यात ठेवण्याची प्रथा आहे. त्याला ते 'टाक' असे म्हणतात. या समाजात प्रत्येकाच्या घरी असे देव्हारे आणि टाक पहावयास मिळतात.

असा हा नाथपंथी डवरी गोसावी समाज परंपरागत अनेक विचित्र रूढी परंपरा उराशी बाळगून भिक्षेवर जगतो आहे. मरिआई, शिपित्री आई, महोची आई, लक्षी आई, राशनची आई आणि मालकेश्वरची आई या परंपरागत दैवतांना साथीला घेऊन आजही तो 'अलक्‌निरंजन आदेश' असा पुकारा करीत, संन्यासी वेषात, देवाच्या नावाने दारोदार भिक्षा मागत भटकतो आहे. त्याला वाईट रूढी-परंपरेच्या आणि अंधश्रद्धेच्या गर्तेतून बाहेर काढून खऱ्या माणसांचं जगणं जगण्याचा आदेश कोण देणार हा खरा प्रश्न आहे.

❋

७. रावळ समाज

परंपरेने संन्यासी वृत्तीने जगणारे आणि नाथपंथीय अशी स्वतःची ओळख सांगणारे अनेक भटके समाज महाराष्ट्रात आहेत. त्यांना गोसावी, संन्यासी किंवा जोगी अशा वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. या समाजांनी नाथ परंपरेतील मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, कानिफनाथ, जालिंदरनाथ, चौरंगी नाथ, रेवणनाथ, नागनाथ आणि अडभंग नाथ या नवनाथांना आपले आद्य पुरुष किंवा गुरू मानलेले आहेत.

रावळ समाज हा नवनाथ परंपरेतील एक आहे. नागनाथ हे या समाजाचे मूळ पुरुष मानले जातात. नागनाथाच्या नावाने विशिष्ट प्रकारे दीक्षा घेऊन आयुष्यभर संन्यासी वृत्तीने राहून दारोदार भिक्षा मागून स्वतःचा चरितार्थ चालविला जातो. रानावनात भटकणे, गावोगाव फिरणे आणि मंत्रतंत्र व चमत्कार करून दाखवून आपली उपजीविका करणे हे यांचे वैशिष्ट्य सांगितले जाते.

रावळ हा समाज नागनाथांना आपला मूळ पुरुष किंवा आद्य पुरुष मानीत असला तरी या समाजात नागनाथांचे शिष्य म्हणून अन्य काही समाजातील संन्यासी पुरुषांनाही गुरुस्थानी मानलेले आहे. त्यात एकनाथ, धरमनाथ, विश्वनाथ, आदिनाथ, तुळशीनाथ, कैलासनाथ आणि उद्धवनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. या सर्व नाथ पंथीय रावळ पुरुषांच्या महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी गाद्या (मठ) किंवा मुख्य ठाणी असल्याचे सांगितले जाते. हे लोक संन्यासी असून सत्पुरुष असल्याचे या समाजातील लोक सांगतात. चमत्कार करण्यात हे लोक अत्यंत हुशार असल्याचेही सांगण्यात येते. अर्थात हे सर्व गुरुंबद्दल असणाऱ्या आदरापोटी किंवा अंधश्रद्धेपोटी सांगितले जाते. मात्र समाजातील लोकांची त्यावर श्रद्धा आहे.

वरील नाथ पंथी गुरुंच्या शिवाय इचलकरंजी येथे बाळनाथ यांची गादी, कोल्हापूर येथे शंकरनाथांची गादी असल्याचे सांगण्यात येते.

रावळ समाजाची मूळ परंपरा मात्र यापेक्षा काही वेगळी असल्याचेही त्या समाजातील काहीजण सांगतात. १२ व्या शतकानंतर मुख्यतः रावळ समाज नाथपंथीय झाल्याचे सांगितले जाते. त्यापूर्वी मात्र हा समाज इतर समाजाप्रमाणेच पिढ्यान् पिढ्याच्या वेगळ्या व्यवसायात रमलेला होता, आपले पारंपरिक व्यवसाय करीत उपजीविका करणारा समाज होता. याविषयी माहिती सांगताना या समाजातील के. एस. काळे (पुणे) म्हणाले, आम्ही रावळ मूळचे राजस्थानातले. त्या काळात

कोष्टी लोकांचा कापड विणण्याचा धंदा आम्ही करत असू. विशेषत: विणकामासाठी लागणाऱ्या नक्षी कामाच्या फण्याचे डिझाईन तयार करण्याचे काम आमचे पूर्वज करीत असत. परंतु त्या काळातील यवनांच्या वारंवार होणाऱ्या स्वाऱ्या आणि मुस्लिम धर्मांतराच्या भीतीने आमचे पूर्वज राजस्थानातून परागंदा झाले. त्यांनी नाथ पंथाची दीक्षा घेतली आणि भगवी वस्त्रे घालून, केस दाढी वाढवून, संन्यासी वेशात दारोदार भिक्षा मागून उपजीविका केली. नंतरच्या काळात महाराष्ट्रात तीच परंपरा सुरू झाली. आणि मूळचा राजस्थानी रावळ समाज नाथपंथी रावळ समाज म्हणून ओळखला जाऊ लागला. आणि 'भैरवी झोळी' हेच उपजीविकेचे मुख्य साधन झाले.

'अलक् निरंजन आदेश' असे म्हणत दारोदार फिरणारा संन्यासी पाहिला की दारी नाथांची स्वारी आली म्हणून, पुण्य पदरात पडावे या भावनेने गोसाव्याच्या झोळीत पीठ, मीठ किंवा धान्य देऊन श्रद्धाळू लोक धन्य होतात. परंतु दारी येणारा जटा-केस वाढविलेला, भगव्या वस्त्रातला संन्यासी किंवा गोसावी हा एकाच भटक्या जमातीचा असतो असे नाही. त्यात डवरी गोसावी आहेत, लवंगी, भारती, गिरी, गोसावी आणि रावळ नाथ जोगी आहेत. यांची संन्यासी परंपरा सारखी असली तरी समाज वेगळे आहेत. त्यामुळे आपापसात कसल्याही प्रकारचे संबंध हे लोक ठेवीत नाहीत. परंपरा संन्यासाची असली तरी सर्व समाज संन्यासी असतो असे नाही. गृह–प्रपंच करूनही परंपरा जोपासणारे अनेक समाज आहेत. त्यांच्यात लग्न संबंध किंवा अन्य संबंध केले जात नाहीत असे या समाजातील एकाने सांगितले.

इतर भटक्या विमुक्त समाजाप्रमाणे रावळ समाजातही जात पंचायत अस्तित्वात आहे. जात पंचायतीचे अलिखित पारंपरिक नियम आजही या समाजात काटेकोरपणे पाळले जातात. समाजात चोरी करणे, खोटे बोलणे किंवा दुसऱ्या समाजातील बाई पळवून आणणे किंवा लग्नाशिवाय घरात बाई ठेवणे अशा प्रकारच्या घटना जात पंचायत गुन्हा ठरवते आणि संबंधित व्यक्तीस शिक्षा करते. वाळीत टाकणे किंवा समाजातून बहिष्कृत करणे ही सर्वात भयानक शिक्षा मानली जाते. कारण, वाळीत टाकलेल्या किंवा बहिष्कृत केलेल्या व्यक्तीबरोबर किंवा त्याच्या कुटुंबाबरोबर समाज कसलेही संबंध ठेवीत नाही. लग्नकार्ये किंवा मैतीच्या प्रसंगी समाज उपस्थित राहत नाही, असे सांगण्यात आले.

वर्षातून एकदा येणारी महाशिवरात्र हा या समाजाचा मोठा सण किंवा उत्सव मानला जातो. या दिवशी परळी वैजनाथ येथे महाराष्ट्रातील या समाजातील लोक एकत्र जमतात. जातपंचायतीचे न्यायनिवाडे याच ठिकाणी केले जातात.

विशेषत: महाशिवरात्रीस परळी वैजनाथ येथे होणाऱ्या जात पंचायतीच्या बैठकीत समाजातील अल्पवयीन मुलास गुरू केले जाते आणि त्याच्या समक्ष समाजातील भांडणतंटा मिटविला जातो; अशी माहिती समाजातील वरकुटे खुर्द (ता. इंदापूर) येथील श्री. सु. धों. राऊळ गुरुजी यांनी दिली.

रावळ समाजात काही प्रमुख कुळी मानल्या गेल्या आहेत त्यांत चव्हाण, जाधव, गळीतकर, गडदे, पवार, सकपाळ, सुकाळे, काळे या आडनावांचा समावेश होतो. या कुळांमध्ये आपापसात रोटीबेटी व्यवहार केला जातो. पूर्वी वरील कुळांत संन्यासी वृत्तीचे प्रमाण मोठे होते, परंतु गेल्या काही वर्षांपासून संन्यासी दीक्षा घेण्याचे प्रमाण खूपच कमी झालेले आहे.

पूर्वी या समाजात बाल विवाहाची प्रथा होती. मुलाने मुलीला लग्नखर्च म्हणून काही रक्कम देण्याचा रिवाजही या समाजात होता. या समाजातील लग्न सोहळा चार दिवस चालत असे. हळद, जेवण, लग्न आणि वरात अशी त्या दिवसांची वर्गवारी असे. लग्नादिवशी ब्राह्मणाने लग्न लावायचं आणि मंत्रपठण वगैरे धार्मिक विधी मात्र समाजाच्या गुरूने करायचे अशी या समाजात पद्धत आहे. नववधूवरांनी समाजगुरूंच्या मठात जाऊन त्यांचे आशीर्वाद घ्यायचे आणि मगच प्रपंचाला सुरुवात करायची अशी समाजधारणा आहे.

पूर्वी या समाजात आंतरजातीय विवाहाला बंदी होती. गेल्या काही वर्षांपासून असे विवाह होऊ लागले आहेत. समाजही अशा विवाहाला मान्यता देऊ लागलेला आहे. परंतु अशाप्रकारे आंतरजातीय विवाह केलेले लोकच समाजात मिसळत नाहीत किंवा समाजापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात, अशी तक्रारही या समाजातील एका कार्यकर्त्याने केली.

रावळ हा समाज संन्यासी परंपरा मानणारा आणि हिंदू धर्मीय असला तरी या समाजातील मृताचे दफन करण्याची पद्धत पूर्वीपासूनच समाजात रूढ आहे. इतर हिंदू धर्मीय समाजाप्रमाणे मृताचा दहावा अथवा बारावा पाळण्याची रीत या समाजात नाही, तर मृत व्यक्तीस दफन केल्यानंतर तिसरे दिवशी सावडण्याचा कार्यक्रम झाल्यावर आंघोळ करून भस्म लावले की मैतीचे सुतक संपले जाते. ही प्रथा आजही या समाजात रूढ आहे.

विशेषत: मैतीनंतर तिसरे दिवशी भस्म लावून सुतक सोडल्यानंतर केव्हाही आपल्या ऐपतीप्रमाणे मृताच्या नावाने दिवस घालता येतो. त्यादिवशी समाजातील संन्यासी गुरूकडून मंत्रपठण केले जाते. त्याला माळ लावणे असे म्हणतात. अशाप्रकारे माळ लावल्यानंतर समाजाला, नातेवाईकांना जेवण दिले जाते आणि दिवस साजरा केला जातो.

या समाजातील स्त्रिया या धार्मिक वृत्तीच्या असून अंधश्रद्धा जोपासणाऱ्या आहेत. या मूळच्या राजस्थानातल्या असल्या तरी राजस्थानी संस्कृतीचे कोणतेही वैशिष्ट्य आज त्यांच्याजवळ शिल्लक नाही. त्या पूर्णपणे महाराष्ट्रीय पद्धतीशी एकरूप झालेल्या आहेत.

रावळ समाजातील स्त्री ही श्रद्धाळू, धार्मिक वृत्तीची आहे. सणवार, उपासतापास, देवदेवता व त्यांचे नवस आदी सर्व प्रकारांत ती गुरफटून गेलेली आहे.

असा हा संन्यासी परंपरेतला रावळ समाज महाराष्ट्रात सर्वत्र आढळणारा

समाज आहे. स्वातंत्र्योत्तर काळात या समाजाची भटकंती वऱ्याच अंशी कमी झालेली आहे. त्यामुळे समाजातली संन्यस्त वृत्ती कमी झालेली आहे. शिक्षणाकडे हा समाज झुकलेला आहे. शिक्षण, सरकारी नोकऱ्या आणि खाजगी व्यवसायात रमणे हे या समाजातील तरुणांना आवडते. आता दाढी, केस वाढवून, अंगात कफनी घालून किंवा हातात त्रिशूळ व चिमटा घेऊन व सर्वांगाला भस्म फासून 'अलक्‌निरंजन आदेश' असे ओरडत दारोदार भिक्षेची झोळी फिरविण्यापेक्षा शारीरिक कष्टाची कामे करून इज्जतीने अर्धी भाकर मिळविण्याकडे तरुण पिढीचा कल दिसतो आहे. बदलत्या समाजावरोवर जाणे, स्वतःला आणि समाजाला बदलणे आणि बदलत्या काळाचं आव्हान स्वीकारणे हेच ध्येय आज या समाजातील जाणत्या, शिक्षित तरुणांचे आहे.

❊



८. भराडी गोंधळी

देवदेवतांच्या नावाने दारोदार भिक्षा मागून उपजीविका करणारे अनेक समाज किंवा लोकसमूह महाराष्ट्रात आहेत. त्यांत भोपे, आराधी, मरिआईवाले, वासुदेव, वाघ्या-मुरळी, जोगती, गाव गोंधळी आणि भराडी गोंधळी यांचा प्रामुख्याने समावेश होतो. यापैकी काही समाज गावगाड्यात राहून स्थिर जीवन जगणारे आहेत, तर काही सतत गावोगाव भटकत उपजीविका करणारे आहेत. 'भराडी गोंधळी' हा असाच सतत गावोगाव भटकणारा आणि देवीच्या नावाने गाणी म्हणत भिक्षा मागणारा समाज आहे. 'आईचे गोंधळी' या नावानेही त्यांना ओळखले जाते.

घरात सुख-समाधान मिळावं किंवा नवविवाहित जोडप्याचे भावी आयुष्य संपन्न जावे म्हणून खेड्यापाड्यातील लोक, लग्नानंतर, भराडी गोंधळ्यांना मुद्दाम आमंत्रण देऊन मानाने बोलावतात. तेव्हा देवीची गाणी गाऊन भराडी रात्र जागवतात. त्यांच्या त्या गाणी गाण्याच्या विशिष्ट कार्यक्रमाला 'गोंधळ घालणे' असे म्हणतात. अशा या गोंधळाच्या कार्यक्रमावरूनच या लोकांना 'गोंधळी' हे नाव रूढ झाल्याचे सांगितले जाते.

महाराष्ट्रात 'भराडी गोंधळी' या समाजाशिवाय 'गाव गोंधळी' या नावाने ओळखला जाणारा आणखी एक वेगळा समाज आहे. हा समाज गावगाड्याच्या आश्रयाने पिढ्यान् पिढ्या स्थिर जीवन जगतो आहे. भराडी गोंधळी आणि गाव गोंधळी हे दोन्ही समाज वेगवेगळे असून ते स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व सांगतात. या दोन्ही समाजांत 'गोंधळी' नावाचे साम्य असले तरी, देवीच्या नावाने भिक्षा मागण्याच्या तऱ्हा वेगवेगळ्या आहेत. त्यांच्यात कसल्याही प्रकारे रोटी– बेटी व्यवहार होत नसल्याचे सांगण्यात आले. 'गाव गोंधळी' हा गावच्या देवीचा भगत म्हणून ओळखला जातो, तर 'भराडी गोंधळी' हा आईचा भटका 'भगत' म्हणून ओळखला जातो.

'भराडी गोंधळी' समाजातील लोकांची भिक्षा मागण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. हे लोक एकटे भिक्षा मागायला जात नाहीत, तर दोन व्यक्ती जोडीने भिक्षा मागतात. एकाच्या खांद्यावर गुडघ्यापर्यंत लोंबकळणारे 'संबळ' नावाचे वाद्य असते तर दुसऱ्याच्या गळ्यात कवड्यांच्या माळांचा पट, अंगात पायघोळ झगा, डोक्यावर वरती निमुळती कवड्यांची टोपी, पायात चाळ, कपाळावर हळदी–कुंक-

वाचा मळवट आणि हातात तुणतुणं असते. ही व्यक्ती ज्या घरात भिक्षा मागायची त्याच घरप्रमुखाचे नाव बोटांच्या विशिष्ट खुणा करीत संबळवाल्या व्यक्तीस सांगते. ती व्यक्ती खुणेने सांगितलेले नाव नेहमीच्या सरावाने ओळखते आणि संबळ वाजवून त्या नावाचा मोठमोठ्याने उद्‌गार करते. अशा प्रकारे, नावे ओळखत आणि आईची गाणी म्हणत हे लोक भिक्षा मागतात.

पूर्वीच्या काळी, संस्थानिकांचे आश्रित म्हणूनच भराडी गोंधळी राजाश्रयाने रहात असत. शत्रुपक्षाचे गुपित काढण्यासाठी किंवा हेरगिरी करण्याच्या कामी या लोकांची नेमणूक केली जात असे. परंपरेने चालत आलेल्या कलेच्या आधारे ही मंडळी, शत्रूच्या गोटात जाऊन, हेरगिरी करीत असत. ते देवीचे भक्त असल्याने त्यांना कोठेही प्रवेश मिळत असे. अशा हेरगिरीच्या कामाबद्दल त्यांना इनाम दिले जात असे. बोटांच्या खुणेची भाषा हेच यांचं हेरगिरीतील कलात्मक भांडवल समजले जात असे. त्याकाळी त्यांना सैन्यात मानाचे स्थान असे. मात्र नंतरच्या काळात, राजेशाही संपुष्टात आल्यावर, राजाश्रय न मिळाल्याने, हे लोक आपली परंपरागत कला हेच उपजीविकेचे प्रमुख साधन म्हणून गावोगावी पोट भरण्याच्या निमित्ताने भटकत राहिले. आजपर्यंत त्याच कलेवर ते जगत आहेत.

सततच्या भटकंतीमुळे अर्थातच, त्यांना एका ठिकाणी कधीच स्थिर जीवन लाभलं नाही. टोळ्याटोळ्यांनी भटकणे आणि पोट भरणे हाच त्यांचा जीवनक्रम कायम झाला. त्यामुळे स्वतःचा गाव नाही, शेतजमीन नाही, घर नाही अशी यांची अवस्था आहे.

इतर भटक्या विमुक्त समाजांप्रमाणे याही समाजात जात पंचायत आजही अस्तित्वात असल्याचे आढळते. जात पंचायतीच्या प्रमुखास 'पाटील' या नावाने ओळखले जाते. समाजांतर्गत भांडणतंटा, समाजातील लग्नकार्ये अशाप्रसंगी जात पंचायतीला प्रमुख स्थान असते. समाजातील प्रत्येक व्यक्तीस भिक्षा मागण्यास विभागून दिलेल्या गावाशिवाय जर ती व्यक्ती दुसऱ्याच्या गावात भिक्षा मागायला गेली तर अशा व्यक्तीस पंचायत दंड करते असे सांगण्यात आले.

समाजातील एखाद्या व्यक्तीने चोरी केली किंवा समाजातील बाईशी अनैतिक संबंध ठेवले तर खरे-खोटे करण्यास उकळत्या तेलातील पैसा काढण्याची पद्धत समाजात आहे. जो गुन्हेगार असेल त्याने, तेलातला पैसा काढून, आपण गुन्हेगार नाही हे सिद्ध करून दाखवावे लागते. उकळत्या तेलाच्या कढईतून पैसा काढताना व्यक्तीचा हात भाजला तर तो गुन्हेगार आहे असे समजून त्याला समाजातून बहिष्कृत केले जाते. त्याला वाळीत टाकणे असे म्हणतात. जात पंचायतीस 'यव्हार' असे म्हणतात.

समाजातील व्यक्तीचा गुन्हा सिद्ध झाल्यास जात पंचायत 'यव्हार' बसवते आणि संबंधित व्यक्तीस बारा रुपये दंड करते. बारा रुपये दंड हा या समाजातील नामुष्कीचा दंड समजला जातो. ज्याला बारा रुपये दंड होतो अशी व्यक्ती समा-

जात कवडी किंमतीची समजली जाते. त्यामुळे मरण बरे पण बारा रुपये दंड नको असे लोक म्हणतात. कारण ज्याला असा दंड होतो त्याच्या पुढच्या पिढ्याही समाजात कवडी किंमतीच्या– बहिष्कृत–समजल्या जातात.

भराडी गोंधळी या समाजात सावंत, शिंदे, चव्हाण आणि जगताप ही चार आडनावे प्रमुख कुळी म्हणून समजली गेली आहेत. या कुळांत आपापसात लग्न-व्यवहार होतात असे सांगण्यात आले.

तुळजापुरची भवानीमाता, काळूबाई या देवता या समाजाची कुळदैवतं असून, त्यांच्या नावाने हे लोक गोंधळाचे कार्यक्रम करतात. याशिवाय पुनवडीचा काळ भैरवनाथ, कारुंड्याचा नाथ, पांगाऱ्याचा नाथ ही त्यांची प्रमुख दैवते आहेत. वरील देवदेवतांचे देव्हारे या समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या घरात आढळतात. देवदेवतांचे वारे अंगात येते अशी या समाजात भ्रामक कल्पना आहे. देवाच्या नावाने उपास–तापास, नवस केले जातात, गुलाल–खोबरे उधळून देवाबद्दलची आपली भावना व्यक्त करतात, तर काही देवाला कोंबड्या–बकऱ्याचा बळी देऊन नवस फेडतात. दरवर्षी चैत्र पौर्णिमेला नाथाचा उरूस साजरा केला जातो. विशेषतः महाराष्ट्रातील कारुंडे या गावी नाथाची मोठी यात्रा भरते. या समाजातील लोक वर्षातून एकदा कारुंड्याला जमतात, तिथे जातपंचायतीचे 'यव्हार' केले जातात. विवाह जमविणे अथवा काडीमोड घेणे, किंवा समाजातील झगड्याचा निकाल लावण्याचे काम या ठिकाणी केले जाते. गावोगावच्या जत्रा ही भटक्या–विमुक्तांची लोकन्यायालये समजली जातात.

भराडी गोंधळी हा मूळचा महाराष्ट्रीयन समाज असून त्याची मातृभाषा मराठी आहे. मात्र स्वतःच्या पालातून बाहेर पडल्यानंतर भिक्षा मागताना इतरांना समजणार नाही अशा तऱ्हेची वेगळी सांकेतिक भाषा ते बोलतात. त्या भाषेला ते 'पारुंशी' भाषा असे म्हणतात.

हा समाज महाराष्ट्रीयन असल्याने त्यांच्या पोषाखात किंवा सणावारात विशेष असा फरक आढळत नाही. हे लोक हिंदुधर्मीय असून हिंदूंच्या देवदेवतांची ते पूजा करतात. हिंदू धर्मपद्धतीनेच त्यांचे विवाह केले जातात. लग्न लावण्यास ब्राह्मण बोलविला जातो, त्याला पंचवीस रुपये बिदागी दिली जाते. लग्नसोहळा दोन-तीन दिवस चालतो. लग्नात हुंडापद्धत नाही. मुलाने लग्नखर्च म्हणून मुलीला 'दयाज' देण्याची पद्धत परंपरेने चालत आलेली आहे.

या समाजात आंतरजातीय विवाहाची प्रथा मान्य नाहीच, परंतु जर एखाद्याने जातीबाहेर लग्न करण्याचा प्रयत्न केला तर समाज त्याला वाळीत टाकतो. त्याच्या लग्नकार्यात किंवा मैतीला कोणी जात नाही.

भराडी गोंधळी हा हिंदुधर्मीय समाज असला तरी प्रेताचे दहन करण्याऐवजी हे लोक दफन करतात. केस, दाढी काढून सुतक पाळतात. साधारण सहा महिने मृताचे सुतक पाळण्याची प्रथा यांच्यात आहे. दहावा, तेरावा किंवा पितर-

पाठ ते करतात. मृताच्या नावे 'टाक' तयार करून देव्हाऱ्यात ठेवतात.

विशेषतः या समाजातील बाळंत झालेली बाई मरण पावली तर तिला स्मशानात नेतेवेळी तिच्या घरापासून स्मशानापर्यंत रस्त्यावर 'राळे' फेकले जातात. असे केल्याने मृत व्यक्ती घरी परत येऊ शकत नाही अशी त्यामागे कल्पना आहे.

भराडी गोंधळी हा महाराष्ट्रात सर्वत्र आढळणारा समाज आहे. देवीच्या नावाने गोंधळ घालून तो आजही पोट भरतो आहे. सततच्या भटकंतीमुळे, शिक्षणाचा फायदा यांना घेता आलेला नाही, किंवा स्थिर जीवनाचा लाभ घेता आलेला नाही. परंपरागत गोंधळाच्या कार्यक्रमाबरोबर त्यांच्यातील काही लोक म्हशी सांभाळण्याचा आणि विकण्याचा व्यवसाय करीत आहेत. तर काही स्वतःच्या तमाशाच्या बाऱ्या घेऊन कार्यक्रमाच्या निमित्ताने गावोगाव भटकत आहेत. परंतु अशा लोकांची संख्या अल्प आहे. देवीचा गोंधळ हा देवीच्या आशीर्वादाने मिळालेला परंपरागत पवित्र व्यवसाय आहे असे हे लोक आजही समजतात. त्यामुळे मूळ व्यवसायातून ते बाहेर पडायला तयार नाहीत. देवदेवतांचा प्रचंड पगडा आणि टोकाची अंधश्रद्धा यामुळे त्यांच्या आयुष्यातला गोंधळ अजूनही त्यांच्या लक्षात आलेला नाही. त्यांच्या नावाप्रमाणे आजही त्यांची गोंधळलेली सामाजिक अवस्था आहे तशीच कायम आहे.

९. कैकाडी समाज

पिढ्यान् पिढ्या गावोगाव सतत भटकंती करीत स्वतःची उपजीविका करणारा कैकाडी समाज महाराष्ट्रातील लोकांना परिचित आहे. विशेषतः हे लोक ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पहावयास मिळतात. शेतकऱ्यांना धान्य साठविण्यासाठी फोकाच्या कणग्या, कोंबड्या डालण्यासाठी रुईच्या फोकाच्या टोपल्या किंवा मोठमोठे झाप आणि सामान्य माणसासाठी टोपली डुरकली तयार करण्याचा व्यवसाय हे लोक पिढ्यान् पिढ्या करीत आलेले आहेत. टोपल्याच्या किंवा कणग्यांच्या मोबदल्यात, ग्रामीण भागातले शेतकरी वर्षाकाठी सुगीच्या हंगामात त्यांना धान्य देतात, ते इतर बलुतेदारांप्रमाणेच दिले जाते. क्वचित प्रसंगी पैसे देऊन या वस्तू खरेदी केल्या जातात. याच व्यवसायावर हे लोक गेली कित्येक वर्षे आपली उपजीविका करीत आहेत.

ग्रामीण भागात गावगाड्याच्या आश्रयाने उपजीविका करणारा कैकाडी त्याच्या व्यवसायासाठी गाडग्यांचा वापर करतो, तर खास व्यवसाय म्हणून डुकरे पाळतो, त्यांची मोठ्या प्रमाणात पैदास करतो. गाढव आणि डुकरे हे कैकाड्यांचे मुख्य पाळीव प्राणी म्हणून ओळखले जातात. गाढवांच्या खरेदी–विक्री बरोबरच त्याच्या लिदीचे उत्पन्न (शेणाचे उत्पन्न) त्यांना मिळत असते. गाढवाची आणि डुकराची लीद शेतीला खत म्हणून वापरली जाते. त्यामुळे वर्षाकाठी चार- दोन गाडीचे उत्पन्न तो शेतकऱ्याला देतो आणि त्याचा मोबदला म्हणून रोख रक्कम किंवा धान्य घेतो.

कैकाडी लोक मूळचे तसे महाराष्ट्राबाहेरील आहेत. तेलंगण हे या लोकांचे मूळचे ठिकाण सांगितले जाते. मात्र तामिळनाडू आणि आसपासच्या राज्यात हे लोक मोठ्या संख्येने पाहावयास मिळतात. यांची मातृभाषा तेलगू सांगितली जात असली तरी, तामिळी आणि कानडी या भाषेचे शब्द एकत्र करून एक वेगळीच भाषा हे लोक बोलतात, त्याला ग्रामीण भागात कैकाडी भाषा असे नाव आहे. तामिळनाडू भागात यांना कुरणा, कोरवा, कोरम किंवा कुराजा या नावाने ओळखले जाते.

मुख्य पोटजाती

कैकाडी समाजात मुख्य पाच पोटजाती असल्याचे सांगण्यात येते. त्यांत

प्रामुख्याने माकडाचा खेळ करणारे कोंची कोरवा, कोरवी, धोंसाले, कोरवा आणि पामलोर अशी त्यांची नावे आहेत. वरील सर्व पोटजाती या स्वतंत्र असल्याचेही सांगण्यात येते. त्यामुळे प्रत्येक जातीचा एक वेगळा दर्जा या समाजात ठरविण्यात आलेला आहे. मूळचा कैकाडी हा इतरांपेक्षा श्रेष्ठ समजला जातो, तर माकडवाला कोंची कोरवा हा स्वतःला कैकाड्यापेक्षा खानदानी म्हणवून घेतो. त्यामुळे वरील पाच पोटजातींत रोटी–बेटी व्यवहार केले जात नसत. प्रत्येक जात ही दुसऱ्या पोटजातीपेक्षा स्वतःला वेगळी आणि उच्च समजते, अलिकडे काही वर्षांपासून या पोटजातींमध्ये रोटी व्यवहार होत आहे, तर बेटी व्यवहार व्हावा म्हणून त्या समाजातील कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत.

कैकाडी समाजात प्रमुख दोन गट सांगितले जातात– एक सतत भटकून उपजीविका करणारा, तर दुसरा गावगाड्याच्या आश्रयाने उपजीविका करणारा. सतत भटकणारा कैकाडी हा आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक दृष्ट्या अत्यंत मागासलेला आणि दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणारा उपेक्षित समाज आहे, तर गावगाड्याच्या आश्रयाने राहणारा कैकाडी, गावाच्या शेजारी कच्ची घरे उभारून स्थिर जीवन जगताना आढळतोय. तो गावगाड्यातला एक प्रमुख व्यवसायी बनलेला आहे. त्याला शिक्षणाची जाण आहे, तसेच बदलत्या समाजाचे भान आहे. सतत फिरणारा फिरस्ता कैकाडी आणि गावच्या आश्रयाने स्थिर झालेला गावकैकाडी असे भेद कैकाडी समाजात पाहावयास मिळतात. गावकैकाडी हे फिरस्त्या कैकाड्यापेक्षा स्वतःला वेगळे आणि श्रेष्ठ समजतात, ते त्यांच्याशी बेटीव्यवहार करीत नाहीत.

या समाजात कुळांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कुळे ही समाजातील कुलवंत घराणी समजली जातात. समाजातील लग्नकार्य, धार्मिक कार्ये अगर सामाजिक कार्यात कुळांना स्थान असते. समाजात प्रत्येक कुळाचा दर्जा ठरलेला असतो. त्या त्या दर्जाप्रमाणे कुळातील लोक आपापसात व्यवहार करतात. या समाजात जाधव, माने ही प्रमुख कुळे असून या कुळांना कैकाडी समाजात प्रतिष्ठा असल्याचे सांगण्यात येते.

विशेषतः कैकाडी समाजातील एकाच कुळात लग्नव्यवहार किंवा सोयरीक करण्याचे टाळले जाते. एकाच कुळातील लोक एकमेकांना भाऊ-बहिणीच्या नात्याने पाहातात, त्यामुळे कुळ बदलून सोयरीक करण्याचा रिवाज या समाजात आहे. उदा. जाधव आणि माने या दोन कुळांत सोयरीक केली जाते. याशिवाय, मुख्य कुळाच्या पोटकुळी अनेक पाहावयास मिळतात. त्यात कवाडे, सातपाडे, धनगरे, गणसोरे, कायसरे, जुमालसरे, काडरे आणि मानके अशी काही मुख्य नावे आहेत. मुख्य कुळे आणि पोटकुळे यांची या समाजात यादी मोठी आहे.

कैकाड्यांच्या मुख्य आणि पोटकुळांचं वैशिष्ट्य सांगताना एकाने सांगितले– सोयरीक ठरविताना कुळात गलती झाली तर वेळप्रसंगी प्रचंड मारामारीचा प्रसंग येतो, त्यामुळे सोयरीकीच्या वेळी कुळांचे मूळ पाहूनच कार्य नक्की केले जाते.

कैकाडी समाजात कुळांचा उच्चनीच दर्जा हा पारंपरिक मानला जातो, त्यांच्या व्यवसायाच्या वेगळेपणात कुळांना मानपान दिला जातो. उदा. गावगाडचाचा व्यवसाय करणारे, भिक्षा मागणारे, माकड खेळविणारे, जादूचे खेळ करणारे, असे-ही भेद या समाजात मानले गेलेले आहेत, आणि त्यांच्या उपजीविकेच्या किंवा पोट भरण्याच्या विशिष्ट पद्धतीवरूनच त्यांचा समाजातील कमी–जास्त दर्जा ठरविण्यात आलेला आहे.

पंचायतीचा अधिकार

इतर भटक्या विमुक्त समाजाप्रमाणे कैकाडी समाजात जात पंचायतीचा प्रभाव पहावयास मिळतो. जातपंचायत ही जातीची न्यायसंस्था म्हणून ओळखली जाते. जात पंचायतीचे नियम हे अलिखित स्वरूपाचे असून जातीवर ते बंधनकारक असतात, जातगंगेने ते मान्य केलेले असतात. त्यामुळे जातनियम मोडणारास किंवा जातनियम तोडणारास जातीतून बाहेर टाकण्याची शिक्षा पंचायत करू शकते. कैकाडी समाजातील एखाद्या व्यक्तीने जातीचे नियम पाळले नाहीत तर त्याला विशिष्ट दंड केला जातो. समाजातील अनैतिक संबंध, लग्नकार्य किंवा आपापसातील आर्थिक व्यवहारासंबंधीचे तंटे पंचायतीत मांडण्याचा प्रघात आहे. एखाद्या व्यक्तीनें एखाद्या बाईशी विवाहाशिवाय संबंध ठेवल्यास त्याला १२० रुपयांपर्यंत दंड केला जातो, किंवा विधवा स्त्री गरोदर राहिली तर तिच्या बापाकडून पंचायत दंड वसूल करते आणि पोर पाडण्यास सांगते. अशी स्त्री कुटुंबाला किंवा जातीला मेली असे समजून तिचा त्याग केला जातो, तिच्या कपाळी पैशाचा डाग दिला जातो.

पूर्वी अनैतिक संबंध ठेवणाऱ्या स्त्रीस किंवा गरोदर राहणाऱ्या विधवेस जिवंत जाळण्याची शिक्षा दिली जात असे. अलिकडे काही फिरस्त्या कैकाडी समाजांत अशा स्त्रीस वाळीत टाकण्याची किंवा सोडून देण्याची शिक्षा दिली जाते. अशी व्यक्ती किंवा स्त्री समाजाला मेली असे समजून त्या व्यक्तीच्या नावे पिंड देण्याची पद्धत महाराष्ट्रातील काही भागांत रूढ आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील मढी हे कैकाडी समाजाचे न्यायनिवाडचाचे मुख्य ठिकाण मानले जाते. वर्षाकाठी येणाऱ्या मढी येथील कान्होबाच्या जत्रेत महाराष्ट्रातील कैकाडी समाज एकत्र जमतो. समाजातील देणेघेणे व्यवहार, लग्न व्यवहार तेथे जमविले जातात अगर मोडले जातात. त्याप्रमाणेच जात पंचायतीने ज्या व्यक्तींना गुन्हेगार म्हणून वाळीत टाकलेले असते अशा व्यक्तीच्या न्यायनिवाडचाचे काम जत्रेत केले जाते. महाराष्ट्रात मढी, जेजुरी, मालेगाव (जि. नांदेड) ही या समाजाची वार्षिक जातपंचायत वसण्याची मुख्य ठिकाणे आहेत.

विधिनिषेध

ककाडी समाजात एकाच नावाच्या कुळात लग्न व्यवहार केले जात नाहीत.

स्वतःच्या नात्यात किंवा वेगळ्या आडनावात विवाह होतात. विशेषतः वडिलांच्या बहिणीच्या मुलाशी किंवा आईच्या बहिणीच्या मुलीशी लग्न केले जात नाही. इतर कुळांत व्यवहार ठरला जातो. लग्न व्यवहारात पंचायतीला मुख्य स्थान असते, लग्न जमविणे आणि मोडणे पंचायतीच्या सल्ल्यानुसारच केले जाते, त्या मोबदल्यात नवरीकडून आणि नवऱ्याकडून ठराविक रक्कम पंचायतीला दिली जाते. या समाजातील लग्न सोहळा ३ ते ७ दिवसांपर्यंत चालतो. लग्न सोहळ्यात आलेल्या पाहुण्यांना दारू आणि जेवण देण्याची पारंपरिक पद्धत आहे. दारूशिवाय या समाजात लग्न होत नाही.

पूर्वी गरोदर स्त्रीच्या पोटाला कुकूं लावून गर्भातील बाळाचा विवाह नक्की केला जात असे. विशेषतः असे विवाह नात्यातच नक्की केले जात असत. अलिकडे ती पद्धत खूपच कमी झालेली आहे.

महाराष्ट्रात काही भागामध्ये कैकाडी समाजात मुली दत्तक घेण्याची प्रथा आहे. जिला घरचा आधार नाही अशा किंवा नवऱ्याने सोडलेल्या किंवा समाजात बहिष्कृत केलेल्या स्त्रीस दत्तक म्हणून घेतले जाते, त्याला 'उरसांड' असे म्हटले जाते. जी व्यक्ती अशा प्रकारे दत्तक म्हणून मुलीचा स्वीकार करते, ती व्यक्ती तिचा पालक म्हणून घरात तिला इतर मुलांमुलींचा दर्जा देते. जातीतील इतर स्त्रीप्रमाणेच तिला प्रतिष्ठा दिली जाते. या मुलींचे विवाह समाजात केले जातात. अशा विवाहांना समाज मान्यता देतो. अलिकडे 'उरसांड' पद्धत कमी होत असल्याचे एकाने सांगितले.

परंपरेचा अभिमान

या समाजातील लोक स्वतःला हिंदू धर्मीय समजतात. हिंदूंचे सणवार, देवदेवता, रूढी, परंपरा ते सोईनुसार पाळतात. लक्ष्मीआई, खंडोबा, कान्होबा, फिरस्ती देवी आणि जलदेवी या त्यांच्या मुख्य देवदेवता आहेत. त्यांची पूजाअर्चा करणे, जत्रा करणे, वेळप्रसंगी नवस बोलणे, देवाच्या नावाने उपासतापास करणे, देवदेवतांना कोंबडं-बकरं कापून नैवेद्य दाखविणे आणि देवीला प्रसन्न करून घेणे अशा प्रकारे पिढ्यान् पिढ्या या समाजाचे चक्र चालू आहे. चमत्कार आणि उपासतापास यांचे प्रमाण या समाजात मोठे आहे. देवाच्या नावाने सर्वस्व झोकून दिलेला असा हा समाज आहे. या समाजात अंधश्रद्धेचे प्रमाण मोठे आहे. विशेषतः या समाजातील स्त्रिया या देवभोळ्या आणि टोकाच्या अंधश्रद्धाळू आहेत. देव अंगात येणे, नवसाला पावणे अशा कल्पनांवर त्यांचा विश्वास आहे.

पुरुषाच्या बरोबरीनेच या समाजातील स्त्री अंग मेहनतीची कामे करीत असते. टोपल्या करणे, फोक काढणे, घरोघर विक्री करणे आणि प्रपंचात चार पैशाची मदत करणे हे जणू काही तिने आयुष्यभर व्रतच घेतलेले असते. ती धार्मिक वृत्तीची आणि कष्टाळू अशीच आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात कैकाडी समाजाची भटकंती काही प्रमाणात कमी

झालेली आढळते. गावगाड्याच्या आश्रयाने काही लोक आज स्थिरावलेले आहेत, तर काही शहरात येऊन नवनवीन व्यवसायांकडे वळलेले आहेत. बदलत्या समाजाचे भान शहरात स्थायिक झालेल्या या समाजातील लोकांना आलेले असल्याने, शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळू लागलेले आहे. पारंपरिक व्यवसायाबरोबरच सरकारी आणि निमसरकारी कार्यालयात या समाजातील शिक्षित लोक नोकऱ्या करीत आहेत. वेगवेगळे व्यवसाय करण्याचा प्रयत्न करीत आहेत. नव्या पिढीच्या जाणीवा तीव्र आणि समाजपरिवर्तनाच्या दिशेनें वाटचाल करणाऱ्या आहेत, तरुणांचे समाज सुधारण्याचे प्रयत्न चालू आहेत. या समाजातून सामाजिक नेतृत्व उदयाला येऊ लागले आहे.



१०. मातीवडार

महाराष्ट्रातील भटक्या समाजाच्या जगण्या-मरण्याच्या अनेक तऱ्हा आपण पाहतो. त्यांच्या जगण्याची साधने किंवा प्रकार जसे वेगवेगळे आहेत, तशा मरणानंतरच्या तऱ्हा आणि परंपरा-रूढी या भिन्न आहेत. भीक मागून जगणारे. कलेवर उपजीविका करणारे, सोंग-ढोंग करून पोट भरणारे किंवा वेळ पडलीच तर चोरी-मारी करणारे, असे कितीतरी मार्गाने पोट भरणारे लोक महाराष्ट्रात आहेत. परंतु वरील प्रकाराशिवाय अहोरात्र प्रामाणिक शारीरिक कष्टावरच स्वतःचे जगणे अवलंबून असणारे किंवा कष्टाशिवाय ज्यांच्या जगण्याला पर्यायच नाही असा वडारी समाज महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यात आणि शहरी भागात आढळतो.

सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत, रखरखीत ऊन असो की धो धो पडणारा पाऊस असो, अथवा रक्त गोठविणारी थंडी असो, पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी अहोरात्र कष्ट करणे हेच ज्याच्या पाचवीला पुजलेले असते असा हा वडार समाज म्हणजे शारीरिक कष्टकऱ्यांचा उत्कृष्ट नमुना आहे. मातीकाम, दगडीकाम, चारी, धरणे, रस्ते किंवा खाणी या ठिकाणी हमखास वडारी समाज आढळणारच. एवढेच नव्हे तर वरील ठिकाणच्या कामात वडाऱ्यांच्याशिवाय पर्याय नाही असे कित्येक ठेकेदार आणि कंत्राटदार बोलून दाखवतात. वडार समाज आणि त्यांच्या कष्टाकडे, अंगमेहनतीकडे पाहिले की त्याची सत्यता पटते. ज्यांनी कडाक्याच्या थंडीतही वडाऱ्यांच्या काळ्याशार तुळतुळीत पाठीवरून घामाच्या धारा निथळताना पाहिल्या आहेत, त्यांना वडार माणसाच्या कष्टाचा आणि त्याच्या एकूणच जगण्या-मरण्याचा अंदाज येऊ शकतो.

अस्थिर जीवन

वडारी समाज हा मूळचा आंध्रप्रदेशातला, तेलगू भाषा बोलणारा समाज. दहा बारा पिढ्यांपूर्वी हे लोक पोट भरण्यासाठी महाराष्ट्रात आले. खेड्यापाड्यात आणि शहरात, मिळेल ते काम आणि देईल ते दाम स्वीकारून स्वतःची उपजीविका करीत राहिले. लहानापासून थोरापर्यंत कष्ट करायचे आणि खायचं हा सर्वांना सारखा नियम या समाजात पाहावयास मिळतो. या समाजातील पुरुष जसे अंगमेहनतीची कामे करतात तशा समाजातील स्त्रियाही कष्ट करतात. पुरुषांच्या

खांद्याला खांदा लावून या समाजातील स्त्री अहोरात्र कष्ट करते.

पोटासाठी दाही दिशा भटकायचं, कामाच्या जवळपास फाटक्या-तुटक्या गोणपाटाची पालं ठोकायची, आणि तीन दगडांच्या चुलीवर आयुष्याची भाकरी भाजायची, हे वडारी जीवनाचं चक्र सतत फिरत राहणार आहे. आणि या चक्रात अडकलेला वडारी यातच जगतो आणि यातच मरतो आहे. कारण पोटासाठी सतत भटकंती वाट्याला आल्याने स्थिर जीवन जगता येत नाही. त्यामुळे, शिक्षण नाही, शिक्षणाशिवाय कसलेही परिवर्तन नाही, अशी या समाजाची अवस्था आहे. मात्र, गेल्या तीस-चाळीस वर्षांत ज्यांना स्थिर जीवनाचा लाभ झाला किंवा ज्यांना कष्टातून भरपूर पैसा मिळाला, असे या समाजातील बोटावर मोजण्यासारखे लोक काय ते आज बऱ्या अवस्थेत आहेत. परंतु तेवढे सोडले तर भटकणारांची संख्या या समाजात खूप मोठी असल्याचे पाहावयास मिळते.

आंध्रप्रदेशातून महाराष्ट्रात आलेला वडारी समाज वेगवेगळ्या नावाने ओळखला जातो. वडारी, वड्डर, वडीयार, वड्डूर अशी या समाजाची काही नावे आहेत. या वेगवेगळ्या नावांबरोबरच त्यांच्या व्यवसायावरून त्यांच्यात पोटजाती पहावयास मिळतात. गाढव पाळणारे आणि मातीकाम करणारे 'माती-वडार' या नावाने परिचित आहेत, तर दगडी जाती, पाटे, वरवंटे, उखळ किंवा तत्सम दगडी वस्तू तयार करून घरोघर फिरून विकणारे जे लोक आहेत त्यांना 'पाथरवट (वडार)' या नावाने ओळखले जाते. त्याशिवाय, दगडीवडार, गाडीवडार, खाण-वडार असेही काही भेद या समाजात आहेत.

वरील नावाने ओळखल्या जाणाऱ्या समाजात पूर्वी रोटी-बेटी व्यवहार होत नसत, परंतु अलीकडे काही वर्षांपासून बेटी व्यवहारही होऊ लागले आहेत. धोत्रे, जाधव, गुंजाळ, पवार, फुलमाळी, रणसूरे या त्यांच्यातील प्रमुख कुळचा म्हणून मानलेल्या आहेत. या कुळांमध्ये आपापसात बेटी व्यवहार केला जातो. ही कुळे म्हणजेच या समाजातील प्रमुख आडनावे आहेत. एकाच आडनावात लग्नं होत नाहीत, असे सांगण्यात आले.

या समाजात हुंडापद्धत नाही, मात्र विवाहप्रसंगी मुलाच्या वडिलाने एकहजार एक्कावन्न रुपये मुलीच्या वडिलांना लग्नखर्चासाठी म्हणून देण्याची पारंपरिक रीत या समाजात आहे. पूर्वी समाजातील विवाह लावण्याचे काम हे त्याच जातीतील किंवा कुळातीलच लोक करीत असत. परंतु अलीकडे गावाच्या आश्रयाने राहिलेले किंवा शहरात कामाच्या निमित्ताने स्थायिक झालेले या समाजातील लोक लग्नविधीसाठी ब्राह्मण बोलावतात आणि लग्नसोहळा एक दिवसात उरकतात.

विवाह प्रसंगी मुलाच्या वडिलाने मुलीच्या वडिलांना लग्नखर्चाच्या देऊ केलेल्या रकमेबरोबरच वेगळे तीन प्रकारचे कपडे द्यायचे असतात. त्यांना पोटझाकणी, आजेचीर आणि साखरपुडा असे म्हणतात. असे कपडे लग्नप्रसंगी देणे हे प्रतिष्ठेचे मानले जाते. किंबहुना कपडे दिल्याशिवाय लग्न लावले जात नाही. काही

वेळा या कपड्यांसाठी लग्नंही मोडली जातात असे एकाने सांगितले.

जातपंचायत

इतर भटक्या विमुक्त समाजाप्रमाणे या समाजातही जात पंचायतीचे महत्त्व आजही टिकून आहे. लग्न, मैत किंवा इतर सामाजिक कार्यात पंच आणि पंच-प्रमुखास मानपान देण्याची पारंपरिक पद्धत या समाजात आहे. मात्र पूर्वीप्रमाणे जात पंचायतीचे समाजातील स्थान सध्या राहिलेले नाही असे या समाजातील एकाने सांगितले. परंतु जातपंचायतीचे पारंपरिक नियम या समाजातील लोक आजही काटेकोरपणे पाळताना आढळतात. विशेषत: समाजातील एखाद्या विवाहित स्त्रीने विवाहबाह्य संबंध ठेवले किंवा तिच्या नवऱ्याने तशी शंका व्यक्त केली तर, जातीतील प्रमुख पंच मंडळी अशा घटनेचा न्यायनिवाडा करण्याठी एकत्र जमतात. अशा वेळी स्त्रीवरील आरोप सिद्ध झाला किंवा तिच्या नवऱ्याने तिला पत्नी म्हणून स्वीकारण्यास नकार दिला तर मुलीचे वडील मुलीच्या गळ्यातील मंगळसूत्र तोडून आणि तिच्या लुगड्याचा पदर फाडून पंचाकडे देतो. असे करणे म्हणजे नवऱ्याकडून फारकत घेणे असे समजले जाते. मात्र, अशा फारकतीला नवऱ्याची पूर्ण संमती असेल तर मुलीच्या बापाने लग्नखर्चासाठी घेतलेली रक्कम तिथेच पंचाच्या बैठकीत नवऱ्याला परत द्यावी लागते.

पूर्वी अविवाहित स्त्रीने वा पुरुषाने जर जातीबाहेर संबंध ठेवले तर त्या संबंधित स्त्रीस वा पुरुषास जातीतून बहिष्कृत केले जात असे.

वडार समाजात आंतरजातीय विवाह मान्य नाही, अशा प्रकारे विवाह करणाऱ्या व्यक्तीस आणि त्याच्या कुटुंबियांस वाळीत टाकण्याची शिक्षा दिली जाते. या समाजातील एखाद्या तरुणीने जातीबाहेर अन्य समाजातील तरुणाशी विवाह केला तर अशा मुलीच्या घरचे लोक ती मेली असे समजून तिचे, जिवंत असतानाच, उत्तरकार्य समाजात घालतात.

महाराष्ट्राचा प्रभाव

वडार समाज अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात असल्याने महाराष्ट्रीय जनजीवनाचा प्रभाव त्यांच्यावर आढळतो. विशेषत: त्यांची कुलदैवते ही महाराष्ट्रीय आहेत. लक्ष्मीआई ही देवता त्यांची प्रमुख दैवत असून, दसऱ्याला बकरे–कोंबडे कापणे, नवस बोलणे किंवा लक्ष्मीआईचे नावाने उपास–तापास करणे, असे विधी केले जातात. लक्ष्मी आई अंगात येते अशी या समाजात भ्रामक कल्पना आहे. याशिवाय 'नाथसाहेब' या नावाने ओळखले जाणारे प्रसिद्ध देवस्थान हे यांचे कुलदैवत म्हणून ओळखले जाते.

'वडार' म्हटलं की चोळी न घालणाऱ्या स्त्रियांचा समाज अशीही वेगळी ओळख महाराष्ट्रात आहे. रामायणातील सीता ही या समाजातील स्त्रियांनी आदर्श

मानलेली आहे. सीतेचे आम्ही वंशज आहोत असे काही महिला अभिमानाने सांगतात. रामायणातील सीतेने सुवर्णमृगाच्या कातडयाची चोळी शिवण्याचा हट्ट रामाकडे धरला आणि त्या चोळी प्रकरणात पुढे रामायण घडले, म्हणून त्या काळी सीतेची इच्छा असून तिला चोळी मिळाली नाही, म्हणून आम्ही चोळी घालीत नाही असे काही महिलांनी सांगितले. सीता हाच वडार स्त्रियांचा आदर्श मानला गेलेला आहे. मात्र अलीकडे काही वर्षांपासून या समाजातील तरुण मुली ब्लाऊज घालताना दिसतात. त्यांच्यात नव्या सामाजिक जाणिवा किंवा समाजजागृती आली असल्याचे दिसते.

दारूचे वाढते व्यसन

वडार समाज हा मुळातच कष्टकरी समाज असल्याने दिवसभराच्या कष्टाचा शीण हलका करण्यासाठी या समाजातील बहुतेक मंडळी दारू पिताना आढळतात. इतर भटक्या समाजाप्रमाणे लग्नकार्य किंवा मैतीच्या वेळी या समाजात दारूला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. समाजात मैत झाली तर मैतीवरून आल्यावर सर्व लोकांनी दारू पिण्याची पारंपरिक रीत समाजात आढळते. पूर्वी मैतीनंतर बकरे कापून सर्व समाजास जेवण देण्याची प्रथा होती, अलीकडे ही प्रथा बंद झाल्याचे एकाने सांगितले.

गाढव हा प्राणी वडार समाजात अतिशय महत्त्वाचा प्राणी मानला जातो. गाढव हे मातीवडारांचे उपजीविकेचे मुख्य साधन आहे. या समाजात प्रत्येक कुटुंबात कमीत कमी चार गाढवं दावणीला असतात. ज्यांच्याकडे जास्त गाढवं त्यांची समाजात मोठी प्रतिष्ठा मानली जाते.

गेल्या तीस-चाळीस वर्षात एकूणच वडार समाजात थोडाफार बदल झाल्याचे दिसते. व्यवसायाच्या निमित्ताने गावोगाव भटकणारा समाज अलीकडे काही प्रमाणात स्थिर झालेला आहे. विशेषतः शहरात स्थिरावलेले लोक आपल्या पारंपरिक व्यवसायावरोबरच इतर व्यवसाय करीत आहेत. तसेच आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देताना आढळतात. नवी तरुण पिढी शिक्षणाकडे आकर्षित होत आहे, नवनवीन व्यवसाय करण्याकडे त्यांचा ओढा आहे. बदलत्या काळानुसार परिवर्तनाच्या जाणिवा प्रामुख्याने नव्या पिढीत आढळतात. मात्र शारीरिक कष्टापासून अजूनही हा समाज मुक्त नाही. शारीरिक कष्ट आणि वडार समाज हे समीकरण आजही कायम आहे.

❋

११. गाडी वडार

शारीरिक कष्टावरच ज्याची पिढ्यान्‌पिढ्या उपजीविका चालू आहे असा 'गाडीवडार' या नावाने ओळखला जाणारा भटका समाज महाराष्ट्रात आहे. कामाच्या निमित्ताने सतत भटकंती करणारा हा समाज आहे. जिथे हाताला काम आणि पोटाला अन्न मिळेल तिथेच पाल ठोकून प्रपंच थाटायचा, काम संपलं की पालासकट प्रपंच वाहून दुसऱ्या गावी न्यायचा, असा जीवनाचा भटका क्रम नियमित ठरलेला असतो.

मूळचे आंध्र प्रदेशचे

गाडीवडार हा मूळचा आंध्र प्रदेशातील समाज असून कामाच्या निमित्ताने पोट भरण्यासाठी म्हणून फार पूर्वीच्या काळी तो महाराष्ट्रात आल्याचे सांगितले जाते. महाराष्ट्रातील वडार किंवा माती वडार, पाथरवट या समाजांच्या नावांचे साम्य गाडी वडारांशी असले तरी प्रत्येक समाज हा स्वतंत्र आहे. त्यांच्या परंपरा, चालीरीती, देवदेवता, उत्सव, सणवार, लोककथा आणि व्यवसाय हे भिन्न आहेत. मात्र हे सर्व कष्टकरी समाज म्हणूनच महाराष्ट्रात परिचित आहेत.

गाडीवडार या समाजाची मातृभाषा तेलगू असल्याचे सांगितले जात असले तरी मूळ तेलगू आणि गाडी वडारांची तेलगू यात खूपच फरक दिसून येतो. मुख्य म्हणजे तेलगूप्रमाणे गाडीवडारांच्या मातृभाषेला कोणतीच लिपी नाही, त्यामुळे केवळ संभाषणासाठीच त्या भाषेचा उपयोग केला जातो. ही भाषा बोली भाषा किंवा सांकेतिक भाषा म्हणूनही ओळखली जाते. या भाषेत तेलगू, हिंदी, मराठी या भाषांच्या शब्दांचे मिश्रण असल्याचे आढळते, त्यामुळे भटक्यांची मिश्र भाषा किंवा मिश्र सांकेतिक भाषा म्हणूनही त्यांच्या भाषेला ओळखतात.

भटक्या विमुक्त समाजातील प्रत्येक जातीजमातीला परंपरेने चालत आलेला एक तिचा म्हणून विशिष्ट असा व्यवसाय आहे. त्यांच्या वेगवेगळ्या व्यवसायावरूनच त्यांच्या जातींची नावे रूढ झालेली आहेत. 'गाडीवडार' हेही नाव त्यांच्या विशिष्ट व्यवसायावरूनच या समाजाला रूढ झाल्याचे सांगण्यात येते.

पूर्वीच्या काळी हा समाज डोंगरातील छोटे- मोठे दगड फोडण्याचे व ते बांधकामासाठी लोकांना पुरविण्याचे काम करीत असे. असे दगड वाहण्यासाठी विशिष्ट प्रकारचा, खास दगडाच्या वाहतुकीसाठी तयार केलेला 'गाडा' ते वापरीत. त्याला

ओढण्यासाठी रेडे जुंपले जात असत. त्यामुळे गाडीतून दगड वाहणारा म्हणून हा समाज त्या काळी 'गाडीवडार' या नावाने ओळखला जात असे. पुढे वाहतुकीसाठी नवीन साधनांचा वापर होऊ लागला तरी मूळचे व्यवसायाच्या साधनावरून रूढ झालेले नाव पुढे जातनाव म्हणून कायम झालेले आहे.

वेगळेपणा

वडार समाजात अनेक पोटजाती आहेत. गाडीवडार हे वडार समाजातील इतर पोटजातींपेक्षा स्वतःला वेगळे आणि उच्च समजतात. त्याचे कारण विचारले असता या समाजातील अंबादास नागुजी चौगुले यांनी सांगितले की, इतर वडार समाजाप्रमाणे गाडीवडार हे डुकरे पाळत नाहीत किंवा खाद्य म्हणूनही त्याचा उपयोग करीत नाहीत. पर्यायाने ही कृती न करणारे म्हणून आम्ही वेगळे आहोत ही भावना या समाजात पूर्वीपासून रूढ आहे. ती आजही कटाक्षाने पाळली जाते.

या समाजात काही प्रमुख कुळी सांगितल्या जातात. या कुळांना त्यांच्या भाषेत वेगळ्या नावाने ओळखले जाते. उदा. चौगुले (इडागोट्यारे), कुसाळकर (कुंचा फोर), धोत्रे (वल्ला फोर), माने (मंजालोर), विटकर (फिट लावूर), पवार (फल्लापोर), वगैरे.

चौगुले आणि कुसाळकर या प्रमुख कुळी म्हणून या समाजात मानल्या जातात, त्यांना समाजात मानपान मिळतो. समाजातील कार्यात किंवा विवाहप्रसंगी त्यांना मान दिला जातो, समाजात यांना प्रतिष्ठित समजले जाते.

वेंकटेश्वर कुळदैवत

व्यंकटेश्वर हे या समाजातील प्रमुख कुलदैवत मानले जाते. गाडी वडार समाजातील प्रत्येक घरात व्यंकटेश्वराचा देव्हारा केलेला असतो. देवाचे वारे अंगात येते अशी भ्रामक कल्पना या समाजात आहे. देवाला नवस करणे, उपास-तापास करणे, देवाच्या नावाने उत्सव करणे आदी प्रकार या समाजात केले जातात. देव नवसाला पावतो अशी या समाजातील लोकांची श्रद्धा आहे.

आंध्र प्रदेशातील 'गिरीकोंडा' पर्वतावर या देवाची प्रचंड यात्रा दरवर्षी भरते. देशात विविध भागांत राहणारे या समाजातील लोक या पर्वतावर यात्रेसाठी जमतात. यात्रेचे निमित्त करून तेथे विवाह जमविणे, काडीमोड घेणे किंवा समाजातील भांडणतंटयाची, न्यायनिवाडयाची कामे केली जातात. विशेष म्हणजे व्यंकटेश्वराला मांसाहार चालत नसल्याने यात्रेत कोंबडा-बकऱ्यांचा बळी दिला जात नसल्याचे एका कार्यकर्त्याने सांगितले.

या समाजातील देव्हाऱ्याचे वैशिष्टय सांगताना एक जण म्हणाला, आमच्या देव्हाऱ्यात देवाची मूर्ती किंवा तसबीर असतेच असे नाही, तर मूळ देवस्थानातील ज्या चीजवस्तू लोकांनी तेथून आपल्या सोबत आणल्या त्यांचीच व्यंकटेश्वर म्हणून

आम्ही पूजा करतो. उदा. काहींनी मंदिरातील घंटा आणली, काहींनी पणती तर काहींनी समई आणली; घंटा, पणती किंवा समई हेच व्यंकटेश्वर समजून आम्ही पूजा करतो असे त्याने सांगितले.

इतर वडार समाजाप्रमाणे या समाजातही स्त्रिया पूर्वीपासून चोळी वापरीत नाहीत. चोळी न वापरणे हे जरी वडार समाजातील परंपरेचे साम्य असले तरी चोळी न वापरण्यामागे प्रत्येक वडार समाजात वेगवेगळ्या लोककथा रूढ आहेत.

गाडीवडार या समाजातील स्त्रियांनीं चोळी न वापरण्यामागे एक पुराणकथा सांगितली जाते. राम, सीता आणि लक्ष्मण वनवासात असताना पंचवटी येथे त्यांचा मुक्काम होता. त्यावेळी सीता अंगणातील शिळेवर बसून उघड्यावर आंघोळ करीत होती. ते एका वडाऱ्याने पाहिले. त्याला आंघोळीची शिळा आवडली. तो काही क्षण तिथेच झुडुपात लपून राहिला. सीतेची आंघोळ झाल्यावर ती निघून गेली, तेव्हा त्या वडाऱ्याने त्या आंघोळीच्या शिळेचे सुतकीच्या साह्याने दोन तुकडे केले आणि त्यातला एक दगड तो घेऊन गेला. हे जेव्हा सीतेच्या लक्षात आले तेव्हा तिने त्याला शाप दिला, 'मी आंघोळ करताना तू चोरून पाहिलंस, तुझ्या पुढच्या पिढीतल्या स्त्रिया चोळीशिवाय समाजात वावरतील' वगैरे.

वरील पुराण कथेचा आधार घेऊन या समाजातील स्त्रिया चोळी न घालण्याचे कारण सांगतात. सीता या समाजातील स्त्रियांचा आदर्श मानला जातो. सीता हेच समाजातील स्त्रियांचे प्रमुख दैवत मानले जाते. वर्षातून एकदा या स्त्रिया पंचवटीला एकत्र जमतात, आणि सीतामाईच्या नावाने उत्सव साजरा करतात.

इतर भटक्या विमुक्त समाजाप्रमाणे या समाजातही जात पंचायत अस्तित्वात आहे. परंतु पूर्वीच्या जात पंचायतीची तीव्रता आणि प्रतिष्ठा आज राहिली नाही असे एकाने सांगितले.

या समाजातील जे लोक आजही पोटासाठी वणवण भटकत आहेत, त्यांनी मात्र अजूनही जात पंचायतीचे अस्तित्व टिकवून ठेवलेले आहे. जात पंचायतीचे अलिखित नियम ते लोक काटेकोरपणे पाळतात. जात पंचायतीने या समाजाला काही नियम घालून दिलेले आहेत. उदा. जातीबाहेर लग्न न करणे किंवा स्त्री-पुरुषांनी परजातीत संबंध न ठेवणे, वगैरे. आजही ते काटेकोरपणे पाळले जातात.

जर या समाजातील एखाद्या पुरुषाने परजातीतील स्त्री आणली किंवा घरात ठेवली तर त्या इसमास जात पंचायत पंचवीस ते एकशे एक रुपयांपर्यंत दंड करते. दंड दिला नाही तर पंचायतीचा, पर्यायाने समाजाचा, अपमान समजून त्याला जातीबहिष्कृत केले जाते.

एखाद्या स्त्रीने समाजात किंवा समाजाबाहेर अनैतिक संबंध ठेवले तर पंचायत संबंधित स्त्रीला झाडाला बांधून चाबकाने फटके मारण्याची शिक्षा देते, किंवा समाजातील इतर स्त्रियांनी तिला झाडाला टांगून चपलेने मारण्याची शिक्षा देते.

विवाहपद्धती

गाडीवडार समाजातील लोक आपण हिंदू धर्मीय असल्याचे सांगतात. हिंदूंप्रमाणेच ते लग्न किंवा मैतीचे विधी करतात. हा समाज सतत भटका असल्याने काही क्रियाकर्मेही त्यांच्या वास्तव्यानुरूप आणि त्यांच्या कुवतीप्रमाणे करतात. या समाजातील लग्न विधी चार दिवस चालतो. पहिल्या दिवशी लग्न सोहळ्याचा पहिला दिवस किंवा सुरुवात म्हणून मुलीच्या घरी सर्वांनी वेसन भाकरी खाण्याचा कार्यक्रम होतो. (या कार्यक्रमास त्यांच्या दृष्टीने पारंपरिक महत्त्व आहे.) दुसरे दिवशी हळद खेळली जाते. यात लहानापासून थोरापर्यंत स्त्री-पुरुष सहभागी होतात. तिसरे दिवशी मुख्य लग्न विधी केला जातो. परंतु लग्न विधी झाला तरी लग्न पूर्ण झाले असे समजले जात नाही. म्हणून चौथ्या दिवशी मुलीच्या वडिलाने आलेल्या पाहुण्यांना यथेच्छ दारू पाजावी लागते. बोकड कापून त्यांना जेवण घालावे लागते. त्याला 'तलबाल' असे म्हणतात. तलबाल झाल्याशिवाय विवाह पूर्ण झाला असे जाहीर केले जात नाही.

पूर्वी या समाजात बालविवाहाची प्रथा रूढ होती. परंतु अलिकडच्या काळात मुलगी उपवर झाल्यावरच तिचा विवाह केला जातो. मुलगी उपवर होणे म्हणजे तिचा नवा जन्म होणे असे समजले जाते. अशा वेळी समाजातील एखादी मुलगी उपवर झाली तर तिला सात दिवस अंधाऱ्या खोलीत कोंडून ठेवण्याची पद्धत या समाजात आहे. आठव्या दिवशी तिला अंधाऱ्या खोलीतून बाहेर काढले जाते. त्यावेळी तिच्या आत्याने किंवा आईने तिला खोबरे खायला द्यावे लागते. नंतर तिला नवी साडी नेसवून तिची ओटी भरली जाते.

या विशिष्ट विधीमागचे कारण विचारले असता शिनोली (ता. आंबेगाव) येथील चौगुले गुरुजींनी सांगितले की, उपवर झालेल्या मुलीचा चेहरा, ती उपवर झाल्यापासून सात दिवसात जर कोणी पाहिला तर ते अशुभ असते. म्हणून अशा वेळी तिला अंधाऱ्या खोलीत कोंडून ठेवण्याची पारंपरिक चाल समाजात रूढ आहे.

या समाजात विशिष्ट पद्धतीने बाळाची पाचवी साजरी केली जाते. पाचवीच्या वेळी बाळाचे जावळ काढले जाते. त्यावेळी मुलाच्या मामाला मानपान दिला जातो. मुलाचे जावळ काढतेवेळी नागिणीच्या पानाची कातर तयार करून त्या कातरीने केस कापल्यासारखे केले जाते, नंतर धातूच्या कातरीने बाळाचे जावळ काढले जाते. त्या दिवशी घरात गोडधोड करून खाऊ घातले जाते.

पोपट पाळणे अशुभ

गाडीवडार समाजात पूर्वीपासून पोपट पाळणे अशुभ मानले जाते. यामागील कारण विचारता एकाने सांगितले की, पूर्वीच्या काळी आंध्र प्रदेशात वडारांचा राजा राज्य करीत होता. त्या राजाला एक राक्षस सतत छळत असे. त्याच्या छळाला कंटाळून त्या राजाने राक्षसास जिवे मारण्याचा प्रयत्न केला. परंतु तो काही क्षण

मरत असे व पुन्हा जिवंत होत असे. या चमत्काराचा शोध घेतला तेव्हा राजाला असे समजले की, राक्षसाचा जीव साता समुद्रापलिकडे ठेवलेल्या पिंजऱ्यातील पोपटात आहे. तेव्हा त्या राजाने तो पोपट मारून टाकला आणि इकडे तो राक्षस आपोआप मेला. त्यामुळे पोपटात राक्षसाचा जीव असतो, अशी कल्पना या समाजात पूर्वीपासून रूढ आहे. त्यामुळे या समाजातील लोक आजही पोपट पाळत नाहीत किंवा त्याला स्पर्शही करीत नाहीत.

असा हा अनेक रूढी–परंपरा आणि दंतकथा मानणारा समाज, पोटासाठी आज इथं तर उद्या तिथं अशा अवस्थेत आपले बिऱ्हाड पाठीवर घेऊन सतत भटकत असतो. सततच्या भटकंतीमुळे शिक्षण नाही, कायमचा निवारा नाही, नाव सांगायला गाव नाही, जिथं पोटाला मिळेल तिथं चार दिवस मरमर कष्ट करायचे, काम संपलं, मिळणं थांबलं की कामाच्या शोधात दुसऱ्या गावाला भटकायचे असे हे वणवण–भटकंतीचे चक्र पिढ्यान् पिढ्या या समाजात फिरत आहे. आज ते कुठंतरी थांबविण्याची गरज आहे, तरच त्यांना आपल्या नव्या आयुष्याची सुरुवात करता येईल असे वाटते.



१२. ओतारी

पुरातन काळापासून निरनिराळचा धातूंचे ओतीव काम करणारा म्हणून ओतारी समाज महाराष्ट्रात परिचित आहे. त्याच्या परंपरागत व्यवसायावरूनच त्या समाजाला 'ओतारी' या नावाने लोक ओळखतात. तांबे, पितळ किंवा ॲल्युमिनिअम अशा धातूंना, भात्याच्या सहाय्याने उष्णता देऊन त्यांचे द्रव तयार करायचे आणि हवे त्या आकाराच्या साच्यात तो द्रव ओतून वस्तू तयार करायच्या हा यांचा प्रमुख व्यवसाय. धातू वितळवून साच्यात 'ओतणारा' म्हणून त्यांना 'ओतारी' म्हटले जाते.

कलावंतांची उपेक्षा

विशेषत: मोगल काळात या समाजाला अतिशय महत्त्वाचे असे स्थान होते. त्या काळच्या संस्थानिकांच्या दरबारी या लोकांना कलावंत म्हणून मोठी प्रतिष्ठा होती. युद्धासाठी आवश्यक असणारी शस्त्रसामग्री ही मंडळी आपल्या परंपरागत हस्तकौशल्याने तयार करीत असत. प्रामुख्याने, युद्धाला उपयुक्त असणाऱ्या मोठ-मोठ्या तोफा ओतण्याचे (तयार करण्याचे) काम हा समाज करीत असे, त्यामुळे संस्थानात राजदरबारी खास कलावंत म्हणून त्यांचा गौरव होत असे, त्यांना मोठ-मोठी बक्षिसे दिली जात असत.

नंतरच्या काळात मात्र, ओतारी समाजाची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याचे दिसते. एकेकाळी राजाचा आश्रित असणारा हा कलावंत समाज इतर समाजाच्या आश्रयाला येऊन वळचणीला पडला आणि दारोदार भटकत उपजीविका करीत राहिला ही त्यांची शोकांतिका आहे.

परंपरागत कला हाच या समाजाचा आजचा जगण्याचा प्रमुख आधार आहे. त्यांनी आपल्या अंगी असणाऱ्या कलागुणांचा उपयोग परिस्थितीच्या बदलानुसार केला. तोफा ओतणारा हा समाज पोटासाठी, भांड्यांना कल्हई करून उपजीविका करू लागला. पूर्वीच्या काळी पंचधातू ओतून देवादिकांच्या मूर्ती तयार करणारा हा समाज जस्त ओतून पोळपाट, चमचे आणि उलथने तयार करू लागला. हा बदलत्या काळाचा महिमा म्हणावा लागेल. काळ बदलला, लोकांची अभिरुची बदलली, कलावंतांच्याकडे पाहण्याची दृष्टी बदलली आणि त्यात भर पडली ती यंत्रयुगाची.

यंत्रयुगामुळे आणि औद्योगिकीकरणामुळे हस्तकला मागे पडली, आणि पिढ्यान् पिढ्या हस्तकलेवर काळ गाजविणारे असे अनेक कलावंत समाज, पोटासाठी दाही-दिशा भटकंती करू लागले. ओतारी समाजही त्यातून सुटलेला नाही.

महाराष्ट्रामध्ये विदर्भ–मराठवाड्यात आणि खानदेशात ओतारी समाज अधिक प्रमाणात आढळतो. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात त्यांना निरनिराळ्या नावाने ओळखले जाते. ओतारी, वतकरी, ओतनकरी, वतारी, वसकर अशी या समाजाची नावे आहेत. महाराष्ट्राप्रमाणेच कर्नाटक भागात हा समाज काही प्रमाणात आढळतो. तेथे त्यांना 'कुंचगार' या नावाने ओळखले जाते.

गटवार विभागणी

महाराष्ट्रात हा समाज गटवार विभागला गेलेला आहे. पहिल्या गटात खडेवन, बांद्रे, पाठक, सावंत, काळे, कडारे, सादगन, वडे, भोंवळे, जोने आणि कळ-साईत या कुळी किंवा आडनावे प्रामुख्याने खानदेशात आढळतात, तर विदर्भातील अतिमागास गट म्हणून आढगळे, गरवारे, चाके, चारघोडे, सातपुते, वऱ्हाडे, काकडे, तरळे, वाघमांजरे, तायडे, डाळे, बावने, राऊत, नाईक आणि डोळे या कुळी प्रामु-ख्याने आहेत, हा विदर्भातील दुसरा गट म्हणून ओळखला जातो.

सांगली, पुणे, कोल्हापूर आणि सातारा या भागात चांदीकाम करणारा आणि थोडा फार पैसा जवळ बाळगून असणारा तिसरा गट आहे, त्यात धनाग्रे, शेंडे, जोगी, टेंबारे, लांड आणि सविलके यांचा समावेश होतो. ही मंडळी चांदीच्या मूर्त्या, वांगड्या किंवा स्त्रियांचे दागदागिने घडविणारे म्हणून ओळखली जातात. दागदागिने आणि कलाकुसरीची कामे करीत असल्याने अर्थातच, यांची आर्थिक प्राप्ती इतरां-पेक्षा बरी आहे एवढेच.

मराठवाडा आणि सोलापूर या भागातील या समाजाचा चौथा गट म्हणून ओळखला जातो. या गटात दंडे, खर्डे, चौधरी, साटे, उपरे, दिवटे, म्हाळगी, बलकार ढाके आणि गडेकर या कुळांचा किंवा आडनावांचा समावेश होतो. यातील काही मंडळी स्थिर जीवन जगत आहेत, तर काहींच्या वाट्याला भटकेपणा आलेला आहे.

याशिवाय या समाजातील पाचवा गट म्हणून जो ओळखला जातो त्यात डोंगरे, गायकवाड, खंडाळे, काकवार, देशमुख आणि भरसाखरेयांचा समावेश केल्याचे सांगण्यात आले. सतत भटकंती करूनच उपजीविका करणारांचे प्रमाण या गटात पोठे असल्याचेही सांगण्यात आले.

वरील सर्व गट स्वतंत्र मानले जातात. या गटांत आपापसात रोटी-बेटी व्यव-हार होत नसत. गेल्या काही वर्षांपासून या गटांत विवाह घडवून आणण्याचे प्रयत्न होत आहेत.

जात पंचायतीचे अस्तित्व

इतर भटक्या जातीजमातीप्रमाणे या समाजातही जात पंचायतीचे अस्तित्व

आजही टिकून असल्याचे आढळले. विशेषतः या समाजातील जे लोक किंवा त्यांचा विशिष्ट गट भटकंती करूनच स्वतःची उपजीविका करीत आहे अशा गटात किंवा भटकणाऱ्या लोकांत, जात पंचायतीचे अस्तित्व टिकविण्यासाठी धडपडणारे लोक आजही या समाजात आहेत. समाजातील लग्नकार्ये, मैत अगर इतर कार्यक्रमात जात पंचायतीचे निर्णय महत्वाचे मानले जातात. जातीबाहेर विवाह करणे किंवा अनैतिक संबंध ठेवणे, समाजातील बाई पळविणे किंवा दुसऱ्या समाजातील बाई आपल्या समाजात पळवून आणणे किंवा जातपंचायतीच्या नियमांचे पालन न करणे, या घटना समाजद्रोही मानल्या जातात. अशा प्रकारचे वर्तन करणाऱ्यास जात पंचायत समाजातून बहिष्कृत करते असे सांगण्यात आले. जात पंचायतीचे अस्तित्व हे समाज सुरक्षिततेसाठी अत्यावश्यक आहे असे मानणारे कितीतरी लोक या समाजात आजही पहावयास मिळतात.

ओतारी समाजात पूर्वी बालविवाहाची प्रथा रूढ होती. पाळण्याला बाशिंग लावून लग्न करणारे किंवा स्त्रीच्या गर्भारपणात तिच्या उदरातल्या गर्भाचा विवाह ठरविणारे भटके समाज अनेक आहेत. ओतारी समाजही त्याला अपवाद नाही. बालविवाह करणे हे या समाजात प्रतिष्ठेचे समजले जात होते. अशा विवाहप्रसंगी नवरा-नवरीच्या पित्याकडून हक्काने दारू प्यायची आणि मनसोक्त प्यायची, हा जणुकाही या समाजातील लोकांचा लग्नप्रसंगातील हक्क समजला जात असे.

समाजातील मुलीचे किंवा मुलाचे लग्न ठरविताना दारू पिणे हा मुख्य कार्यक्रम असे. दारूशिवाय लग्न ठरविणे किंवा लग्न मोडणे शक्य नसे. विवाहप्रसंगी मानपान करणे हा एक वेगळचा प्रतिष्ठेचा विषय या समाजात मानला जातो. शेलापागोटे मिळाले नाही किंवा वराकडील स्त्रियांना पायघड्या घातल्या गेल्या नाहीत तर ठरलेले विवाह मोडले जात असत.

अंधश्रद्धा

ओतारी हा धार्मिक समाज असल्याचे सांगण्यात आले. कालिकादेवी हे या समाजाचे प्रमुख कुलदैवत मानले जाते. अंगारे, धुपारे, नवस आणि उपवास हे या समाजात मोठ्या प्रमाणात आढळतात. देव अंगात येणे ही कल्पना या समाजात खोल रुजलेली आढळते, सर्व व्यवहार किंवा सर्व भरोसा कुलदैवतावर ठेवून ही मंडळी काम करतात. मग कोणाचे लग्न ठरायचे असो, घरातले आजारपण असो, अगर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे भुताची बाधा झालेली असो, या घटनांमागे दैवी चमत्कार मानला गेलेला आहे.

देवाला नवस करणे, देव वाढविणे, देव अंगात येणे किंवा देवाचा कोप होणे या सर्व कल्पना ओतारी समाजात आजही मोठ्या प्रमाणात असल्याचे आढळते. देवाच्या नावाने वर्षातून एकदा मोठमोठे उरूस किंवा जत्रा भरविल्या जातात. अशा जत्रेत महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेला हा समाज, एकत्र येतो. लग्न

ठरविणे किंवा काडीमोड घेणे, कर्जे वसूल करणे किंवा सामाजिक गुन्हेगाराला शिक्षा देणे अशी कामे जात पंचायत जत्रेच्या ठिकाणी पार पाडते. जत्रा हे या समाजाला एकत्र आणणारे मोठे माध्यम मानले गेले आहे.

महाराष्ट्राप्रमाणेच हा समाज कर्नाटक आणि आंध्रप्रदेशात आढळतो, त्यामुळे प्रत्येक प्रांतात किंवा विभागात राहणाऱ्या या समाजाची भाषाही भिन्न प्रकारची आहे. मराठी, तेलगू, कानडी या तीन प्रमुख भाषा मानल्या जातात, त्या भाषा त्यांच्या स्थानानुसार मातृभाषा मानल्या गेल्या आहेत. याशिवाय, व्यवसायासाठी म्हणून एक खास वेगळी सांकेतिक भाषा हे लोक बोलताना आढळतात. ही सांकेतिक भाषा मराठी, कानडी, तेलगू आणि हिंदी या चार भाषांच्या मिश्रणातून तयार झाल्याचे सांगण्यात येते. धंद्याच्या बेळी, गिऱ्हाईकाला न समजणारी परंतु आपापसात व्यवहार नक्की ठरविणारी ही भाषा आहे. काही ठिकाणी या भाषेला 'चौरासी' भाषा असेही म्हटले जाते. चार भाषांच्या मिश्रणातून बनलेली म्हणून चौरासी. आजही या सांकेतिक किंवा चौरासी भाषेचा या समाजात व्यवहारासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो.

मूळचा कलावंत

मुळातच हा ओतारी समाज हा कलावंत समाज म्हणून ओळखला जात असल्याने आजही त्यांच्या पारंपरिक कलागुणांना संधी मिळावी यासाठी समाजातील काही लोक सतत प्रयत्न करीत असतात. पूर्वीच्या काळी धातूचे ओतीव काम करणाऱ्या या समाजाच्या कलेचे अनेक पैलू पुरातन मंदिरांत आजही आपणाला पाहचला मिळतात. तोफा ओतण्याबरोबरच ही मंडळी देवादिकांच्या धातूंच्या मूर्ती तयार करीत. अशा मूर्ती, आजही कलेचा उत्तम नमुना म्हणून संग्रही ठेवलेल्या आहेत, किंवा पुरातन मंदिरात पहावयास मिळतात.

महाराष्ट्रात या समाजातील काही लोक आजही धातूच्या मूर्ती बनविण्याचे काम करतात, तर काही मंदिराचे कलात्मक कळस तयार करण्याचे काम करताना आढळतात. ओतारी माणसाच्या ओतीव कलेचा नमुना म्हणजे उत्कृष्ट शिल्पाकृतीचा आविष्कार म्हटले तर वावगे ठरू नये. परंतु असा आविष्कार साकारण्याची या समाजातील प्रत्येक ओताऱ्यालाच संधी मिळेल असे नव्हे. पोटासाठी भटकंती करीत पारंपरिक कलेचा उपयोग करून जगणाऱ्यांची संख्या या समाजात अधिक आहे. भांड्यांना कल्हई करणे, डाग देणे किंवा छोटी–छोटी भांडी तयार करणे, आणि वेळप्रसंगी तांबट कामही करणारांची संख्या या समाजात मोठी आहे.

पोटासाठी सतत भटकंती वाट्याला आल्याने स्थिर जीवनाचे फायदे या समाजाला मिळालेले नाहीत. धंद्याच्या निमित्ताने पोटासाठी सतत भटकावे लागत असल्याने अर्थातच शिक्षणापासून हा समाज अधिक दूर राहिला. आणि त्यामुळे अंधश्रद्धा, दैवी चमत्कार अशा कल्पनांना अज्ञानापोटी बळी पडताना आढळतो.

सरकारी योजनांचा फायदा अशा लोकांना मिळाला नाही.

गेल्या तीस-चाळीस वर्षात या समाजातील लोक व्यवसायाच्या निमित्ताने शहरात येऊन स्थाईक झालेले आहेत. त्यामुळे अर्थातच त्यांना स्थिर जीवनाचे फायदे मिळालेले आहेत, शिक्षण आणि व्यवसाय यांमध्ये ते प्रगती करीत आहेत, महाराष्ट्र शासनाच्या सवलतीचा फायदा घेऊन काहींनी स्वतंत्र उद्योग-व्यवसाय सुरू केलेले आहेत, तरुण पिढी शिक्षणाकडे ओढली जात आहे. परंतु अशा प्रकारे ज्यांना स्थिर जीवन मिळाले आहे, शिक्षणाचा ज्यांना फायदा झालेला आहे किंवा स्वतंत्र उद्योग व्यवसायात ज्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केलेले आहे, आणि आर्थिक दृष्टचा जे सुव्यवस्थित आहेत, अशी मंडळी मात्र, आपल्याच समाजातील इतर भटक्या दरिद्री बांधवांचा विचार करीत नाहीत, अशी तक्रार या समाजातील एका कार्यकर्त्याने केली.

वस्तुस्थिती काही असो, बहुसंख्य ओतारी समाज पोटासाठी आजही दाही दिशा वणवण भटकत आहे आणि दारिद्र्यरेषेखालचे जीवन जगतो आहे, हे खरे.

१३. गाडीलोहार

गाडीलोहार हा समाज महाराष्ट्रात 'भटका समाज' म्हणून ओळखला जातो. तो मुळचा राजस्थानातील असून १६ व्या शतकात तो महाराष्ट्रात आल्याचे सांगितले जाते. राजस्थानात याला 'रजपूत लोहार' म्हणून ओळखतात.

पूर्वीच्या काळी हा समाज युद्धाला उपयुक्त असणारी लोखंडाची शस्त्रास्त्रे तयार करण्याचे काम करीत असे. हा व्यवसाय त्यांचा किंवा त्यांच्या समाजाचा पारंपरिक जातधंदा म्हणून ओळखला जात असे. भाले, तलवार, बिचवे अशा प्रकारची हत्यारे हे लोक तयार करीत. त्यामुळे महाराणा प्रतापाच्या काळात यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. युद्धकाळातील अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून यांना महत्त्व होते. हे लोक त्या काळात राणाप्रतापाचे आश्रित म्हणून राहात असत. किबहुना, राणाप्रताप या लोकांचे आदर्श पुरुष आणि रक्षणकर्ते म्हणून ओळखले जात असत. त्याकाळात दुर्दैवाने, राणाप्रतापांना युद्धात पराभव पत्करावा लागल्याने त्यांच्या दरबारी असलेले लोक, चितोड सोडून परागंदा झाले. त्यामध्ये याही समाजाला राजस्थान सोडावे लागले आणि उपजीविकेसाठी परंपरेचा व्यवसाय काहींनी पुढे चालू ठेवला तर काहींनी गावगाडचाच्या व्यवस्थेत शेतीसाठी लागणारी अवजारे तयार करण्याचे काम स्वीकारले आणि ते त्या गावगाडचातले 'लोहार' झाले.

पोटासाठी भटकंती

चितोड सोडल्यानंतरच्या काळात या समाजाला उपजीविकेसाठी सतत भटकत राहावे लागले. या भटकंतीच्या काळात आपला प्रपंच किंवा व्यवसायाचे साहित्य वाहून नेण्यासाठी हे लोक प्रामुख्याने बैलगाडीचा वापर करीत. त्यामुळे त्यांच्या वाहनावरून त्यांना "गाडीलोहार" या नावाने लोक ओळखू लागले व नंतर तेच त्यांचे जातनाव म्हणून रूढ झाले.

या समाजातील काही लोक स्वत:ला लोहार असे म्हणवतात, तर काही लोक 'पांचाळ विश्वकर्मा' या नावाने स्वत:ची ओळख सांगतात. या समाजात प्रमुख चार भेद मानले जातात. त्यामध्ये गाडी लोहार, चितोडी लोहार, रजपूत लोहार आणि लष्करी लोहार या समाजांचा समावेश आहे.

१६ व्या शतकात राजस्थानातून परागंदा झालेले लोहार समाजाचे लोक, महाराष्ट्राशिवाय इतरही राज्यांत उपजीविकेच्या निमित्ताने, आज भटकत आहेत.

त्यांना तेथे वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. कर्नाटकात बैलकंबार, गुजराथमध्ये गाडी लोहार, हरियाणात बंजारा लोहार, तर आंध्र प्रदेशात लोहार या नावाने त्यांना ओळखले जाते.

पूर्वीच्या काळी अस्तित्वात असलेल्या ग्रामव्यवस्थेत या समाजाला बारा बलुतेदारांमध्ये महत्त्वाचे स्थान मिळाले होते, शेतीसाठी लागणारी लोखंडाची अवजारे (नांगर, फाळ, खुरपी, टिकाव, कुदळ वगैरे साहित्य) तयार करण्याचे काम हा समाज करीत असे, त्यांच्या कामाच्या मोबदल्यात गावकरी त्यांना वर्षाकाठी धान्य देत असत. त्यामुळे गावगाड्यातला बलुतेदार म्हणून या समाजाला वेगळे महत्त्व त्याकाळात असे.

बलुतेदार

या समाजातील जे लोक बलुतेदार म्हणून गावगाड्यात स्थिर झाले ते गावचे 'लोहार" म्हणून आजही खेड्यापाड्यात आढळतात. मात्र, ज्यांना असे स्थैर्य लाभले नाही किंवा ज्यांनी या व्यवस्थेत स्थिर जीवन स्वीकारले नाही ते मात्र गावोगाव भटकत राहिले. 'गाडी लोहार' म्हणून आजही ते भटकत आहेत.

या समाजाच्या व्यवसायाची प्रमुख साधने म्हणून भाता, ऐरण, सांडशी, मोढा, घण, पाँडी, छोटी हातोडी, मोठी हातोडी, छिन्नी, द्रप्पा, सिंगाडा यांचा समावेश होतो. ही व्यवसायाची हत्यारे हे लोक स्वत: घरीच तयार करतात.

या समाजाची मातृभाषा मारवाडी सांगितली जात असली तरी, भटकंतीच्या काळात त्यांचे अनेक भाषिकांशी संबंध आल्याने त्यांच्या भाषेत पंजाबी, गुजराथी, मारवाडी आणि मराठी या भाषांतील शब्द आज आढळतात. याशिवाय धंद्यासाठी म्हणून हे लोक वेगळी भाषा वापरतात, ती सांकेतिक भाषा म्हणून ओळखली जाते.

एकलिंगजीचे उपासक

गाडी लोहार हा समाज भाविक असून हे लोक शिवाचे उपासक आहेत. एकलिंगजी हे यांचे श्रद्धास्थान. समाजात कोणत्याही शुभकार्याला प्रारंभ करतेवेळी, "जय एकलिंगजी" अशा घोषणा करूनच सुरुवात करतात. या समाजातील स्त्रिया, अतिशय धार्मिक वृत्तीच्या आणि कष्टाळू म्हणून ओळखल्या जातात. घरच्या पुरुषाबरोबर त्या कष्ट करतात, वेळप्रसंगी स्वत: घणही मारतात. सर्व सणवार आणि उपासतापास त्या मनोभावे पाळतात. विशेषत: रक्षाबंधन हा सण या समाजाचा प्रमुख सण म्हणून मानला जातो. राखी पौर्णिमच्या दिवशी या समाजातील प्रत्येक स्त्री तिच्या भावाला राखी बांधते आणि पंचारतीने ओवाळते. रक्षाबंधन हा सण या समाजात अत्यंत पवित्र मानला जातो.

गाडी लोहार हे लोक गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात भटकत असले तरी त्यांनी त्यांचा खास राजस्थानी पेहराव आजही सोडलेला नाही. डोक्यावर राज-

स्थानी पगडी, अंगात राजस्थानी कुडता, कानात मोठ्या आकाराच्या रिंगा, हातात चांदीचे कडे, गळ्यात ताईत आणि दुलंगी राजस्थानी जोडा हे खास पुरुषांच्या पेहरावाचे वैशिष्टच आहे. तर स्त्रिया खास राजस्थानी पद्धतीची उलटच्या पदराची साडी, हातात आठ बांगड्यांचा चुडा, गळ्यात चांदीचे दागिने, कपाळावर चंद्रकोर असा पेहराव करतात. या स्त्रिया सर्वांगावर गोंदवून घेतात. गोंदून घेणे हे या समाजातील खास वैशिष्टच म्हणता येईल.

गावगाड्यातील पांचाळ लोहार (विश्वकर्मा) किंवा चितोडी लोहार, राजपूत लोहार आणि गाडी लोहार हे स्वतःला वेगवेगळे आणि इतरांपेक्षा खानदानी रजपूत क्षत्रिय समजतात. या समाजात आपआपसात बेटीव्यवहार होत नाही.

खास राजस्थानी पद्धतीने हे लोक विवाह साजरे करतात. विवाहप्रसंगी वधूवरांना राजस्थानी पेहराव केले जातात. लग्नवेळी हळद खेळणे आणि मेहेंदी लावणे याला विशेष महत्त्व दिले जाते. मुलींकडून हुंडा घेण्याची प्रथा या समाजात आहे. पूर्वी बालविवाह या समाजात सर्रास होत असत. गरोदर स्त्रीच्या पोटाला कुंकू लावून विवाह ठरविण्याची पद्धतीही या समाजात रूढ होती असे सांगण्यात आले.

गाडी लोहार हा भटका समाज असल्याने अर्थातच इतर भटक्या जातीजमातींप्रमाणे विवाहप्रसंगी दारूला अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. दारू पिणे आणि मांसाहार करणे हे लग्नप्रसंगातील महत्त्वाचे विधी मानले जातात. मुळात भटका असलेला हा समाज दारूपायी अधिक दरिद्री होत असल्याची खंत एकाने बोलून दाखविली. तो म्हणाला. या समाजात दारूला सन्मान आहे. दारूशिवाय कोणतेही समाजातील कार्य पार पडत नाही. याशिवाय बालविवाह, अनेकपत्नीत्व अशा प्रथा आजही या समाजात रूढ आहेत.

या समाजात मुलगा होणे हे शुभ मानले जात असे व मुलगी होणे हे अशुभ मानले जात असे. त्यामुळे कुटुंबात मुलगी जन्माला आली तर तिला जिवंत गाडण्याची प्रथा या समाजात होती. अलिकडे मात्र अशा प्रकारच्या अमानुष प्रथा या समाजातून कमी होत आहेत असेही त्याने सांगितले.

इतर भटक्या विमुक्त समाजांप्रमाणे या समाजात जातपंचायत अस्तित्वात असल्याचे सांगितले जाते. जातपंचायतीला या समाजात अतिशय महत्त्वाचे स्थान स्थान असून पंचायतीचे अलिखित नियम समाजातील सर्वांना बंधनकारक असतात. समाजातील भांडणतंटा, कुटुंबातील झगडे किंवा व्यवहारातील बेबनाव सोडविण्याची कामे पंचमंडळी करीत असतात. समाजाबाहेर लग्न करण्यास किंवा तसे संबंध ठेवण्यास जातकायद्यात बंदी आहे. या समाजातील एखाद्या पुरुषाने किंवा स्त्रीने जातीबाहेर विवाह केला किंवा बाहेरची बाई घरात ठेवली तर जातपंचायत अशा व्यक्तीस समाजातून बहिष्कृत करते. त्या व्यक्तीला सामाजिक कार्यात, लग्नकार्यात बंदी असते. समाज संबंधित व्यक्तीशी रोटीबेटी व्यवहार करीत नाही. त्यामुळे शक्यतो, समाजातील कोणीही व्यक्ती जातकायदे मोडण्याचा प्रयत्न करीत नाही.

या समाजातील एखाद्या व्यक्तीस बहिष्कृत केले असेल आणि स्वतःचा गुन्हा मान्य करून त्याला पुन्हा समाजात यावयाचे असेल तर, जातपंचायतीचा दंड म्हणून त्या व्यक्तीने समाजाला दारू आणि बकरे कापून जेवण द्यावे लागते. असे केले तरच ती व्यक्ती पुन्हा समाजात ऊठबस करू शकते.

या समाजात चव्हाण, पोवार, साळुंखे, पडवळ, सूर्यवंशी आणि शेलार या प्रमुख कुळी मानल्या जातात. या कुळांत आपापसात बेटी व्यवहार होतात. वरील कुळी समाजातील प्रमुख आडनावे म्हणून ओळखली जातात. विशेषतः या समाजातील मयतीच्यावेळी चार कुळांतील चार खांदेकरी असल्याशिवाय मैत उचलली जात नाही, असा संकेत आहे. मैतीच्या दहाव्या दिवशी या कुळांना बकरे कापून जेवण द्यावे लागते. त्या बरोबरच सर्वांना दारू पाजावी लागते. मांसाहार आणि दारू दिली तरच मैतीचे सुतक फिटले जाते असे या समाजात आजही मानले जाते.

पारंपरिक विचित्र रूढी-परंपरा आणि समाजाने दारूला दिलेली अनावश्यक प्रतिष्ठा ही या समाजाच्या आजच्या दारिद्र्याची मुख्य लक्षणे आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात यंत्रयुगामुळे हस्तव्यवसायाला उतरती कळा लागली त्याचा परिणाम याही समाजातील पारंपरिक व्यवसायावर झाला. परिणामी ह्यांच्या उपजीविकेचे माध्यम कमकुवत झाल्याने, आज या समाजाला उपजीविकेसाठी अन्य व्यवसायाकडे वळावे लागले आहे. याशिवाय रूढी परंपरेत जखडलेला हा समाज बदलत्या काळाचे भान न ठेवता आजही भूतकाळातच जगण्याचा प्रयत्न करीत असल्याने त्यांची आजही अवस्था अत्यंत दयनीय अशीच आहे. कित्येक वर्षापासून पोटासाठी सतत वणवण भटकत राहिलेला हा समाज शिक्षणापासून आणि सरकारी सवलतींपासून वंचित राहिलेला आहे. त्यामुळे अज्ञान, दारिद्र्य आणि पराकोटीचे मागासलेपण हे गाडी लोहारांच्या प्रगतीच्या मार्गातील मुख्य अडथळे आहेत. बहुजन स्थिर समाजाने त्यांच्या व्यथा समजून घेतल्या आणि त्यांना सहकार्याचा हात दिला तर त्यांचे प्रगतीचे अडसर अल्पावधीन दूर होण्यास मदत होईल असे वाटते.

❋

१४. कुंचीकोरवा

दुपारची वेळ. हडपसरजवळ रेल्वे रुळाच्या बाजूला वीस-पंचवीस झोपड्यांचं कोंडाळं एकत्र दिसतं. आम्ही त्या वस्तीत शिरतो. रस्त्याच्या कडेला दहा-पंधरा तरुण पोरं पत्त्याचा डाव मांडून बसलेली असतात. झोपड्यांच्या समोर अंगणात केरसुणीच्या फडांचा सडा पडलेला असतो. आपापल्या झोपड्यासमोर सडा हासडण्याचं काम पोक्त माणसं करीत असतात. आम्ही वस्तीत येताच सगळ्यांचे चेहरे कावरेबावरे होतात, लोक संशयाने आमच्याकडे पाहू लागतात. त्यांच्यापैकी एकजण जवळ येतो, 'कोन पायजे' म्हणून विचारतो. मी येण्याचं कारण सांगतो तेव्हा दहाबारा जण आमच्या भोवती गराडा घालतात. तिथली बायामाणसं आमच्याकडे पाहून आपापसात कुजबुजतात. मी गांगरून जातो. त्या जमावात एकही ओळखीचा चेहरा दिसत नाही. तेव्हा माझ्या भोवतीच्या लोकांना मी अजीजीने सांगू लागतो, 'मी तुमच्या समाजाची माहिती घ्यायला आलोय, तुमच्या अडीअडचणी समजून घ्यायला आलोय...' माझं बोलणं अर्धवट होताच त्या गर्दीतलाच तांबूस आणि तारवटलेल्या डोळ्यांचा एक तरुण सरळ अंगावर येऊन खेकसतो, 'आसलं लयी पुढारी येत्यात रोज, शाळा देऊ, घर देऊ म्हनत्यात आन् मत मागत्यात ... साले कोनबी काय करत न्हाय...' त्याचं बोलणं चालू असतानाच जमलेल्या लोकांत एकच गोंधळ होतो. लोक त्यांच्या भाषेत आपापसात मोठमोठ्याने बोलायला लागतात. मी गोंधळून जातो, मला काही सुचत नाही...

मी तिथेच ओशाळून उभा... तेवढ्यात पँट-मॅनेला घातलेला, तरतरीत हसऱ्या चेहऱ्याचा मारुती लिमा पवार माझ्या जवळ येतो, माझ्या येण्याचं कारण त्याला समजलेलं असतं. तरुण भारतातील इतर भटक्यांचे काही लेख त्याने वाचलेले असतात. तो ओळखतो आणि इतरांना त्यांच्या भाषेत समजून देण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा पन्नाशी ओलांडलेला तम्मा यल्लाप्पा जाधव त्याच्या झोपड्याकडे आम्हाला घेऊन जातो, झोपड्याबाहेरच अंगणात चटई टाकतो. आम्ही तिथं बसल्यावर मारुती सांगू लागतो... 'आम्ही कुंची कोरवा हाये. लोक आम्हाला 'माकडवाले' म्हणत्यात.'

अठरा विश्वे दारिद्र्याच्या ओझ्याखाली गुदमरलेला माकडवाला पोटाची खळगी भरण्यासाठी तुमची-आमची करमणूक करीत गावोगाव भटकताना आपण

पहातो. माकड आणि माकडीण झबलं–टोपडं घालून त्याच्या इशाऱ्यावर नाचतात, आपापसात खोटीखोटी मारामारी करतात. माकडाचं नाव 'लाल्या' तर त्याची धर्मपत्नी असते भागाबाई. लाल्या आणि भागाबाईच्या कौटुंबिक ताण–तणावाचं प्रात्यक्षिक माकडवाला आपल्या समोर करीत असतो, आणि पोटाला पैपैसा मागत असतो. माकडवाला तसा प्रस्थापितांच्या बाळगोपाळांचे आकर्षण, त्यांच्या कौतुकाचा विषय असतो.

देश तसा वेष

तसं पाह्यलं तर या समाजाचं मूळचं नाव 'कुंची कोरवा.' मात्र ते स्वतःची ओळख 'कुचेकर' अशी करून देतात. अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात भटकंती करीत असलेली ती माणसं, किमान त्यांच्या पोषाखाने, महाराष्ट्रीय झालेली आहेत. भाषा कैकाडी, आणि रूढी परंपरा भटक्यांच्या असा सर्वसमावेशक परंतु इतर भटक्या समाजाच्या तुलनेने अत्यंत दरिद्री आणि शिक्षणाने मागासलेला हा समाज.

महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात, गावगाड्याच्या आश्रयाने जगणारा किंवा गावगाड्यातल्या सधन शेतकऱ्यांना धान्यासाठी शिदीच्या झाडाच्या फोकापासून बनविलेल्या कणग्या, पाट्या, हारे, डुरकूली, झाप अशा रोजच्या वापरातल्या वस्तू तयार करून घरोघर किंवा आठवड्याच्या बाजारात विकणारा 'कैकाडी' ग्रामीण लोकांच्या तसा परिचयाचा आहे. 'कुंचीकोरवा' हा समाज कैकाडी जातीची एक पोटजात मानली जाते. ज्या कैकाड्यांनी आपला पारंपरिक धंदा सोडून माकडं पाळली आणि त्यावरच आपली उपजीविका सुरू केली ते पुढे माकडवाले म्हणून परिचित झाले असे त्यांच्यापैकी एकाने सांगितले.

परंपरागत व्यवसाय

तम्मा यल्लाप्पा जाधव सांगतो- आमचे वाडवडील जंगलात मिळणाऱ्या गोगड गवताच्या मुळापासून विशिष्ट प्रकारचे ब्रश पूर्वी तयार करीत असत, त्यांचा उपयोग मोठ्या प्रमाणात घोंगड्या बनविण्यासाठी केला जात असे. घोंगडीला चिचुक्याची खळ लावून त्यावर ब्रश किंवा त्यांच्या भाषेत 'कुंची' फिरवली की घोंगड्या सुबक होण्यास मदत होते. त्यामुळे असे ब्रश घोंगड्या करणाऱ्या कारखान्यात सर्रास घेतले जात असत किंवा वेळप्रसंगी हे लोक सुद्धा घरच्या घरी घोंगड्यावर अशा प्रकारची प्रक्रिया करीत असत. परंतु कालांतराने औद्योगिकीकरणाचा परिणाम म्हणून हस्तव्यवसाय मागे पडला, पर्यायाने गवताचे कुंचले (ब्रश) निरुपयोगी ठरले आणि हा समाज बेकार झाला. पुढे पोट भरण्यासाठी त्यांना अन्य व्यवसायाकडे वळावे लागले. काहींनी माकडाचे खेळ सुरू केले, काही जण बुट्टीका बाल (साखरेच्या पाकापासून बनवलेला कापसासारखा पदार्थ) विकण्याचा धंदा करू लागले, तर काही जण डोक्यावर सिनेमाचं खोकं घेऊन भटकत राहिले, 'रानीका बंगला देखो'

काला घोडा देखो' असे म्हणत, लहान मुलांचं मनोरंजन करीत, पैपैसा जमवीत पोट भरू लागले. प्रत्येकाचे व्यवसाय वेगळे झाले, प्रत्येकाची राहण्याची ठिकाणे बदलली. ज्याला जे जमलं ते करीत तो पोटासाठी आज इथं तर उद्या तिथं असा भटकत राहिला. पर्यायाने, स्थिर जीवनापासून हा समाज दूर गेला आणि उपऱ्या उपलानी परंपरेत समाधान मानून जगत राहिला.

कुचेकर, पोवर, जाधव ही ह्या समाजातील मुख्य कुळे समजली जातात. या कुळांमध्ये आपापसात रोटीबेटीव्यवहार होतो, मात्र एकाच कुळात विवाह होत नाहीत. कुळांना समाजात स्वतंत्र प्रतिष्ठा असते, समाजात कुळांच्या प्रतिष्ठेनुसार उच्चनीचता मानली जाते.

इतर भटक्या विमुक्त समाजाप्रमाणे या समाजातही जातपंचायत आजही अस्तित्वात आहे. जात पंचायतीचे पारंपरिक अलिखित नियम समाजातील सर्वांना बंधनकारक असतात. समाजातील लग्नकार्ये, मैत अथवा आपापसातील व्यवहार आणि भांडणतंटयाचा न्यायनिवाडा करण्याची कामे जात पंचायत करीत असते. पंचायतीत पाच जाणकार लोक पंच म्हणून काम पाहातात, तर पंचायतीचा प्रमुख म्हणून जाधव कुळाला पाटीलकीचा मान असतो.

समाजातील लग्नप्रसंगी पंचायतीला फार महत्त्व असते. लग्न ठरविण्यापासून लग्न लावण्यापर्यंत सर्व कामे पंचायत करते. या मोबदल्यात नवरानवरीकडून प्रत्येकी एकशे एक रुपया पंचायतीला द्यावा लागतो. या रकमेतून पंचायत धान्य खरेदी करते आणि समाजातील प्रत्येक कुटुंबाला एक किलोच्या हिशोबाने धान्य वाटते.

लग्न समारंभ

समाजातील वेगवेगळ्या गुन्ह्याला जात पंचायतीची शिक्षा ठरलेली असते. पंचामार्फत एखादे लग्न ठरलेले असेल आणि ते जर संबंधितांनी काही कारणामुळे मोडले तर पाचशे एक्कावन्न रुपयापर्यंत दंड पंचायत त्या व्यक्तीकडून वसूल करते. जर अशा प्रकारचा दंड संबंधिताने भरला नाही तर पंचायत त्याला समाजातून बहिष्कृत करते, त्याच्याशी इतर व्यक्ती कोणतेही संबंध ठेवीत नाहीत अगर बहिष्कृत व्यक्तीस समाजातील लग्नकार्यात आणि मौतकार्यात सहभागी होता येत नाही.

परंतु एखाद्या बहिष्कृताने पंचाच्या पायावर डोके ठेवून माफी मागितली तर मात्र त्याला पुन्हा समाजात सामावून घेतले जाते.

या समाजातील लग्नसोहळा दोन दिवस चालतो. पहिल्या दिवशी पंचांसमक्ष नवरानवरीवर अक्षदा टाकण्याचा विधी होतो, तर दुसरे दिवशी बकरे कापून लग्नास आलेल्या पाहुण्यांना दारू आणि जेवण दिले जाते. लग्नवरच्या प्रमुखांनी पाहुण्यांना दारू देण्यात पक्षपात केला तर प्रचंड भांडणे होतात. पिलेले आणि न पिलेले सर्वच आपापसात भांडतात. काही वेळा भांडणाचे पर्यवसान मारामारीत होते.

पूर्वी या समाजात बालविवाह रूढ होते. गरोदर बाईच्या पोटाला कुंकू लावून

पोटातल्या गर्भाचा विवाह निश्चित केला जात असे किंवा मुलगी झाली की त्याच दिवशी सोयऱ्याच्या घरी जाऊन तिचं लग्न पक्कं केलं जात असे. अलिकडे ही प्रथा थोडी कमी होऊ लागली आहे, पण अजूनही बालविवाह सर्रास होताना आढळतात.

अनेकपत्नीत्वाची चाल या समाजात आहे. त्याप्रमाणेच पुनर्विवाहाची चालही पिढ्यान् पिढ्या या समाजात रूढ आहे, त्याला ते 'मोहतूर लावणे' असे म्हणतात. मोहतूर लावणेच्या वेळी, पुनर्विवाहाच्या स्त्रीला लाल रंगाची साडी आणि पुनर्विवाहित पुरुषास धोतर पागोटे असा पोषाख केला जातो. ऐपतीप्रमाणे समाजातील लोकांना जेवण देतात. अशा विवाहात मात्र मोहतूराच्या पत्नीला लग्नाच्या बायकोचा दर्जा मिळत नाही, तिला समाजातील समारंभात मानपान मिळत नाही. 'स्त्रीने पुनर्विवाह करणे म्हणजे कुंकवाच्या ठिकाणी शेण लावणे' असे समजले जाते.

अंत्यसंस्कार पद्धती

प्रत्येक भटक्या विमुक्ताच्या जगण्यामरण्याच्या तऱ्हा वेगवेगळ्या आहेत. मैतीनंतर काही समाज प्रेताचे दहन करतात तर काही दफन करतात. कुंची कोरवा या समाजात मैत झाली तर फटाके वाजविले जातात, मैतीवर पैसे उधळले जातात आणि वाजत गाजत प्रेताला पुरून टाकतात. तीन दिवसानंतर प्रेताच्या नावाने बकरं कापतात आणि सोयऱ्यांना जेवण देतात. त्याला 'कडू घास' काढणे असे म्हटले जाते. नंतर दहा आणि तेरा दिवसांनी प्रेताचा दहावा आणि तेरावा साजरा केला जातो असे एकाने सांगितले.

हा समाज तसा टोकाचा देवदेवतेला मानणारा आणि अंधश्रद्धाळू आहे. मरिमाता, यल्लम्मा, दुर्गामाता आणि मारुती या यांच्या प्रमुख देवदेवता आहेत. त्यांच्या नावाने नवस करणे, उपवास धरणे, कोंबडे–बकऱ्यांचा बळी देणे सर्रास चालू असते. वरील देवदेवतांचे वारे अंगात येते अशी यांची भ्रामक कल्पना आहे. अंगात आलेल्या व्यक्तीला समाजात स्थान असते, समाजाचा तो देवऋषी असतो. गंडा-दोरा, भारलेली लिंबं भूत–पिशाच्चावर उतारा म्हणून तो देत असतो. त्याच्यावर लोकांचा विश्वास असतो. या समाजातील स्त्रिया देवभोळ्या आणि अशिक्षित आहेत. केरसुणी, फडे तयार करण्याचं काम त्या घरबसल्या करतात तर फणी, दोरे, मणी, सुया, पोत अशा वस्तू घेऊन दारोदार भटकत असतात. घरच्या कर्त्या पुरुषाबरोबर त्याही पैपैसा आणून प्रपंचाला लावतात.

फलटण शहराच्या उत्तरेला फलटण नाक्याजवळ या समाजाची मोठी वस्ती आहे. तिथे या समाजाची पक्की घरे उभी आहेत. हा परिसर माकडमाळ या नावाने ओळखला जातो. गेली अनेक वर्षांपासून शहराच्या जवळ आश्रय मिळाल्याने, अर्थातच थोड्याफार प्रमाणात या समाजात शहरी वातावरणाचा परिणाम जाणवतोय. फलटणच्या आसपास स्थिरजीवन लाभल्याने शिक्षण, नोकऱ्या आणि छोटे मोठे व्यवसाय करणे यांना शक्य झालं आहे. फलटणच्या माकडमाळावरचा माकड-

वाल्याचा तरुण पोर आता पॅन्ट शर्ट अशा पोशाखात वावरताना दिसतो आहे, त्याला शिक्षणाचं महत्त्व कळायला लागलंय, शिक्षणाबरोबरच उद्योग–व्यवसाय करून घरची आर्थिक स्थिती चांगली करण्याचा तो प्रयत्न करतोय. म्हणूनच तिथला माकडवाला कनवटीला चार पैसे साठवून असल्याचं बोललं जात. अशी साठवण करायला त्यांना कित्येक पिढ्या गारद कराव्या लागल्या आहेत. स्थिर जीवन सहजासहजी त्यांना मिळालेलं नाही. त्यागातून, कष्टातून त्यांनी त्यांचे भटके जीवन थोडयाफार प्रमाणात स्थिर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु आणखी कितीतरी माकडवाले आजही माकडासारख्या कसरती करून कसंबसं आपलं आयुष्य सावरताना दिसताहेत. अंगावर चार–पाच गाठींचं विरलेलं जुनेर... उघडी नागडी आणि महिनोन् महिने डोईला तेलाचा स्पर्श न झालेली पोरं आणि पाठीला लागलेली पोटं, आजही हे चित्र या समाजात पहावयास मिळतंय. अस्थिर जीवन, शिक्षणाचा अभाव आणि टोकाची अंधश्रद्धा हीच या मागची मुख्य कारणे आहेत असे वाटते.

❊

१५. रायरंद

वर्षानुवर्षे भटक्याचे जीवन जगणारा 'रायरंद' हा कलावंत समाज म्हणून महाराष्ट्रात ओळखला जातो. हा समाज मूळचा महाराष्ट्रातील असून त्याच्या विषयी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लोकांना एक वेगळे कौतुक वाटत असते. या समाजाच्या पारंपरिक विशिष्ट 'रायरंदी' कलेमुळे हे लोक इतरांचं लक्ष वेधून घेण्यात अत्यंत हुशार असतात. निरनिराळी सोंगे घेऊन, वेगवेगळे वेष परिधान. करून हे लोक वर्षातील ठराविक मौसमात गावोगावी उंट घेऊन भटकत असतात. त्यांच्या सोंगाढोंगाच्या खेळात ते उंटालाही सहभागी करून घेतात. त्यांच्या खेळात प्रामुख्याने संवाद, पुराणकथा आणि गाण्यांचा समावेश असतो. 'डफ' हे त्यांच्या खेळातले प्रमुख वाद्य असून डफाच्या विशिष्ट ठेक्यावर 'बाजीराव नाना आता तुंबडीभर दे ना' आशा प्रकारची गाणी म्हणत ते लोकांचे मनोरंजन करतात. आणि त्यांच्या कलेवर, खेळावर किंवा गाण्यावर खूप होऊन लोकांनी दिलेल्या पैशावर स्वत:ची आणि कुटुंबाची उपजीविका करतात. हे लोक बोलण्यात अत्यंत पटाईत, हजरजबाबी आणि विनोदी म्हणून ओळखले जातात.

उंटाच्या पाठीवर बिऱ्हाड

रायरंद हा समाज वर्षातील ठराविक मौसमात म्हणजेच पावसाळा संपल्या-नंतर आपल्या भटकंतीला सुरुवात करतो. हे लोक एकएकट्याने कधीच फिरत नाहीत. तर सग्या-सोयऱ्यांची आणि नातेवाईकांची चार-पाच बिऱ्हाडं मिळून गावो-गावी भटकत असतात. त्यांच्या सोबत त्यांचे कुटुंब, मुले–बाळेही भटकत असतात. सामान वाहून नेण्यासाठी हे लोक घोड्यांचा वापर करतात. त्यांच्या बरोबर त्यांची पाळलेली चार–दोन कारवानी कुत्रीही असतात प्रत्येक कुटुंबाचे स्वत:च्या माल-कीचे दोनतीन उंट असतात. काहीवेळा प्रवासात उंटाचा उपयोग ते बसण्यासाठीही करतात. उंटाशिवाय रायरंद हा महाराष्ट्रात असू शकत नाही, असे एकाने सांगितले. खेड्या–पाड्यात उंट घेऊन येणारा हा रायरंदशिवाय दुसरा असू शकत नाही, इतका विश्वास ग्रामीण लोकांमध्ये आजही आहे. मात्र पुण्यासारख्या शहरात उंट घेऊन येणाऱ्या रायरंदला, त्याची चौकशी न करता, राजस्थानी उंटवाला म्हणून प्रसिद्धी दिली गेल्याची उदाहरणे एकाने सांगितली.

हा समाज महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात अत्यंत परिचित असल्याने गावातल्या एखाद्या सोंगी-ढोंगी व्यक्तीस 'रायरंदी सोंगाड्या' किंवा 'रायरंद' म्हणून उपरोधाने म्हणण्याचा प्रघात आहे.

सोंग करून जगणाऱ्या किंवा विविध रूपे बदलून उपजीविका करणाऱ्या रायरंद शिवाय आणखी वेगळ्या दोन भटक्या जमाती महाराष्ट्रात आहेत. त्यांना 'बहुरूपी' आणि 'मराठा रायरंद' या नावाने ओळखले जाते. विदर्भ मराठवाड्यात 'मुसलमान रायरंद' या नावाची आणखी एक जमात असल्याचे सांगण्यात आले. उंटवाला रायरंद आणि वरील बहुरूपी, मराठा रायरंद आणि मुसलमान रायरंद यांचा तसा संबंध नाही. या चारही जमाती, भटक्या असल्या किंवा सोंगं करून जगत असल्या तरी त्या स्वतंत्र आहेत. प्रत्येकाचे रीतीरिवाज, दैवते, भाषा, पोषाख, आणि जगणं-मरणं वेगवेगळं आहे यांच्यात आपापसात रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत असे एकाने सांगितले

वाटून आलेली गावे

महाराष्ट्रातील रायरंद समाज हा ठराविक गावांत विभागला गेलेला समाज आहे. त्यांच्यातील प्रत्येक कुटुंबाला किंवा कुळाला ठराविक गावे खेळ करण्यासाठी किंवा भिक्षा मागण्यासाठी (जगण्यासाठी) दिलेली आहेत. ज्यांना जी गावे वाटयाला आली त्यांनी त्याच गावांत फिरायचं, खेळ करायचा आणि मिळकत करायची अशी प्रथा पिढ्यान् पिढ्या चालू आहे.

महाराष्ट्रात औरंगाबाद, परभणी, सोलापूर, नगर आणि पुणे जिल्ह्यात रायरंद समाजाची वस्ती आढळते. या जिल्ह्यांत काही गावांत या लोकांची पक्की घरे बांधलेली आहेत, काही शेतजमीन करतात, तर काही मोलमजुरी करून उपजीविका करतात. मात्र पावसाळा संपला की, आपापल्या मागत्या गावी उंट घेऊन हे लोक भटकत राहतात. त्या काळात पैपैसा, धान्य, कपडे गोळा करून पुन्हा आपल्या घरी परत येतात.

इतर भटक्या-विमुक्त जमातींप्रमाणे या समाजतही कुळांचे महत्त्व सांगण्यात येते. खरात, सुतार, चव्हाण, खंडागळे, जगताप आणि शिंदे ही आडनावे या समाजातील मुख्य कुळचा असून, त्यांना समाजात चढत्या क्रमाने प्रतिष्ठा दिली जाते. यातील काही आडनावे किंवा कुळांतील लोक त्यांच्या जातपंचायतीचे पिढ्यान् पिढ्या प्रमुख असल्याचे सांगण्यात आले. पुणे जिल्ह्यात खरात आडनावाचे लोक आढळतात.

जात पंचायतीचे नियंत्रण

रायरंद समाजात जातपंचायतीचे महत्त्व मानले जाते. परंपरेने चालत आलेले जातपंचायतीचे अलिखित नियम काटेकोरपणे जातीत पाळले जातात. मात्र एखाद्या

व्यक्तीने जातीचे नियम डावलले किंवा जातीत अनैतिक संबंध ठेवले किंवा बाहेरच्या जातीतील स्त्री घरात घेतली तर जातपंचायत अशा व्यक्तीस दोषी धरून, गुन्हेगार समजते आणि त्याला ठराविक मुदतीपर्यंत जातीबाहेर टाकते किंवा बहिष्कृत करते. अशा बहिष्कृत व्यक्तीस किंवा त्याच्या कुटुंबास कोणत्याही गावात खेळ करता येत नाही किंवा दान मागता येत नाही. त्यामुळे या समाजातील कोणतीही व्यक्ती जातपंचायतीचे नियम डावलण्याचे धाडस करीत नाही असे एकाने सांगितले.

जातिबहिष्कृत करण्याच्या शिक्षेशिवाय रोख रकमेचा दंडही केला जातो. व्यक्तीच्या गुन्ह्याचे स्वरूप पाहून शंभर रुपयांपासून चारशे रुपयांपर्यंत संबंधित व्यक्तीला जात पंचायत दंड करू शकते. दंडाची रक्कम भरल्यास त्या व्यक्तीस समाजात, लग्नकार्यात किंवा विधीकार्यात भाग घेता येतो

रायरंद समाजात पूर्वी बालविवाहाची प्रथा अस्तित्वात होती. लहान वयात मुला-मुलींचे विवाह केले जात असत. लग्नसोहळा तीन ते पाच दिवस चालत असे. या पाच दिवसांत रायरंद स्त्रिया गाणी म्हणत, उखाणे घालत असत.

लग्नप्रसंगी हुंडा देण्याची किंवा घेण्याची रीत या समाजात नाही. मात्र लग्नखर्च म्हणून मुलाने मुलीला काही रक्कम देण्याचा रिवाज आहे, त्याला दयाज असे म्हणतात.

या समाजात बहुपत्नीत्वाची प्रथा पूर्वीपासून रूढ आहे. सोयरसंबंध जोडण्यासाठी पूर्वी अनेक कुटुंबांतील स्त्रियांशी विवाह केले जात असत. गेल्या काही वर्षांपासून बहुपत्नीत्वाची चाल या समाजातून नाहीशी होत असल्याचे एकाने सांगितले.

या समाजात पुनर्विवाहाची प्रथा पूर्वीपासून चालत आलेली आहे. एखाद्या व्यक्तीची पत्नी मरण पावल्यास त्याला दुसऱ्या स्त्रीशी लग्न करण्याची मुभा पंचायत देते, परंतु अशा पुनर्विवाहाला विवाह न म्हणता 'मोहतूर' किंवा 'पाट लावणे' असे म्हटले जाते. अशा प्रकारे पाट लावलेल्या स्त्रीस लग्नाच्या पत्नीचा दर्जा दिला जात नाही. किंवा लग्नकार्यात सवाष्ण म्हणून मान्यता दिली जात नाही. तिला 'म्होतराची' किंवा पाट लावलेली म्हणून हिणवले जाते.

या समाजातील विधवा किंवा काडीमोड घेतलेली स्त्री, अशा प्रकारे, मोहतूर किंवा पाट लावू शकते.

रायरंद समाजात एकाच आडनावात किंवा कुळामध्ये बेटी व्यवहार होत नाहीत. शक्यतो मामाच्या किंवा (आत्याच्या मुला-मुलीशी विवाह करण्याची पद्धत आहे. लग्नात मामाला मानपान दिला जातो. 'पोट झाकणे' दिले जाते.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा

इतर भटक्या-विमुक्त समाजांप्रमाणे हा समाजसुद्धा अंधश्रद्धेचा बळी असलेला समाज आहे. देवदेवतांना नवस करणे, कोंबडे कापणे, उपासतापास करणे, किंवा देवदेवतांच्या नावाने गळ्यात गंडेदोरे बांधण्याची प्रथा या समाजात आहे.

सटवाई, खंडोबा आणि कारुंड्याचा नाथभैरव ही याची प्रमुख दैवते असून या देवदेवतांच्या जत्रा वर्षातून एकदा भरवल्या जातात. देवाच्या जत्रेच्या वेळी महाराष्ट्रात रायरंद एकत्र येतात. तेथे जातपंचायत बसते, व्यवहार होतात, लग्नकार्ये जमविली जातात किंवा मोडली जातात.

रायरंदांच्या घरात त्यांच्या देवदेवतांचे मुखवटे किंवा तसबिरी पहावयास मिळतात. देवदेवता घरात असल्या म्हणजे भूत–पिशाच्चापासून संरक्षण होते अशी यांची भावना आहे. विशेषतः प्रत्येक महिन्याच्या अमावस्येला भुताखेतापासून बाधा होऊ नये म्हणून हे लोक विशिष्ट प्रकारे पूजाअर्चा करतात.

असा हा महाराष्ट्रात परिचित असलेला रायरंद समाज, काही प्रमाणात आजही खेडोपाडी उंट घेऊन भटकताना आढळतो. आज तो वाड्या–वस्त्यावर खेळ करून पै–पैसा मागत असला तरी पूर्वी तो एकाच जातीचा 'मागता' किंवा आश्रित समजला जात असे. 'मागते' म्हणजे विशिष्ट जातीच्याच हातचे खाणारा किंवा विशिष्ट जातीलाच आपला आश्रयदाता मानून त्यांची करमणूक करणारा असा समाज होय.

मातंग समाजाच्या आश्रयाने पिढ्यान् पिढ्या जगणारा किंवा मांगवाड्याच्या आधाराने त्यांच्या वस्तीत काही काळ राहून, त्यांची करमणूक करून, त्यांच्याच अन्नावर उपजीविका करणारा 'उक्कलवार' या नावाने ओळखला जाणारा समाज आजही महाराष्ट्रात (विदर्भ मराठवाड्यात) आढळतो, तशाच प्रकारची रायरंद ही भटकी जमातसुद्धा, पूर्वाश्रमीच्या महार या जातीची आश्रित किंवा 'मागती जमात' म्हणून ओळखली जात असे.


पूर्वीच्या काळी, रायरंद लोक मुख्यतः त्या वेळच्या महारवाड्यात उतरत किंवा चावडीत आपलं बिऱ्हाड मांडीत आणि चावडीच्या अंगणात उंटाचा खेळ करून त्यांची करमणूक करीत. वेगवेगळी सोंगे घेऊन किंवा पुराणकथा सांगून त्यांना खूष करीत आणि रात्री जेवणाच्या वेळी, महारवाड्यात दारोदार जाऊन डफ वाजवीत व म्हणत, 'आई, रायरंदाला पोटाला द्या' 'बापा रायरंद आलाय, हक्क द्या.'

स्थिर जीवनाची ओढ

अशा प्रकारे हक्काने भाकरी-भाजी मागून हे लोक पूर्वी स्वतःची उपजीविका करीत असत. परंतु गेल्या पंचवीस-तीस वर्षात रायरंदाच्या जगण्याचं चित्र बऱ्याच अंशी बदलून गेलेलं आहे. कारण पूर्वाश्रमीच्या महार समाजाने बौद्ध धर्म स्वीकारला, पूर्वीच्या रूढी परंपरा त्यांनी सोडल्या, पूजाअर्चा आणि श्रद्धास्थाने बदलली, बौद्ध म्हणून ते जगू लागले. तेव्हा त्यांच्याच पावलावर पाऊल टाकीत, रायरंदांनीही बौद्ध धर्म स्वीकारलाय. पूर्वीचं जगणं सोडण्याचा प्रयत्न केलाय, 'मागते' म्हणून जगणं आता त्यांनी नाकारलंय, आता ते स्वतःचं वेगळं अस्तित्व तयार करू लागले आहेत. बौद्ध म्हणूनच स्वतःची ओळख करून देत आहेत. आणि वेगळ्या प्रवाहात

जगण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्यापैकी काही जण गावोगावी स्थिर झाले आहेत, काहीजण शेतीचा व्यवसाय करीत आहेत, काही मोलमजुरी करून जगताहेत. काही तरुणांनी पिढ्यान् पिढ्यांची गायकीची कला जिवंत ठेवण्यासाठी आता कलापथके सुरू केली आहेत. आणि वेगळ्या पद्धतीने ते आता कार्यक्रम करू लागले आहेत. शिक्षणाचे महत्व त्यांना कळलेले आहे. ते आपल्या मुलामुलींना शाळेत पाठवत आहेत. गेल्या अनेक पिढ्यांच्या भटकेपणामुळे आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक बाबीतील भयंकर तोटे त्यांना जाणवलेले आहेत. परंतु हजारो वर्षांचे उपेक्षितपण केवळ पंचवीस–तीस वर्षात संपणार नाही, याची त्यांनाही जाणीव आहे. मात्र बदलत्या समाजाचे त्यांनी स्वीकारलेले वेगळे आव्हान त्यांच्या दृष्टीने थोडे नव्हे! ते स्थिरावण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांनाही भटकेपणाचा आता कंटाळा येऊ लागलेला आहे. नवजीवन घडविण्याच्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी, आपल्या मायेची, ममतेची आणि सहकार्याची त्यांना गरज आहे.





१६. डोंबारी

वर्षानुवर्षे कसरतीचे प्रयोग करून लोकांचे मनोरंजन करणारा आणि त्यावरच आपली उपजीविका करीत असलेला डोंबारी समाज महाराष्ट्रात परिचित आहे. हा समाज मूळचा गुजरातमधील असून पोट भरण्याच्या निमित्ताने गावोगावी भटकत तो महाराष्ट्रात आलेला आहे.

गेली अनेक वर्षे हे लोक महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांत कसरतीचे प्रयोग करीत भटकत असल्याने महाराष्ट्रातील खास चालीरीतींचा प्रभाव या समाजावर आढळतो. विशेषत: त्यांचे पेहराव गुजराती पद्धतीचे राहिले नसून खास मराठमोळचा पेहरावात या समाजातील स्त्री-पुरुष भटकत असतात. शर्ट, धोतर, टोपी किंवा फेटा असा पुरुषांचा वेष, तर साडी, चोळी हा स्त्रियांचा पेहराव पहावयास मिळतो. त्यांची मातृभाषा गुजराथी असल्याचे त्यांच्यातील काही मंडळी सांगत असली तरी मराठी भाषेचा प्रभाव त्यांच्यावर अधिक जाणवतो, घरगुती व्यवहारात हे लोक मराठी मिश्रित गुजराथी बोलतात तर खास कसरतीचे खेळ करतेवेळी ते सर्व संभाषण मराठीतच करतात.

डोंबारी व कोल्हाटी एक नव्हे

महाराष्ट्रात या समाजाला गोपाळ या नावानेही काही भागात ओळखले जाते. महाराष्ट्रात असलेला मूळचा 'गोपाळ' (गाई म्हशी. पाळणारा) आणि डोंबारी गोपाळ हे दोन्ही समाज स्वतंत्र भटके समाज आहेत. त्यांचा कसल्याही प्रकारचा संबंध नाही. त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार केले जात नाहीत. महाराष्ट्राशिवाय उत्तर प्रदेश, राजस्थान आणि काही प्रमाणात आंध्र प्रदेशात या समाजाचे लोक आढळतात. अर्थात ते तिथले मूळचे नसून कसरतीच्या प्रयोगाच्या निमित्ताने पोट भरण्यासाठी भटकत हे वरील राज्यांत गेलेले आहेत.

उत्तर प्रदेशात किंवा त्यांच्या मूळ ठिकाणी गुजरात राज्यात डोंबारी समाजाला "नट" या नावाने ओळखले जाते. उत्तर प्रदेशातील मूळ 'नट' नावाच्या कलावंत जमातीशी हे लोक आपले साम्य सांगतात, तर काही लोक कोल्हाटी समाजाप्रमाणे 'नट' हाच आमचा मूळ पुरुष असेही सांगतात. विशेषत: कोल्हाटी आणि डोंबारी या दोन समाजांमध्ये असणाऱ्या व्यवसायाच्या सारखेपणावरून डोंबाऱ्यांना कोल्हाटी किंवा कोल्हाट्यांना डोंबारी समजणाऱ्या लोकांची संख्या महा-

राष्ट्रात खूप आहे. परंतु या दोन समाजांचा कुठलाही अर्थाअर्थी संबंध नसून दोन्ही जमाती स्वतंत्र आणि वेगळ्या आहेत.

कसरतीवर पोट

महाराष्ट्रात सातारा, वडाळा, गुरव पिंपळ, कऱ्हाड, कारळे आणि मच्छिंद्रगड या ठिकाणी डोंबाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. अलिकडे काही वर्षांपासून या समाजातील काही लोक वरील ठिकाणी स्थायिक झालेले आहेत. मात्र त्यांनी त्यांचा पारंपरिक कसरत करण्याचा व्यवसाय आजही टिकवून ठेवलेला आहे. नव्हे, एका ठिकाणी स्थायिक असले तरी, गावोगावी भटकूनच हे लोक आजही उपजीविका करीत आहेत.

कसरतीचे प्रयोग करणे हेच डोंबारी समाजाच्या उपजीविकेचे प्रमुख साधन मानले गेले आहे. परंपरेने चालत आलेली ही कला, आजही या समाजाने टिकविली आहे. विशेषतः लहान-मुले आणि स्त्रिया हेच कसरतीच्या प्रयोगातील मुख्य आकर्षण समजले जाते. स्त्रीने तारेवर चालणे, केसाने मोठमोठे दगड उचलणे, बाटलीवर फळी ठेवून उभे राहणे, किंवा वेगवेगळ्या प्रकारच्या उड्या मारणे अशी कामे तरुण मुली करतात. त्यांच्या शरीराचा लवचिकपणा हेच या खेळातील मुख्य आकर्षण असते.

विशेषतः लहान मुलांना उंच हवेत फेकणे, तळहातावर उंच काठी उभी करून मुलाला त्या काठीवर तरंगत ठेवणे असे त्यांचे खेळ असतात. प्रेक्षकांची सहानुभूती मिळेल अशा प्रकारची कसरतीची कामे लहान मुलांच्याकडून करविली जातात. खेळात लहान मुले असतील तर अधिक कमाई होते असे एकाने सांगितले.

डोंबाऱ्यांचा खेळ मुख्यतः लहान मुलांच्यावर अवलंबून असल्याने मूल जन्माला आल्यानंतर दोन ते तीन महिन्यांनंतर लगेच त्या बाळाच्या अवयवांना लवचिकता आणण्याचे प्रयत्न केले जातात. लहान वयातच त्यांच्या शरीराची हवी तशी हालचाल करवून घेतल्याने चार पाच वर्षात ते मूल त्या खेळात अत्यंत तरबेज होते आणि या वयात आश्चर्यकारक शारीरिक कसरती करून दाखवते. त्यामुळे प्रेक्षकांची सहानुभूती त्या मुलाला मिळून खेळात कमाई बऱ्यापैकी होते.

जात पंचायतीचे वर्चस्व

इतर भटक्या विमुक्त समाजाप्रमाणे या समाजातही जात पंचायतीचा प्रभाव आजही प्रकर्षाने आढळून येतो. जात पंचायतीच्या प्रमुखाला पाटील या नावाने ओळखले जाते. प्रत्येक ठिकाणचा पाटील हा वेगळा असतो. स्थानिक पातळीवरचे सर्व समाजातील निर्णय तोच पाटील करतो, त्याला समाजात एक वेगळी प्रतिष्ठा आहे. समाजावर त्याचा दबदबा आहे.

विशेषतः समाजातील लग्न प्रसंगी, मौत प्रसंगी किंवा समाजांतर्गत भांडण प्रसंगी पाटलाला मान असतो. समाजातील भांडणतंटयाचा अंतिम निर्णय पाटील

करतो, त्याचा निर्णय समाज मान्य करतो असे सांगण्यात आले.

समाजातली स्त्री, त्याच समाजातील पुरुषाने पळवून नेणे हा या समाजात सर्वात मोठा सामाजिक गुन्हा समजला जातो. या गुन्ह्याची शिक्षाही तितकीच कडक दिली जाते. उदा. या समाजातील एखाद्या व्यक्तीने दुसऱ्याची पत्नी अथवा मुलगी पळवून नेली तर समाजात पंचायत बसविली जाते. समाजातील काही लोकांची नेमणूक त्याला शोधून आणण्यासाठी केली जाते. असे लोक गावोगावी भटकत त्याचा शोध घेतात. जर तो सापडला तर त्याला पंचायतीच्या ताब्यात दिले जाते. तेव्हा पंचायत त्याला खांबाला किंवा झाडाच्या बुंध्याला रस्सीने बांधते आणि सोटयाने बदडून काढते. जर तो गुन्हा कबूल झाला तर त्याला शोधण्यासाठी इतरांचा झालेला खर्च त्याने द्यावा लागतो आणि पंचायतीला दंड म्हणून एकवीस रुपये भरावे लागतात.

आणि जर एखादी व्यक्ती इतके करूनही गुन्हा कबूल झाली नाही तर चाकण येथील चेंक्र नावाच्या देवाला साकडं घातलं जातं, त्याला देवापुढे उभे केले जाते. देवळातील पुजारी डोंबाऱ्यांच्या परंपरेनुसार त्याला तांदूळ खायला देतो. जर ती व्यक्ती गुन्हेगार असेल तर तांदूळ खाल्ल्यानंतर त्या व्यक्तीच्या तोंडातून रक्त पडते अशी या समाजाची भावना आहे.

सामाजिक गुन्हेगार व्यक्तीस समाजातून बहिष्कृत करण्याची शिक्षा डोंबारी समाजात दिली जाते. अशा बहिष्कृत व्यक्तीशी अथवा त्याच्या कुटुंबाशी समाज कोणतेही संबंध ठेवीत नाही. जेवणाच्या पंगतीत त्यास घेतले जात नाही, त्याच्या लग्नकार्यात कोणी जात नाही, त्याच्या मौतीलाही कोणी जात नाही.

जर समाजातील एखादी स्त्री स्व-खुशीने एखाद्या व्यक्तीबरोबर पळून गेली तर तिला समाज वाळीत टाकतो. तिने गुन्हा कबूल करो अथवा न करो, समाज तिला पुन्हा सामावून घेत नाही.

बहुपत्नीत्वाची परंपरा

लग्न विधीब्राह्मण माणसानेच केला पाहिजे अशी या समाजात प्रथा आहे. पूर्वी पाच दिवस लग्नसोहळा चालत असे. पाच दिवस स्त्री-पुरुष हळद खेळून लग्न कार्यक्रम साजरा करीत असत. या समाजात लग्नाला सात ते आठ हजार रुपयांपर्यंत खर्च केला जातो. लग्नानंतर एखाद्याला पत्नी पसंत नसेल तर पंचायतीच्या परवानगीने मुलीला तिच्या वडिलांना परत दिले जाते. मात्र अशावेळी पंचायत नवऱ्याकडून चार हजार रुपये दंड वसूल करते, नंतरच मुलीचा स्वीकार करते.

लग्नाचे वैशिष्टय सांगताना या समाजातील एकाने सांगितले की, आमच्या समाजात सोडचिठ्ठी अथवा काडीमोड घेण्याची पद्धत नाही. मात्र पहिल्या पत्नीची परवानगी असेल तरच अनेक स्त्रियांशी विवाह करता येतात. अनेकपत्नी विवाहाची चाल पूर्वीपासून या समाजात रूढ आहे.

इतर भटक्या समाजांपेक्षा डोंबारी समाजात मौतीचे खास वेगळेपण सांगितले जाते. या समाजातील मृत्यू झाल्यानंतर हे लोक मृताला ताटीवर अथवा बांबूवर नेत नाहीत, तर नवीन कपडयात चेहरा उघडा न ठेवता पूर्ण गुंडाळून ते प्रेत चार लोक डोक्यावर घेऊन स्मशानात जातात. आणि चार फुटापेक्षाही अधिक खोल खड्डा खणून त्या खड्डयात प्रेताचे सरळ दफन करतात.

या समाजात मृताचा दहावा साजरा केला जात नाही. मात्र मृत व्यक्तीच्या नावाने बोकड कापून समाजाला जाहीरपणे जेवण दिले जाते असे पुण्यातील या समाजातील जात प्रमुख श्री. मोहन सुभाष्ना जाधव यांनी सांगितले.

पवार, यादव आणि जाधव ही आडनावे या समाजातील प्रमुख घराणी म्हणून मानली जातात. जाधव यांच्याकडे पिढ्यान् पिढ्या जात पंचायतीची पाटीलकी असते असे सांगण्यात आले.

अंधश्रद्धा

हा समाज अत्यंत धार्मिक वृत्तीचा आणि अंधश्रद्धाळू आहे. या समाजाचे 'कान्होबा' हे कुलदैवत असून कान्होबाच्या नावाने जत्रा नवस, उपास-तापास करण्याचे प्रकार केले जातात. आषाढ महिन्यात आषाढी बाई किंवा मरिआईचे नावानें मेंढ्या कापण्याची प्रथा या समाजात पूर्वीपासून रूढ आहे. आषाढी बाईला मेंढा कापला नाही तर देवी कोपते किंवा कुटुंबात बरेवाईट होते अशी भावना आहे. त्यामुळे दामदुपटीने कर्ज काढून का होईना हे लोक आषाढी साजरी करतात.

याशिवाय यांच्या प्रत्येक घरात साती आसरा असतात असा या समाजातील लोकांचा समज आहे. प्रत्येक घरासमोर साती आसरांच्या नावाने कापडी झेंडे लावण्याची प्रथा या समाजात आहे. वर्षातून एकदा साती आसरांच्या नावाने पाट किंवा बोकड कापले जातात आणि समाजास जेवण घातले जाते. असे केल्याने कुटुंबात इडापिडा येत नाही आणि सुख समाधान लाभते अशी भावना आहे.

जिम्नॅस्टिकसाठी निवड

महाराष्ट्रात या समाजाची लोकसंख्या ऐंशी हजारांचे जवळपास आहे. पुणे, बार्शी, अकलूज, नगर, सांगली, कोल्हापूर या भागात हे लोक मोठ्या प्रमाणात आहेत. पोटासाठी पिढ्यान्पिढ्या खेळ करीत भटकणे आणि खेळासाठी लहान मुलांचा मोठ्या प्रमाणात वापर करणे यामुळे शिक्षणापासून हा समाज दूर गेलेला आहे. मुलांना लहान वयातच कसरतीच्या प्रयोगाची आवड निर्माण केल्याने अर्थातच शाळेपेक्षा भटकंतीत त्यांना अधिक समाधान वाटते. शिक्षण नाही, कायमचं स्थैर्य नाही. त्यामुळे पिढ्यान्पिढ्या दारिद्र्य आणि अज्ञान हीच या समाजाची जमेची बाजू...पण अशाही अवस्थेत गाव पातळीवर वेडयावाकड्या उड्या मारून बघ्यांचं मनोरंजन करणाऱ्या डोंबाऱ्यांच्या लहान मुलांची निवड देश पातळीवर

जिम्नॅस्टिकसारख्या खेळासाठी झाल्याचे वाचून आपल्यालाही आश्चर्य वाटल्याशिवाय राहाणार नाही.

हडपसर येथील डोंबारी कुटुंबातील सुनील बाळू पवार आणि अरुणा चंदू जाधव या दोन लहान मुलांची निवड जिम्नॅस्टिकच्या प्रशिक्षणासाठी केंद्र सरकारने केल्याचे त्यांच्या आईने आणि आजोबाने मुलाखतीच्या वेळी सांगितले. हे सांगत असतानाचं त्या माऊलीच्या चेहऱ्यावरचं समाधान इथे शब्दांत लिहू शकत नाही.



१७. वाघ्यामुरळी

प्राचीन काळापासून चालत आलेली वाघ्यामुरळीची परंपरा महाराष्ट्रातील लोकांना परिचित आहे. अंधश्रद्धेपोटी देवाला मुली सोडण्याच्या किंवा देवाशी लग्न लावण्याच्या प्रथेतून वाघ्यामुरळीचा जन्म झाला. देवाला सोडलेल्या स्त्रीला मुरळी या नावाने ओळखले जाते. वाघ्यामुरळी हे प्रस्थापित समाजापेक्षा स्वतःला वेगळे समजतात. देवाची पूजाअर्चा करणे आणि समाजाचं मनोरंजन करून उपजीविका करणे हाच यांच्या आयुष्याचा मुख्य भाग समजला जातो, समाजाचे मनोरंजन करण्यासाठी विशिष्ट प्रकारचा नाचगाण्याचा कार्यक्रम हे लोक करतात, त्या त्यांच्या नाचगाण्याचा कलाप्रकारालाच काही लोक महाराष्ट्राची लोककला असे म्हणतात. परंतु या लोककलेच्या मुळाशी प्रचंड प्रमाणात अंधश्रद्धेचा भाग आहे हे तथाकथित कलावाद्यांच्या लक्षात येऊ नये हे या परंपरेचे दुर्दैव आहे असे वाटते. अशा प्रकारच्या या अंधश्रद्धेपोटी निर्माण झालेल्या विशिष्ट कलाप्रकारातूनच एका नव्या समाजाची निर्मिती झाल्याचे आढळून आले.

प्रस्थापित समाजजीवनापासून दूर जाऊन सतत स्वतःचे वेगळेपण जपण्याचा प्रयत्न केल्याने एक वेगळेपणाची भावना वाघ्या आणि मुरळ्यांच्या मनात रुजल्याने हे लोक स्वतःच्या समाजाची ओळख 'वाघ्यामुरळी समाज' या नावाने सांगू लागले आहेत. परंपरागत अंधश्रद्धेतून आणि उपजीविकेसाठी वापरल्या गेलेल्या कलाप्रकारातून या समाजाची, पर्यायाने जातीची निर्मिती झालेली आहे.

महाराष्ट्रातील नाथपंथी डवरी गोसावी किंवा गोंधळी या मूळ भटक्या जमातींशी या समाजाचे साम्य आढळते. नाथपंथी डवरी गोसाव्यांप्रमाणेच वाघ्यामुरळी स्वतःला नाथपंथी समजतात. गोसाव्यांप्रमाणे 'त्रिशूळ' आणि 'डावर' यांची पूजा करतात. मात्र दाढीकेस वाढवून आणि भगवी वस्त्रं नेसून देवाच्या नावाने दारोदार भिक्षा मागत नाहीत.

वाघ्यामुरळी लोक गोंधळी समाजाप्रमाणे 'संबळ' वाजवितात, गोंधळ घालतात, मात्र स्वतःला गोंधळी म्हणवून घेत नाहीत. स्वतःच्या समाजाचे किंवा जातीचे नाव, 'वाघ्यामुरळी' असेच सांगतात.

नाथपंथी डवरी गोसावी आणि गोंधळी या समाजाच्या रीतिरिवाजांचे मिश्रण असलेला हा समाज खंडोबाला आपले कुलदैवत समजतो. त्याच्या नावाने जागरण

गोंधळ घालून स्वतःची उपजीविका करतो. मात्र वरील दोन समाजांशी कसल्याही प्रकारे रोटीबेटी व्यवहार करीत नाही असे या समाजातील श्री. हरिभाऊ शिंदे आणि मारुती जिमुजी भोसले यांनी सांगितले.

वाघ्यामुरळी या समाजाचे मूळ स्थान सातारा जिल्ह्यात म्हसवड येथे सांगितले जाते. म्हसवडचे गावपुजारी किंवा नाथपुजारी म्हणून यांना ओळखले जाते. म्हसवडची गावकी याच समाजाला पिढ्यान् पिढ्या आजही मिळते. त्यांना गावात अत्यंत महत्त्वाचे स्थान असून नाथाच्या पालखीचा मान यांना दिला जातो. वर्षातून एकदा कार्तिकी महिन्यात भरणाऱ्या नाथाच्या जत्रेत छबिन्याच्या पूजेचा मान याच समाजातील लोकांना दिला जातो. त्यामुळे गावकी पूजेचे मानाचे गोंधळी या नावानेही त्यांना ओळखतात.

विशेषतः जत्रेच्या दिवशी, देवाच्या पालखीच्यापुढे उवर आणि संबळ वाजवून हे लोक आरती करतात. त्या रात्री घरोघर फिरतात तेव्हा पथरावर (नाथाचे जेवणाचे भांडे) लोक गुलाल आणि नैवेद्य ठेवतात हीच त्यांची मिळकत.

या समाजात त्रिशूळ, उवर आणि पथर हे अत्यंत पवित्र मानले जाते. या वस्तूंची पूजा केल्याशिवाय पाण्याचा थेंबही तोंडात घ्यायचा नाही अशी यांची प्रथा आहे.

हे लोक देवाच्या नावाने गाणी म्हणतात, आणि गोंधळाचा कार्यक्रम करतात. कार्यक्रमाच्या वेळी संबळ, तुणतुणे, उवर, पथर, त्रिशूळ, ओळी, घाटी, धिमडी, कोटमा, लंगर आणि घोंगडी हे साहित्य आणि वाद्ये ते वापरतात. खंडोबाचे प्रतीक म्हणून कार्यक्रमात पिवळ्या रंगाचा झेंडा लावण्याची या समाजात प्रथा आहे.

वाघ्या-मुरळी या समाजात काही पोटभेद सांगण्यात आले त्यांची नावे अशी- संन्यासी (सन्यास वाघ्या), गृहस्थी (घरवाघ्या), हावशा, नवशा आणि गवशा, इ. वरील पोटभेदांविषयी माहिती सांगताना मारुती भोसले याने सांगितले, देवाला सोडलेला परंतु आयुष्यभर अविवाहित राहून जागरण गोंधळ करणारा तो संन्याशी, तर प्रपंच करून वाघ्या म्हणून जगणारा तो गृहस्थी किंवा घरवाघ्या, आणि नवसाने सोडलेले त्याला नवशा तर हौसेपोटी झालेला वाघ्या तो 'हावशा' अशी नावे आहेत. याशिवाय, वाघ्या–मुरळीच्या अनैतिक संबंधातून जन्मलेला तो 'गवशा' म्हणून ओळखला जातो.

विशेष म्हणजे, हे सर्व भेद वाघ्या–मुरळी पंथातील असले तरी, हावशा नवशाशी किंवा नवशा गवशाशी सोईरसंबंध ठेवीत नाही. संन्यासी तर या सर्वांच्यापेक्षा स्वतःला वेगळा समजूनच जगत असतो.

वाघ्या मुरळीची प्रथा मुळातच अंधश्रद्धेतून निर्माण झाल्याने या समाजात नवसाचं प्रस्थ खूप आहे. घरात मूलबाळ नसेल, लग्न जमत नसेल किंवा कुटुंबात सुख–शांती नसेल तर देवाला नवस केला जातो, आणि जर योगायोगाने घरात मुलगा जन्माला आला तर तो नवसाचा मुलगा म्हणून देवाला वाहिला जातो.

त्याच्या वजनाचं भंडारा–खोबरं घेऊन खोबऱ्यासहित मंदिराच्या शिखरावर त्याला झेलायचं, त्याला भंडारा लावायचा, हळद कुंकू लावून त्याचा देवाशी लग्न लावायचं अशाच प्रकारे मुलीच्या बाबतीतही विधी केला जातो.

हा समाज प्रामुख्याने महाराष्ट्रातील चाकण, खेड, घोडनदी, शिखरापूर, बेलापूर, नाशिक, कोपरगाव आणि म्हसवड या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आढळतो. पूर्वी लग्नप्रसंगी मुलाने मुलीला हुंडा देण्याची पद्धत रूढ होती, परंतु गेल्या काही वर्षापासून मुलीने मुलाला हुंडा देण्याची पद्धत रूढ झाली आहे.

या समाजात अनेकपत्नीत्वाची चाल रूढ आहे. वेगवेगळ्या जाती जमातीतील वाघ्यामुरळी भाऊबंद म्हणून राहू शकतात आणि वेगळे संबंधही ठेवू शकतात. वाघ्या मुरळी ज्या मूळ जाती जमातीतून येतात त्या जाती जमातींचा विचार न करता, देवाला सोडलेले किंवा देवाशी लग्न लावलेले सर्व वाघे मुरळी एकत्र येतात, यातूनच हा समाज निर्माण झाल्याचे एकाने सांगितले.

हे लोक एकएकट्याने रहात किंवा भटकत नाहीत, गटागटाने राहातात व भटकतात, त्याला ते 'ताफा' असे म्हणतात. विशिष्ट कार्यक्रमासाठी किंवा जाग्रणासाठी एकत्र आलेल्या लोकांचा समूह म्हणजे सुद्धा 'ताफा'. या नावानेच ओळखला जातो. या ताफ्यात ४ ते ११ पर्यंत वाघे आणि मुरळ्या असतात. जाग्रणाचं निमंत्रण आलं की सर्व ताफा जाग्रणाला जातो. त्यावेळी विशिष्ट प्रकारचा विधी केला जातो. देवपूजेचे साहित्य, पान, सुपारी, लिंबू, शेण आणि पाणी घेऊन जातात. जिथे जाग्रणाचा कार्यक्रम करायचा ती जागा शेणाने सारवायची, भंडाऱ्याची रांगोळी काढायची, देवाचं देऊळ रांगोळीने तयार करायचं, पाच छोटे दगड (खडे) घेऊन ते गोमूत्राने धुवायचे आणि कापूर लावून त्याची आरती करायची. त्या बरोबरच 'कोटमा' (भंडाऱ्याचं भांडं) घ्यायचचं त्याची आरती म्हणायची 'देवाचा वाघ्या झाला, हाती घोळ कोटमा दिला, भुकत गर्जत देव भक्ताघरी आला' वगैरे.

आरती झाल्यावर मुख्य कार्यक्रमाच्या वेळी सदानंदाचा येळकोट करून गव्हातांदळानं चौक भरून घ्यायचा, सारी तयारी करायची आणि मगच जाग्रणाला सुरवात करायची. या कार्यक्रमात प्रथम देवाचं नमन, गणगौळण, नंतर भाव बतावणी फार्स झाल्यावर खंडोबाची महती सांगणारी पारंपरिक कथा सांगितली जाते. अधून मधून देवाची गाणी गायली जातात आणि शेवटी पहाटेच्या वेळेला लंगर (लोखंडी कडचाची साखळी) तोडण्याचा कार्यक्रम होतो, आणि जाग्रणाचा कार्यक्रम संपतो.

अशाप्रकारे देवाच्या नावाने जाग्रण गोंधळ घालणारा आणि लोकांचं मनोरंजन करून त्यातून मिळणाऱ्या पैपैशावर उपजीविका करणारा वाघ्या मुरळी हा समाज कलावंत म्हणून ओळखला जात असला तरी अंधश्रद्धेचा बळी आहे हे नाकारून चालणार नाही. त्यांच्यातल्या अंधश्रद्धेला मूठमाती देऊन त्यांच्यातला कलावंत जिवंत ठेवला पाहिजे.

१८. मरीआईवाला

कडूसं पडून गेलेलं. बोडक्या माळावर चार पालं पडलेली. पालांच्या बाहेर तीन दगडांच्या चुलीसमोर बाया—बापड्या धुरात मिसळून गेलेल्या. चार—पाच उघडी नागडी पोरं कारवानी कुत्र्याच्या पिल्लांबरोबर मस्ती करण्यात रंगलेली. मी तिथेच अंकुश भैरूच्या पालासमोर उघड्यावर बसलेलो. आजूबाजूच्या पालांतली माणसं पालाच्या बाहेर येऊन माझ्यावर नजरा रोखून उभी राहिलेली. मी पोलिसचा आदमी आहे हा त्यांचा पक्का समज झालेला. सांकेतिक भाषेत ते आपापसात कुजबुजतात. अंकुश भैरूनं जमातीची माहिती देऊ नये म्हणून ते खेकसतात. तो गांगरून गेलेला.

रात्रीचे आठ वाजलेले. मी तिथेच बसलेला. अंकुश भैरूला जीव तोडून मी सांगत असतो मी पोलिसचा आदमी नाही, समाजाचं काम करणारा माणूस आहे. तो विश्वास ठेवायला तयार नसतोच. शेवटी मी प्रसिद्ध केलेल्या लेखांची कात्रणं त्याच्या पुढ्यात ठेवतो, तेव्हा मिणमिणत्या चिमणीच्या उजेडात तो लेखातली चित्रं न्याहाळतो आणि ओळखतो– ह्यो गोसावी, ह्यो मदारी, ह्यो गारुडी, ह्यो ढवळा नंदीवाला, ह्यो मेढंग्या...तो बडबडत रहातो. शेजारच्या पालातली माणसं भराभरा येऊन पेपरातली चित्रं न्याहाळू लागतात. त्यांच्या चेहऱ्यावर माझी ओळख पटल्याच्या खुणा उमटतात. अंकुश भैरू बोलायला लागतो...

आषाढ महिना उजाडला का मरिआईचं वारं अंगात घुमायला लागतं, रातन् ध्या आंग भरमायला लागतं. मंग डुईवर मरिआयचा गाडा घ्यायचा, कमरेला आभ्रान गुंडाळायचं, कपाळला मळवट भरायचा, हातात आसूड घ्यायचा, गळ्यात ढोलकं आडकवायाचं आन् आनवानी पायान् दारोदार मरीआईचा गाडा फिरवत राहयचं. ह्योच वाडवलापास्नं चालत आलेला येवसाय हाय बाप्पा!

दृष्टांतावर विश्वास

अंकुश भैरू सांगत असतो. मी पुन्हा पुन्हा प्रश्न विचारतो, 'दारोदार भटकणं केव्हा थांबणार?...' त्यावर तो मिश्किल हसतो. आणि पुन्हा गंभीर होऊन सांगू लागतो. 'बापा, सरकार जमीन देत व्हूता, घर देत व्हूता, पर नाय घेता आलं. दादा, देवी स्वप्नात आली आन् हुकुम केला- भक्ता, मला एक जागी ठिव नगंस, शेत-जमीन

करू नगंस, माझ्याबर फिरत रहा, धा पिढ्या सुखी व्हत्याल... देवीचा हुकूम कसा मुडू दादा?

'तीन दिसाच्यावर एका जागी न्हायचा हुकूम नाय. आज हितं दिसल् तर उद्या कुठं आसंल सांगता येत नाय...दिसाकाठी रोज डाव दंड दाभनानं चिरायचा, उजवा आसूडानं फोडायचा, दंडातलं रगात दिवीला पाजायचं तवा मरिआयचा आत्मा शांत व्हतू. माझ्या राजा, दिवीचा आत्मा शांत म्हंजी आमचाबी आत्मा शांत. दिवीला रक्ताची भूक आस्ती, रगात दिला न्हाई तर दिवी राती झूपू देत न्हायी, दिसा खावू देत नाई, रातून ध्या आंग भरमत ठेवती, म्हूण हचो भटकी फेरा वर्सानुवर्स चालू ठिवायचा माझ्या वापा...

मरीमातेच्या हुकमाचा पक्का तावेदार आणि अंधश्रद्धेच्या कड्यावरून स्वतःच्या आयुष्याचा कडेलोट करून घेतलेला अंकुश भैरू मरीआईवाला त्याच्या जमातीची कर्मकहाणी सांगत असतो. सामाजिक सुधारणेवर बदलत्या जगावर त्याचा विश्वास नसतो. मरीआई, तिचा गाडा, ढोलकं, आभ्रान, देवीचा आसूड हीच त्याच्या जगण्याची मुख्य साधनं. आज इथं तर उद्या तिथं हाच त्याच्या आयुष्यातला मोठ्ठा बदल!

पावसाळा संपला की गावोगावी भटकणारा मरीआईवाला महाराष्ट्राला तसा चांगला परिचित आहे. त्याला कडक लक्ष्मीवाला किंवा मरीमातेचा भगत म्हणून लोक ओळखतात. ग्रामीण भागातील स्त्रियांचा हा विश्वासाचा देवऋषी म्हणून ओळखला जातो. भूतबाधा, घरातली भांडणं, चेटूक, मुलाचं आजारपण, नोकरीधंदा आणि घरात पाळणा हलावा यासाठी मरिआईवाल्याच्या मरिमातेला कौल लावून मनाचं भाबडं समाधान करून घेणाऱ्या अडाणी बायांचा गराडा नेहमीच त्याच्याभोवती असतो. ऐहिक सुखाच्या साऱ्या अडीअडचणींवर उतारा देणारा म्हणून मरीआईवाला सर्वांना परिचित आहे.

मूळची कोळी जमात

फार पूर्वीच्या काळी मरीआईवाले कोळी या जमातीचे असल्याचे अंकुश भैरू सांगतो. त्या काळी कोळ्यांच्या राजाला मूलबाळ होत नव्हतं, म्हणून त्याने मरीआईला नवस केला, 'माझ्यापोटी मुलगा दे मी तुला वाहीन.' मरीआई नवसाला पावते, राजाला मुलगा होतो, त्याला मरीआईला सोडलं जातं. त्याचा विस्तार पुढे वाढत जातो आणि 'मरीआईवाले' नावाची जमात निर्माण होते, असं भैरू अंकुशचं म्हणणं!

तसं पाहिलं तर मरीआईवाला तेलगू भाषिक. मूळचा आंध्र प्रदेशातला. भटका, मागासवर्गीय. पोट भरण्याच्या निमित्ताने मरीआईचा गाडा डोक्यावर घेऊन महाराष्ट्रात भटकत आलेला. 'मादगी' किंवा 'मादगुडू' म्हणून आंध्रात ओळखला जाणारा, पण आता तो महाराष्ट्राच्या मातीशी एकरूप झालेला, मराठी

जाणणारा, बोलणारा. त्याला मागास, अस्पृश्य जातीची आता लाज वाटतेय. ओळख विचारली तर भीत भीत 'आमी मराठी हाय' असंही तो सांगतोय. इंदापूर तालुक्यात वडापुरी येथे यांची मोठी वस्ती आहे. वडापुरी हे मरीआईचं मुख्य ठाणं म्हणून सांगण्यात येतं.

यांची वस्ती वडापुरीला असली तरी भटकंती मात्र महाराष्ट्रभर चालू असते. प्रत्येकाने आपल्या सोईनुसार गावं विभागून घेतलेली. ज्यानं त्यानं आपापल्या गावात मागायचं, पोट भरायचं. आपला गाव सोडून दुसऱ्याच्या हद्दीत शिरायचं नाही. आणि चुकून एखादा शिरला तर त्याची रवानगी जातीवाहेर. त्यानं जातीत ऊठ-बस करायची नाही, सोयरसंबंध ठेवायचा नाही, कुणाच्या लग्नकार्याला अथवा मैतीला जायचं नाही, ही शिक्षा.

एकाच कुळात सोयरिक नाही

जाधव, पवार, चव्हाण, गायकवाड, फुलमाळी आणि निंबाळकर या आडनावाच्या यांच्या प्रमुख कुळी. या कुळात आपापसात लग्न ठरतं, सोयरीक होते. कुळातले सारे भाऊ–बहीण मानले जातात.

मरीआईवाल्यांच्यात आषाढी लग्न महत्त्वाचं मानलं जातं. आषाढ महिना म्हणजे लग्नसराई. लग्नापूर्वी मरीआईची जत्रा केली जाते. आषाढी पौर्णिमा झाल्यावर तीन दिवसांनी लग्नतिथी धरली जाते. लग्न ब्राह्मण लावतो.

या समाजात पुनर्विवाहाची प्रथा नाही. बाईचा नवरा मेला तर, त्याच्या नावाने रांडाव म्हणून आयुष्य काढायचं. मात्र पुरुषाच्या बाबतीत हा नियम नाही. बायको मेली की तो दुसरं लग्न करायला तयार असतो. पंचायतीत जाबजबाब होतात, बाईची पसंती विचारात घेतली जात नाही. घरच्यांनी पंचांना वचन द्यायचं, मुलीनं मुलाला एक हजार रुपये हुंडा द्यायचा आणि सुपारी फोडून मरीआईची जत्रा करायची, कोंबडं–बकरं कापायचं आणि जातीला जेवण घालायचं हा रिवाज.

लग्नानंतर नवरा–बायकोचं पटलं नाही, किंवा नकोशी बायको झाली तर वाद पंचायतीत न्यायचा, बायकोची सोडचिठ्ठी जाहीर करायची, हुंडा म्हणून घेतलेले हजार रुपये पंचासमक्ष बायकोला परत करायचे आणि तिला कायमचं सोडायचं ही जातरीत त्यांची चालू आहे.

शिक्षांची ठरलेली रक्कम

इतर भटक्या समाजाप्रमाणे याही समाजात पंचायत आहे. प्रमुखास साहेबराव म्हटलं जातं. साहेबरावाचा शब्द जातीत अत्यंत मोलाचा आणि अंतिम मानला जातो. जातीत शिवीगाळी करणं, चोरीमारी करणं किंवा एखाद्यावर कुऱ्हाड उचलणं गंभीर गुन्हा समजला जातो. शिवी दिली तर ६० रुपये दंड, कुऱ्हाड उचलली तर ५०० रुपये दंड, आणि चोरी केली तर १ हजार ५० रु. दंड अशा शिक्षा पंच-

प्रमुख देतो.

ही माणसं मृताचं दहन करीत नाहीत, त्याला माती देतात. त्याचं कारण विचारलं असता एकानं सांगितलं-देवी मैताला जाळू देत नाही. जाळल्यावर प्रेताची राख होते, आणि राख ही तर मरीआईचा पवित्र अंगार मानली जाते. म्हणून प्रेत जाळून त्याची राख करायची नाही, त्याला माती द्यायची.

मैतीचा दहावा मोठा खर्चिक मानला जातो. दहाव्या दिवशी बकरं कापलं जातं, शेजाऱ्यांना आणि जातीतल्यांना पोटभर दारू पाजली जाते आणि मृताच्या नावाने जेवण दिलं जातं.

वडापुरी हे मरीआईवाल्यांचं तीर्थक्षेत्र मानलं जातं. दर तीन वर्षातून एकदा वडापुरीला मरीआईची जत्रा भरते. गावोगाव भटकणारे सारे मरीआईवाले त्या दिवशी वडापुरीला जमतात, कोबडं बकरं कापतात, देवीला रक्तानं आंघोळ घालतात, त्यावेळी नवस फेडले जातात, पंचप्रमुखांच्या बैठका होतात गुन्हेगारांचे गुन्हे शाबीत होतात, लग्नकार्ये जमवली जातात. आषाढापासून दसऱ्यापर्यंत ही जत्रा चालू राहते. नवरात्रात देवीची स्थापना केली जाते. नऊ दिवस देवीला बाहेर न्यायची नसते. तिला तेल, कुंकू, अंडं, साखर, गूळ, कोंबडा, बकरा, पेढा आणि नारळाचा नैवेद्य दाखवावा लागतो. उदबत्ती, कापूर आणि फुलांची माळ एवढं देणं त्या दिवसात द्यावं लागतं. हे सारं देवीची इच्छा म्हणून करावं लागतं असं त्यांचं म्हणणं आहे.

पोतराज आणि मरिआईवाला


मरीआईची इच्छा म्हणून आयुष्यभर घरोघर भटकणारा मरीआईवाला आणि लक्ष्मीआईचा भगत म्हणवून घेणारा पोतराज या दोघांच्या आम्नातलं साम्य सोडलं तर दोघांच्या दोन निराळ्या जगण्याच्या वाटा सहज लक्षात येतात. पोतराज अंगात शर्ट, कमरेला आम्नान, पायात चाळ, कपाळाला मळवट, गळचात हिरव्या बांगड्या आणि हातात हलगी घेऊन लक्ष्मीआईच्या ओव्या म्हणत एकटाच नाचतो, तर मरीआईवाला उघड्या अंगानं कमरेला आम्नान गुंडाळून, अनवाण्या पायानं ढोलाच्या तालावर नाचतो, आसुडाचे फटके अंगावर ओढतो आणि मरीआईचा खेळ करून दाखवतो. दोघेही आईचे आंधळे भक्त, आयुष्याच्या वाटा ठेचाळत जाणारे!

बोलता बोलता सहज पोतराजाचा विषय निघाला तेव्हा अंकुश भैरू गंभीर झाला, आणि म्हणाला 'तुमी लिवनार' वाचनारं मोठं सायब!' तुमास्नी दिवीचं सत्पन सांगतो. जवा तुमच्या पुन्यामंदी पोतराज बंद केलं–डोईचं जावळ काढलं तवा देवीचा गाडा थांबला आन् म्हमईच्या महालका आयच्या देवळाचा दरवाजा आपसुक बंद झाला! आता बोला!...

मी काहीच बोललो नाही, त्याच्या बोलण्यातला भाबडेपणा माझ्या लक्षात

आलेला होता. मरीआईचा किती प्रचंड पगडा त्याच्यावर आहे हे जाणून मी त्याला विचारलं– गावोगाव अशा अवतारात भटकण्यापेक्षा, एका ठिकाणी राहून, काम धंदा करून इज्जतीनं जगावंसं नाय वाटत का? त्यावर त्यांच्यापैकी एकजण म्हणाला–देवीचा गाडा सोडून कामधंदा केला तर अंगाला फोड येत्यात, ढाळवांत्या व्हत्यात, कामधंदा दिवीला खपत नाही.'

मरीआईच्या भरवश्यावर तिच्या इच्छेने स्वतःचं उभं आयुष्य झोकून देणारा, कामधंदा, शेतीवाडी, घरदार आणि शिक्षण नाकारणारा अंकुश भैरू आणि त्याचे जातभाई आणखी किती काळ मरीआईचा गाडा डोक्यावर घेऊन दाहीदिशा वण-वण भटकणार आहेत? त्यांना या अंधश्रद्धेतून कोण आणि कसं बाहेर काढणार? या प्रश्नाचं काहूर डोक्यात घेऊन मी त्यांचा निरोप घेतला, तेव्हा अंकुश भैरूने मला हळूच विचारलं, आमची माहिती घेऊन काय करणार आहेस साहेबा? त्यावर मी म्हटलं, तुझी माहिती पेपरात छापणार आहे, तुझं उपेक्षित आयुष्य एकविसाव्या शतकाकडे निघालेल्या माणसांच्या वेशीवर टांगणार आहे. तेव्हा तो काकुळतीला येऊन म्हणाला, 'साहेबा आसलं आकरीत करू नगंस, दिवीला हचे खपायचं न्हाय, ढाळ–वान्त्या व्हत्याल!'



१९. मदारी

रूढी व अंधश्रद्धेत गुंतलेला मदारी

सापांचा खेळ करणारा सापवाला किंवा जादूचे प्रयोग करणारा बंगालीबाबू अशा विविध नावांनी, 'मदारी' समाज महाराष्ट्रात परिचित आहे. नजरबंदीचा खेळ करणारा, हातचलाखी करून भल्याभल्यांना भुरळ पाडून चकवणारा हा भटका जादूगार स्वतःच्या परंपरागत कलेवर जितके प्रेम करतो, निष्ठा ठेवतो, तितक्याच प्रेमाने आणि निष्ठेने खेळ पाहणाऱ्या प्रेक्षकांना तास दोन तासांची मनपसंत करमणूक सुद्धा देऊ शकतो.

मातीचे पैसे करणे, रिकाम्या पोतडीतून कबुतरे बाहेर काढणे, जिवंत मुलाचे डोळ्यादेखत तुकडे करणे, प्रेताला दहा वारा फूट हवेत अधांतरी तरंगत ठेवणे किंवा एखाद्या माणसाला संवेदनाहीन करण्याचा आभास निर्माण करणे असे कितीतरी छोटे मोठे जादूचे प्रयोग मदारी करून दाखवीत असतो, आणि प्रामाणिकपणे 'साब ये जादू नहीं, हातचलाखी है' असे सांगून खेळ पाहाणाऱ्यांना क्षणात आश्चर्यचकित करतो.

भटकन्ती

हे सारं तो पालातल्या चिमुकल्या जिवांसाठी आणि स्वतःच्या पोटासाठी करीत असतो, कारण जीवन हीच त्याच्या दृष्टीने फार मोठी हातचलाखी असते, आज आहे तर उद्या नाही !

मदारी हा मुस्लिमधर्मीय समाज. महाराष्ट्रात अनेक वर्षांपासून, पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या जादूच्या खेळावर तो आपली उपजीविका करतो. पोटासाठी सतत भटकंती हा त्याच्या आयुष्यातला प्रमुख भाग आहे. रहदारीच्या रस्त्यावर नाहीतर, गावोगावच्या आठवड्याच्या बाजारात मदारी हा निश्चित आढळणारा जादूगार. तिथंच वेळ मिळेल तसा अल्लाचा नमाज पडणारा, रोजा पाळणारा, ईद मानणारा आणि सणासुदीला कुराण पठण करणारा हा समाज, नमाजासाठी कायमची मशीद नाही म्हणून न थांबता, चालतच गुडघे टेकून अल्लाचे स्मरण करीत, 'जो देगा उसका भला, जो ना देगा उसका भी भला' अशा भावनेने जगतो.

साप हेच ज्याच्या उपजीविकेचे साधन आहे. किंबहुना, ज्याच्यावर त्याचे

जगणे-मरणे अवलंबून आहे अशा विषारी नागराजाला कुटुंबातला एक घटक समजून पोटच्या पोरासारखे मदारी त्याचे पालन पोषण करतो. एवढेच नव्हे तर मदाऱ्यांची छोटी छोटी अजाण पोरं अशा नागराजाबरोबर रात्रंदिवस खेळत असतात. साप हा त्या लहानग्यांच्या खेळातले खेळणेही असतो आणि जीवनसाथीही असतो.

साप पाळून आणि त्याचा खेळ करून त्यावर उपजीविका करणारे मदाऱ्यांच्या शिवाय इतरही काही लोक महाराष्ट्रात आहेत. त्यांना 'गारुडी' या नावाने ओळखतात. परंतु गारूडी आणि मदारी या समाजांत तसा कसलाही संबंध नसतो. त्यांच्यात रोटी बेटी व्यवहार होत नाहीत.

मदारी समाजात अनेक पोटजाती आहेत. त्यांना ते पोट कुळेही म्हणतात. उदा. पोंडरियाके, तेजल्यानके, त्येत्याके, बिबियानके, धामनके, पाडवाके, पुनसीके, बस्तियानके, झालवालके, आस्मानपुरीके, कलुशाके अशा नावाने ओळखल्या जाणाऱ्या ३०-३१ कुळी किंवा पोटजाती आहेत. करमाळा, खानदेश, बाळेघाट, खर्डा या ठिकाणी हे लोक मोठ्या प्रमाणात आढळतात. वरील सर्व पोटकुळांत रोटी बेटी व्यवहार केले जातात.

मदारी हा मुस्लिम धर्मीय समाज असला तरी, वरील सर्व पोटजातीत किंवा पोटकुळांत 'पंजे' बसविण्याची प्रथा फारशी आढळत नाही. करमाळा आणि खर्डा या ठिकाणचे मदारी 'पंजे' बसवितात. त्यांच्यात आपापसात एकाच कुळात बेटी व्यवहार होत नाही.

मदारी समाजाची मूळ भाषा किंवा मातृभाषा 'मसिदी' किंवा 'मादरी' या नावाने ओळखली जाते. ती मराठी, हिंदी, उर्दू, गुजराथी या चार भाषांची मिश्रभाषा आहे. या भाषेत गुजराथी भाषेचे अनेक शब्द पाहावयास मिळतात. नव्हे, गुजराथी भाषेचा प्रभाव 'मादरी' भाषेवर आढळतो. हे लोक कुटुंबात मुख्यतः मादरी किंवा मसिदी भाषा बोलत असले तरी, जादूचे खेळ करताना ते प्रामुख्याने हिंदी भाषेचा वापर करतात.

जात पंचायतीचे वर्चस्व

इतर भटक्या जाती-जमातींप्रमाणे मदारी समाजातही जात पंचयतीचा प्रभाव आजही जाणवतो. जात पंचायत ही जातीचे हित पाहाणारी, जातभाईंना न्याय देणारी, किंवा समाजहिताचे रक्षण करणारी समाजसंस्था म्हणून मानली गेली आहे. लग्नकार्ये, मैत किंवा समाजविधीच्या वेळी जात पंचायतीला अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. पंचाच्या उपस्थितीशिवाय या समाजातील कसलेही कार्य पार पाडले जात नाही. विवाह संबंधात तर पंचायत मुख्य साक्षीदार किंवा न्यायदेवता म्हणून काम पाहात असते.

जात पंचायतीच्या प्रमुखास 'चौधरी' या नावाने ओळखले जाते. मुख्य चौधरीशिवाय, त्यांना सहाय्य करणारे पाच लोक असतात. त्यांना पंचायतीचे

प्रमुख पंच म्हणून ओळखले जाते. जातीतील अंतर्गत झगडचाचा किंवा लग्नकार्याचा योग्य न्यायनिवाडा करण्याची त्यांची जबाबदारी असते. समाजात त्यांना मान असतो.

'मदारी' समाजात 'हुक्का' अत्यंत पवित्र मानला जातो. विशेषतः लग्न जमविताना हुक्क्याला प्रथम स्थान दिले जाते. हुक्का म्हणजे पिराचा मान समजला जातो. एखाद्या मुलाचा विवाह ठरवायचा असेल तर, मुलाचे वडील पंचाच्या बरोबर हुक्का घेऊन मुलीच्या घरी येतात आणि मगच प्राथमिक बोलणी होतात, त्याला ते 'मंगनी' असे म्हणतात.

अशा प्रथम मंगनीच्या वेळी, जर मुलीच्या वडिलांना मुलगा पसंत नसेल किंवा अशी मागणी रद्द करावयाची असेल तर मुलीचे वडील हुक्क्याचा मान म्हणून २० रुपये पंचांना देतात आणि बोलणी थांबवतात.

लग्नवेळी दोनदा हुक्क्याचा मान असतो, एकदा मागणी करतेवेळी आणि दुसरे लग्न ठरवितेवेळी हुक्का आवश्यक मानला जातो. हुक्क्याशिवाय लग्न जुळतही नाही आणि मोडलेही जात नाही.

हुंडा नाही, तलाक नाही

या समाजात विवाहप्रसंगी हुंडा दिला जात नाही. मात्र मुलीचे वडील आपल्या ऐपतीप्रमाणे मुलीला कपडे, भांडी अथवा प्रपंचाला उपयोगी अशा अन्य वस्तू भेट म्हणून देतात. विवाह मुसलमान धर्माच्या रिवाजाप्रमाणे होतो. या धर्माचे प्रमुख किंवा धर्मगरू मौलवी किंवा काजी मंडळी समाजातील विवाह लावतात. नंतर ते रजिस्टर केले जातात. विवाहविधीनंतर नेहमीच्या पद्धतीप्रमाणे डाल–रोटी किंवा बिर्याणी असा खाना ऐपतीप्रमाणे पाहुण्यांना दिला जातो.

पुण्यातील रामटेकडी येथे राहणाऱ्या उमर इस्माईल मदारी व फत्तू अमिर मदारी यांच्याशी बोलत असताना त्यांनी मदारी समाजाचे वैशिष्टय म्हणून सांगितले की, आम्ही मुसलमान धर्मीय असलो तरी या धर्मातील 'तलाक' पद्धत मानत नाही. आमच्या समाजात तलाक दिला जात नाही. आत्तापर्यंत कोणत्याही विवाहित स्त्रीला आमच्यात तलाक दिलेला नाही. जर आमच्या समाजातील एखाद्या व्यक्तीने पत्नीला तलाक देण्याचा प्रयत्न केला तर अशा व्यक्तीस समाजातून बहिष्कृत करण्याच्या शिक्षेची तरतूद जातपंचायतीमध्ये करण्यात आलेली आहे. समाजबहिष्काराच्या भीतीने कोणीही तलाक देत नाही.

या समाजात मूल जन्माला आल्यानंतर अशा अर्भकाला 'मदारी' म्हणून समाजात घेण्याचा किंवा स्वीकारण्याचा एक वैशिष्टचपूर्ण धार्मिक विधी केला जातो. त्याला जातीत मिसळणे असे म्हणतात. तत्पूर्वी मुलाच्या जन्माचे वेळी त्याचे आई-वडील, 'अल्लाहो अकबर' असे तीन वेळा अजान देतात, मग त्या मुलाचा जन्म पाळात होवो अथवा दवाखान्यात होवो, अल्लाच्या नावाने अजान देण्याची पद्धत या समाजात पूर्वीपासून रूढ आहे.

अशा प्रकारे अजान झाल्यावर जात पंचायतीच्या पंचांना बोलावून तांदुळाचे दाणे, दोनचार पैसे आणि हिरवे गवत पिराच्या नावाने एकत्रित केले जाते, त्याला 'कुंडा' काढणे असे म्हणतात. याचाच अर्थ असा की, पंचांच्या साक्षीने त्या लहान अर्भकास 'मदारी' म्हणून समाजाने स्वीकारले. अशा वेळी मुलाचे आईवडील कमीत कमी दोन रुपये आणि जास्तीत जास्त हजार रुपयापर्यंत पंचायतीला देणगी देतात.

खर्चिक प्रथा

मदारी समाजातील ज्या काही विविध सामाजिक रूढी किंवा प्रथा आहेत त्या खर्चिक अशा आहेत. आपली ऐपत नसताना सुद्धा बाळाचे जावळ काढण्याचे दिवशी पंचासमक्ष दोन बकरे आणून कापायचे आणि समाजाला जेवण द्यायचे, अन्यथा बकऱ्या शिवाय मुलाचे जावळ काढले जात नाही. अशा खर्चिक प्रथा दारिद्र्याने ग्रासलेल्या मदारी समाजात अधिक दारिद्र्य निर्माण करतात, अशी खंत या समाजातील एका व्यक्तीने बोलून दाखविली.

मदारी हा मुस्लिम धर्मीय समाज असल्याने मृताचे दफन करण्याची पद्धत आहे. ३०० ते ३५० रुपयापर्यंत मैतीचा खर्च केला जातो. ज्या ठिकाणी मृताचे दफन केले तिथे शक्य असल्यास कबर बांधतात अथवा त्या ठिकाणी शेंगदाणे, चणे, चुरमुरे, अबिर आणि पान ठेवून मौलवीच्या हस्ते ते सर्वांना वाटतात.

व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिसरे दिवशी जिआरत, दहाव्या दिवशी कुरानखानी (फातिया), चाळीसाव्या दिवशी चाळीसावा, सहा महिन्यानंतर चेलम आणि एक वर्षानंतर 'बरसी' पाळण्याचा रिवाज आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून पोटासाठी सतत भटकणारा हा समाज अंधश्रद्धा आणि जटील रूढी परंपरेतून मुक्त झालेला नाही. उपासतापास करणे, पिराच्या नावाने नवस करणे, गंडेदोरे बांधणे, अल्लाच्या नावाने बकरे, कोंबडे कापणे हे अनेक वर्षापासून चालू आहे. सतत भटकंतीमुळे, शिक्षणापासून वंचित राहिलेला हा समाज, पोटाशिवाय बाह्य जगाला पारखा झालेला आहे. परंपरेने चालत आलेल्या जादू या कलेवर जेवढे मिळेल तेवढे स्वीकारायचे, त्यातच उपजीविका करायची, जिथं आश्रय मिळेल तिथे चार दिवस राहायचं, पुन्हा दुसऱ्या ठिकाणी फिरायचं, दादा, भाऊ म्हणून वागायचं एवढंच काय ते त्याचे विश्व. सापाची टोपली (पिटारी), ढोलक, डमरू, बासरी, भोपळ्याची बीन आणि एक जुनाट पोतडी, हीच काय ती त्यांच्या जगण्याची साधने. पत्नीने घर सांभाळायचं, पतीने सापाची टोपली घेऊन वणवण फिरायचं. शाळा नाही, नोकरी नाही, कायमचा धंदा नाही, सरकार दरबारी नावाची नोंद नाही, जातीचा दाखला नाही, रेशन कार्ड नाही, अंगभर वस्त्र नाही, पोटभर अन्न नाही अशी या समाजाची अवस्था आहे. पोटासाठी एकएकटा भटकणारा हा समाज एकत्र कधी रहात नाही, त्यामुळे समाजाचं संघटन नाही. 'ए शेख, अपनी अपनी देख' असे या समाजाचं आजचं चित्र आहे.

२०. दरवेशी

त्या दिवशी मित्राने सांगितलं-हडपसरला अस्वलवाला दिसला... आठ दिवस मी ज्याच्या शोधात होतो त्याचं ठिकाण कळलं म्हणून सकाळीच हडपसरला गेलो. माळवाडी, महंमदवाडी, सस्तेवाडी, वडकीनाला आणि रामटेकडी, वैदूवाडी हा सगळा परिसर पिंजून काढला. पण ना अस्वलवाला दिसला ना त्याचं अस्वल दिसलं. कित्येक जणांना विचारलं, पण उत्तर एकच- 'काल दिसला होता.' दिवसभर त्याचा शोध घेऊन थकलो आणि संध्याकाळी सहासातला कात्रजकडे निघालो तो कात्रज नाक्याच्या अलिकडे वळणावरच स्कूटर आपोआप थांबली ... मला बरं वाटलं अन् दिवसभराचा थकवा कुठल्या कुठे पळून गेला ... समोरून रस्त्याने डोक्याला हिरवं मुंडासं गुंडाळलेला, अंगात कुडता आणि जाकीट घातलेला, मुस्लिम पद्धतीची टिपिकल लुंगी नेसलेला, दाढीमिशा कोरलेला चाळीशीतला माणूस माझ्याकडे येत होता. त्याच्या मागोमाग त्याचा जंगली जीवनसाथी झुलत झुलत चालला होता. मला हवा तो दरवेशी माझ्या समोर आला आणि म्हणाला– 'साब, ताबीज दूं? बालबच्चा सुखी होगा, तुम्हारी मनकी इच्छा पूरी होगी'– मनात म्हटलं– तुला पाहूनच ताइताशिवाय माझी इच्छा पूर्ण झालीय... मी म्हणालो, 'पालं कुठं उतरलीत?' त्यावर तो ॲक्शनमध्ये म्हणाला, 'उपर आकाश येच हमारा पाल है, नीचे धरती ये हमारा आधार है, वहीच अल्लाका घर है, अल्लाकी मर्जीखातर, जिधर मिले उधर खाना, जो देगा उसका भला, जो ना देगा उसकाभी भला...' असं म्हणून रस्त्याच्या कडेला गुडघ्याइतक्या काँग्रेस गवतात अस्वलाला घेऊन तो शिरला, थोडी मोकळी जागा केली आणि तिथेच तो बसला. झोळीतनं मागून आणलेले तुकडे काढले अस्वलापुढे ठेवले आणि बाकीचे अधाशासारखा स्वतः खाऊ लागला. त्याचं खाणं झालं आणि मीही त्याच्याजवळ जाऊन बसलो... तेव्हा काळोख दाटत होता, त्याचा चेहराही मला नीट दिसत नव्हता, माझा चेहरा त्याला दिसत नव्हता. मात्र तो बोलत होता, मी ऐकत होतो. 'दरवर्षी याच ठिकाणी मी रात्र काढतो, दुसरे दिवशी ठिकाण बदलतो. गावात रहावं तर रात्रभर कुत्री भुंकतात, शेजाऱ्यांची झोपमोड होते. लोक तिथून हाकलतात. म्हणून अशा अडगळीला येऊन पडावं लागतं.' खरं तर ती अडगळ पाहून मी हादरलो होतो. आजूबाजूला गवत, दगडधोंडे आणि खडुचांनी ती जागा व्यापली होती. त्यात वेळ रात्रीची, कुठून काय

येईल हे सांगणं कठीण होतं. तो मात्र निर्धास्त बसून होता. शेजारी त्याचं अस्वल घोरत होतं.

त्यानं स्वत:चं नाव हुसेन शहा सांगितलं. हा मूळचा उस्मानाबाद जिल्ह्यातला. सध्या मुक्काम नगर जिल्ह्यात मिया टाकळी येथे. मिया टाकळी हे त्याचं कायम मुक्कामाचं ठिकाण. बायकापोरं तिथंच कायम राहणारी. आसपासच्या गावात मिळेल ती मोलमजुरी करीत उपजीविका करणारी वर्षातून एकदा सुगीच्या हंगामात अस्वलं घेऊन पुरुष माणसं एकेकटचाने मिया टाकळी सोडतात आणि महाराष्ट्रभर भटकतात.

पिढीजात व्यवसाय

अल्लाच्या मर्जीखातर पिढचान् पिढचा, अस्वलाचा खेळ करून उपजिविका करणारा दरवेशी तसा महाराष्ट्राला परिचित आहे. खेडचापाडचात त्याला 'अस्वलवाला' या नावानेच लोक ओळखतात. अस्वलाच्या केसाचे ताईत किंवा नुसते केस जवळ बाळगला तरी भूतपिशाच्चाची बाधा होत नाही, घरात बरकत येते, अशी त्यामागची भ्रामक कल्पना. त्यामुळे खेडचापाडचात दरवेशाच्यामागे आणि त्याच्या अस्वलामागे नेहमीच पोरांचा घोळका आणि येणाऱ्या-जाणाऱ्या माणसांचा गराडा पडलेला असतो.

हुसेन शहा सांगत होता, 'आम्ही एकएकटचाने फिरत असल्याने पालं ठोकून राहाण्याची गरज पडत नाही. खेडचापाडचात गावाबाहेर शाळा असते, तर तिथंच मुक्काम करतो. वेळप्रसंगी रात्र झाली तर आडरानातही मुक्काम ठोकतो. शहरात मात्र जिथे माणसांची वर्दळ असेल तिथे राहाता येत नाही, म्हणून शहराबाहेर उघडचा माळरानावर कशीतरी रात्र काढतो, वेळ मिळेल त्याप्रमाणे नमाज पढतो. शक्यतो फिरतीवर असल्यास नमाज पढत नाही.'

वाघ पाळणारे दरवेशी

पूर्वीच्या काळी दरवेशी वाघ पाळीत असत. गावोगावी वाघ घेऊन हिंडत आणि त्यावरच आपली उपजीविका करीत असत. परंतु नंतरच्या काळात जंगली प्राण्यांचा कायदा झाल्यापासून त्यांनी वाघ पाळणे बंद केलं. स्वत:जवळचे वाघ सर्कसवाल्यांना दिले आणि सध्या अस्वलं घेऊन भटकंती सुरू केली. अस्वल पाळणे हा तसा पिढीजात व्यवसाय झालेला आहे. प्रत्येक दरवेशाकडे एक नर व एक मादी ही असलीच पाहिजे हा त्यांचा संकेत आहे. अस्वलाची पैदास जास्त झाली तर हे लोक लग्नकार्याच्यावेळी समाजात एकदुसऱ्याला अस्वल विकून गरज भागवितात. अस्वलाच्या एका पिल्लाची किंमत दोनशे ते एक हजार रुपयापर्यंत असते. अस्वल माणसाचा आहार खाते. त्यामुळे तसे ते जनावर खर्चिकच. परंतु त्याच्या केसापासून थोडे उत्पन्न मिळते त्यातच त्याचे खाणे-पिणे भागते असेही तो म्हणाला.

दरवेशी हा मुस्लिम धर्मीय असल्याने त्याचे सर्व रीतिरिवाज, लग्नकार्ये, विधी हे मुसलमानांप्रमाणे केले जातात. यांच्यात मोहरम सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. मोहरमच्या काळात दहा दिवस फिरणं बंद असतं. हे लोक एक महिना 'रोजा' पाळतात.

भटकी जमात

दरवेशी हा मुसलमानांतील भटका समाज म्हणून ओळखला जातो. मात्र मशिदीत हा भटका, हा स्थिर असे भेद मानले जात नाहीत. सर्वजण एका ओळीत नमाज पढतात. मशिदीतली समानता मात्र व्यवहारात नसते असे तो म्हणाला. इतर मुसलमानांच्या बरोबर आम्ही रोटीव्यवहार करतो, बेटी व्यवहार होत नाही. आमची लग्ने आमच्याच भटक्या जमातीचा मौलवी लावतो. लग्नं तीन दिवस चालतात. पहिल्या दिवशी बकरा कापून जेवण दिलं जातं. दुसरे दिवशी डाळरोटी आणि तिसरे दिवशी पवित्र कुराणाला साक्ष ठेवून लग्न लावलं जातं. त्या दिवशी ऐपतीप्रमाणे जमातीला खाना दिला जातो.

दरवेशी समाजात 'सुन्ता' या विशिष्ट विधि प्रकाराला अत्यंत पवित्र स्थान दिलं जातं. त्याला ते 'खतना' असे म्हणतात. खतनाचा खर्च शंभरापासून पाचशे रुपयापर्यंत होतो. त्या दिवशी बकरे कापून जमातीला खाना दिला जातो. अशावेळी समाजातील मौलवी (काजी) आणि पंच मंडळीना मान दिला जातो. मौलवीची दक्षिणा द्यावी लागते. खतना आपल्या सोईप्रमाणे केला जातो. मुलगा जन्मल्यापासून वर्षात, सहा महिन्यात किंवा सव्वा महिन्यात सुद्धा सुन्ता केली जाते. अल्लाच्या नावाने जखमेवर उदी लावली की जखम बरी होते अशी त्याची श्रद्धा आहे.

इतर भटक्या विमुक्तांप्रमाणे या समाजातही जात पंचायत आहे. कुराणाशिवाय, जातपंचायतीचे कायदे समाजात पाळले जातात. पंचायतीचे कायदे फार कडक असतात असे तो म्हणाला. समाजात चोरीमारी केली, छिनालपण केलं तर भयंकर शिक्षा दिली जाते. पंचप्रमुख अशा व्यक्तीस दंड करून समाजातून बहिष्कृत करतो, अशा व्यक्तीशी समाजात रोटीबेटी व्यवहार बंद केला जातो. त्याच्या लग्नकार्यात अगर मैतीला कोणी जात नाही.

दरवेशांची मातृभाषा हिंदी असली तरी पिढ्यान् पिढ्याच्या महाराष्ट्रातील भटकंतीमुळे ते मराठी बोलू शकतात. याशिवाय इतरांना कळू नये अशी विशिष्ट सांकेतिक भाषा ते बोलतात. उर्दू, हिंदी, मराठी, गुजराथी यांचे मिश्रण असे तिचे स्वरूप असते.

बहुपत्नीत्वाची पद्धत

अनेकपत्नीत्वाची चाल या समाजात रूढ आहे. हे लोक मुस्लिम धर्मीय असल्याने इतर मुसलमानांत स्त्रियांना जे स्थान आहे तेच याही जमातीत आहे. चूल

मूल हे त्यांचे मर्यादित क्षेत्र. स्त्रियांना समाजात मिसळण्यास बंदी आहे. जातपंचायत किंवा तत्सम जाती निवाडचात स्त्रीला स्थान दिले जात नाही. दरवेशी बायकांची अवस्था सांगताना हुसेन शहा म्हणाला, 'हमारी औरतकु पिक्चर, घागरा, झुंबर अभीतक मालूम नही.' स्त्रिया समाजात किती सुरक्षित आहेत पहा असेच त्याला सांगायचे होते.

या समाजात स्त्रियांना गोषा नाही म्हणून त्या फार स्वतंत्र आहेत असं नव्हे. पुरुषाने अस्वल घेऊन महिनेच्या महिने घराबाहेर फिरायचं, पैपैसा जमवायचा आणि घरवालीने मोलमजुरी करून पोराबाळांना जगवायचं असा यांचा जीवनक्रम आजही चालू आहे. अल्लाच्या भरंवशावर संपूर्ण आयुष्य झोकून दिलेली ही भटकी माणसं स्थिर जीवनापासून दुरावलेली, कमालीच्या अंधश्रद्धेत गुरफटलेली, अज्ञानी, अशिक्षित आणि दारिद्र्य रेषेच्या खाली जीवन जगणारी अशी आहेत. आता भटक्या जीवनाचा त्यांना कंटाळा आलाय. कुठंतरी स्वतःचं घरदार असावं, पोटापुरत्या मजुरीची सोय व्हावी, पोराबाळांना शिकायला मिळावं, समाजाने आणि मायबाप सरकारने आम्हाला समजून घ्यावं अशी त्यांची इच्छा आहे. सततच्या भटकंतीमुळे समाजाची स्थित्यंतरे ते उघड्या डोळ्याने रोज पहात आहेत. शहरं वाढत आहेत, खेडी बदलत आहेत याची जाणीव त्यांना होऊ लागलीय. 'आपणही त्यांच्यासारखं बदलावं आणि स्थिर माणसांचं जीवन असं जगावं' बोलून तो क्षणभर थांबला, दोन्ही हात समोर पसरले आणि आकाशाकडे पहात तो पुटपुटला, 'अल्ला कब हुकूम करता है, उसका इंतजार कर रहा हूं !'

❋

२१. सपेरेनाथ

भटक्या समाजातील माणसं नेमकी कुठे आणि कशा अवस्थेस्त भेटतील हे सांगणं तसं कठीणच. आज इथं भेटले तर उद्या कोठे भेटतील हे शोधणे तर त्याही पेक्षा कठीण. जिथं पोटाला मिळतं तिथं थांबायचं, मिळणं बंद झालं की पुढचं ठिकाण जवळ करायचं. कधी गावात तर कधी गावाबाहेर, कधी पालं ठोकून तर कधी उघड्यावर प्रपंच थाटायचा. भटकत जन्मायचं आणि भटकतच मरून जायचे, हे जीवनाचं उपरे आणि उपेक्षितपण गेल्या कित्येक वर्षापासून त्यांच्या वाटचाला आलेलं. त्यांच्या व्यथा, वेदना, त्यांचे जगणं-मरणं, जाणून घेण्यासाठी गेली दोन-अडीच वर्षे मीही त्यांच्या मागे मागे, मुलाखतीच्या निमित्ताने भटकतोय. कधी पालावर, कधी तांड्यावर, कधी वस्त्यांवर तर कधी त्यांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणावर त्यांना गाठायचं, ओळख काढायची, होईल तेव्हढी दिलजमाई करायचो, त्यांना बोलतं करण्याचा प्रयत्न करायचा, त्यांच्या विड्याकाड्या, चहापाणी, जेवणखाण, वेळप्रसंगी ५-१० रु. त्यांच्या हातावर ठेवायचे आणि मिळेल ती माहिती घेऊन निघून जायचं हे आता चांगलंच अंगवळणी पडलंय.

नाव कसे पडले ?

परवा शिवाजीनगर स्टेशनच्या आजूबाजूला भटक्यांच्या शोधात असाच भटकत होतो. तिथे नव्याने आलेली दोन बिऱ्हाडं दिसली, विचारपूस केली, तर मध्यप्रदेशातून पोट भरण्याच्या निमित्ताने पुण्यात प्रथमच आलेला 'सपेरेनाथ' भेटला. सपेरेनाथ त्या समाजाचे नाव. अमरनाथ सपेरी हे त्या बिऱ्हाडवाल्याचे नाव. अमरनाथ अतिशय नम्र स्वभावाचा, बऱ्यापैकी हिंदी बोलणारा, चाळीशीतला गृहस्थ. त्याच्या शेजारी त्याची पत्नी तीन दगडांच्या चुलीवर स्वयंपाक करत बसलेली, आजूबाजूला दोन-तीन गाठोडी आणि एकावर एक अशा उतरंडीसारख्या रचून ठेवलेल्या तीन टोकऱ्या, तिथंच शेजारी त्याची दोन उघडी पोरं तीन-साडेतीन फूट लांबीच्या सापाबरोबर खेळत बसलेली.

पोरांच्या हातात साप पाहून माझ्या मनात धस्स झालं. माझी अवस्था अमरनाथने हेरली आणि म्हणाला, 'साब, ये तो मुका जनावर है, दोस्ती किया तो दोस्ती करता है, और बदमासी किया तो सबक सिखाता है। ये हमारे बच्चोंका खिलौना है, इसके उपर हमारा पेट भरता है।'

त्याचे वोलणे खरे असले तरी. सापाला टोकरीत बंद केल्याशिवाय तिथे बसणे मला शक्य नव्हते. मी त्याला तसे सांगितले. तेव्हा त्याने सापाला टोकरीत बंद केले आणि मी आजूबाजूचा अंदाज घेत तिथे बैठक मारली. तसे शेजारी बसलेले त्याचे भाऊबंद आमच्या जवळ येऊन बसले. अमरनाथने त्यांच्या सांकेतिक भाषेत त्यांना काहीतरी सांगितलं. अमरनाथ सांगत होता...

पिढ्यान् पिढ्या सापांचा खेळ करणारा 'सपेरेनाथ' हा समाज मूळचा मध्य प्रदेशातला. जंगलातील अति विषारी नाग, साप, अजगर. पकडायचे आणि गावोगावी लोकांना दाखवीत फिरायचे हा त्यांचा परंपरागत पोट भरण्याचा व्यवसाय. काला नाग, कोब्रा, दिवड, गोरा अजगर, उडन साँप, बिच्चू, रगबन्सी, घोसरा नाग अशा विविध जातीचे साप आणि नाग हे लोक मोठ्या शिताफीने पकडतात, असे त्याने सांगितले. नाग-सापाबरोबरच जंगलातल्या औषधी वनस्पती गोळा करून विकण्याचाही व्यवसाय हे लोक करतात. घरच्या कर्त्या पुरुषाने सापाच्या खेळावर पै–पैसा गोळा करायचा, तर घरवालीने झाडपाल्याची औषधे विकायची आणि पोट भरायचे असा त्यांचा दिनक्रम चालू असतो.

महाराष्ट्रातील मराठी माणसाला परिचित असणारा गारुडी, मदारी किंवा सापवाला आणि मध्य प्रदेशातील सपेरेनाथ यांचा अर्थाअर्थी तसा संबंध नाही. सपेरेनाथ हे मदाऱ्याप्रमाणे जादूचे अगर भानामतीचे खेळ करीत नाहीत किंवा हातचलाखी करून लोकांचं मनोरंजनही करीत नाहीत, तर गर्दीच्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला नागाला जमिनीवर सोडायचं आणि पुंगी वाजवून लोकांना आकर्षित करायचं, वेगवेगळ्या प्रकारचे.नाग–साप दाखवून लोकांना पैसे मागायचे.

सपेरेनाथ समाजातील व्यक्ती समूहाने कधीही भटकत नाहीत. एकेकटयाने भटकतात आणि संध्याकाळी सगळेजण बिऱ्हाडांवर एकत्र येऊन दिवसभरात मिळालेली कमाई एकत्र करतात आणि सर्वांना सारखे वाटतात, असे त्याने सांगितले.

मध्य प्रदेशात या लोकांची मोठी वस्ती आहे. राठोड, कोबियाल, बामनी बिहाळ, पोवार, सतीवाळ राठोड आणि चंवडेवाल राठोड अशी काही त्यांची मुख्य घराणी आहेत. या घराण्यांना ते समाजातील खानदानी घराणी समजतात. वरचढ घराण्यांत आपापसात सोयरीकसंबंध होतात. घराण्यात प्रत्येक कुटुंबाचे महत्त्व ठरलेले आहे. ज्यांच्याजवळ अतिविषारी आणि संख्येने अधिक नाग असतात ते कुटुंब वरील समजले जाते. या समाजात मोठ्या प्रमाणात सावकारी चालते, सापांची खरेदी-विक्री चालते. लग्नकार्यात सापांची देवाण–घेवाण होते. मात्र जातीबाहेर साप विकले जात नाहीत, असे करणे पाप समजले जाते. मुलापेक्षाही सापाला अधिक सांभाळण्याची प्रवृत्ती या समाजात आढळते.

सपेरेनाथ या समाजातील एकाच घराण्यात विवाह केले जात नाहीत. आपल्या बरोबरीच्या किंवा परिस्थितीने समान असणाऱ्या कुटुंबातच सोयरीकसंबंध जोडण्याची रीत या समाजात आहे. मुलीने मुलाला काही वस्तूंच्या स्वरूपात भेट देण्याची

पद्धत आहे. मुलीच्या लोकांनी विवाहप्रसंगी एक ग्लास, चारनी, तवा, परात आणि दोनशे पन्नास ग्रॅम चांदी देण्याचा रिवाज आहे, तर तिच्या मामाने तिला नवीन कपडे देण्याची पद्धत आहे. लग्नात देण्या–घेण्याविषयी करार केला जातो. करार ब्राह्मणासमोर करण्याची परंपरा आहे. लग्नही ब्राह्मणच लावतो.

या समाजातील लग्नसोहळा नऊ दिवस चालतो. नऊ दिवस वेगवेगळे विधी केले जातात. पहिल्या दिवशी मातीचा गणपती करून त्याची पूजा केली जाते आणि मग लग्नविधीच्या कार्यक्रमाला खऱ्या अर्थाने सुरुवात केली जाते. पुढे पाच दिवस मुलाला हळद लावली जाते. त्याला 'लाडचाको हालदी लगाना' असे म्हटले जाते. पाच दिवस हळदी खेळल्यानंतर सहाव्या दिवशी विवाहाला जमलेले लोक फेशर आणि भांगडा नृत्य करून नवरा–नवरीला खूश करतात. सातव्या दिवशी जमातीला जेवण दिलं जातं. सर्वजण दारू पितात. आठव्या दिवशी लग्न मुहूर्त आणि ब्राह्मणाच्या उपस्थितीत धार्मिक विधी केला जातो. त्या दिवशी नवरा–नवरी कुलदैवताच्या नावाने उपवास धरतात आणि नवव्या दिवशी सर्व समाज व जातपंचायत यांच्या समक्ष ब्राह्मण विधिपूर्वक लग्न लावतो. अनेकपत्नीत्वाची चाल या समाजात रूढ आहे. मोठ्या प्रमाणात बालविवाह केले जातात.

कृष्ण, गंगा, वजरंग बाबा, सितलामाता, कालीमाता, चंडकीमाता, चवडीमाता, दुर्गामाता, नरदा माता आणि भेरु महाराज अशी यांच्या दैवतांची नावे आहेत. देवदेवतांचे फोटो, देव्हारे किंवा प्रतीके यांच्या घरात असतात. पूजापाठ, नवस, उपासतापास हे लोक करतात.

दिवाळी हा या समाजातील मोठा सण मानला जातो. प्रमुख सण म्हणूनही तो साजरा केला जातो. या सणाच्या दिवशी बकरी आणि म्हैस पुजण्याचा रिवाज या समाजात आहे. महाराष्ट्रात गाईची पूजा करतात तर हे लोक बकरी आणि म्हैस याची पूजा करतात. पूजापाठाचा हा विधी आठ दिवस चालतो.

इतर भटक्या विमुक्त समाजाप्रमाणे या समाजातही जात पंचायतीला अतिशय महत्त्वाचे असे स्थान आहे. पंचायतीमध्ये पाच व्यक्ती प्रमुख असतात तर या पाच पंचावरती एक व्यक्ती प्रमुख असते. तिला सरपंच असे म्हणतात. सरपंचाला समाजात मानाचे स्थान असते. सामाजिक कार्यक्रमाचेवेळी त्याला प्रतिष्ठा मिळते. समाजातील लग्नकार्य किंवा इतर धार्मिक प्रसंगी सरपंचाना आग्रहाने बोलाविले जाते. समाजप्रमुख म्हणून त्याला मान्यता आहे.

समाजातील भांडणतंटा सोडविण्यासाठी किंवा न्याय मागण्यासाठी हे लोक कोर्टात अथवा कचेऱ्यात जात नाहीत. गुन्ह्याचा न्यायनिवाडा करण्याचे काम जात पंचायत करते. समाजात भांडणतंटा झाला किंवा पती पत्नीचा बेबनाव होऊन प्रकरण वाढले अथवा समाजात चोरीमारी झाली किंवा एखाद्या स्त्री–पुरुषाने अनैतिक संबंध ठेवले तर जात पंचायत अशा घटनांचा निवाडा करते आणि संबंधितांना ठराविक शिक्षा करते.

समाजातील बाई वाईट वागली, अनैतिक संबंध ठेवले तर तिचे कान व नाक कापले जाते. अशा बाईला जो कोणी सहारा देईल त्याला शंभर रुपयांपर्यंत दंड केला जातो. लग्नाशिवाय एखादी बाई घरात ठेवली तर एक हजार एक पर्यंत दंड केला जातो. वेळ प्रसंगी बायकोला नवऱ्याने मारले तरी चालते, परंतु मरताना जर तिला शिवी दिली तर पंचायत नवऱ्याला पाचशे रुपये दंड करते. समाजात कोणी भांडण केले तर त्याला दोनशे ते पाचशे रुपये दंड केला जातो. अशा प्रकारे गुन्हेगारास शिक्षा करण्याची पद्धत या समाजात आहे. पंचायतीने दिलेली शिक्षा ही समाजातील प्रत्येकाला बंधनकारक असते. शिक्षा नाकारणाऱ्या व्यक्तीस समाज बहिष्कृत करतो.

दफन प्रथा

सपेरेनाथ समाजात प्रेताला पुरण्याची प्रथा आहे. समाजात मैत झाली तर मृताची वाजतगाजत प्रेतयात्रा काढली जाते. बँड आणि तुतारी वाजवत त्याला स्मशानात नेले जाते, प्रेतावर पैसे उधळले जातात. मृताला ज्या ठिकाणी दफन केले जाते तेथे बारा दिवसानंतर थडगे बांधले जाते. समाजाला लाडूचे जेवण दिले जाते. त्या दिवशी दारू पिऊन नाचगाण्याचा कार्यक्रम केला जातो. ज्यांच्या घरी मैत होते त्या घरप्रमुखाने पंचायतीला ऐपतीप्रमाणे शंभर ते पाचशे रुपये द्यावे लागतात. त्या पैशातून समाजाला पंचायत दारू आणि जेवण देते.

श्रावण महिना या समाजात अत्यंत पवित्र मानला जातो. या महिन्यात नाग-पंचमीला नागाची घरोघर पूजा केली जाते. फुले, अगरबत्ती वाहिली जाते...इतर लोक सपेरेबाबूला घरोघर बोलावून नागाची पूजा करतात, अशा वेळी धान्य, कपडे आणि पैसे भाविक लोक त्यांना देतात. या महिन्यात चांगली कमाई होते.

साप, नाग पकडणे, पाळणे, खेळ करणे, नागाच्या विषावर उतारा देणे, मंत्र-तंत्राने नागाचे विष उतरविणे अशा प्रकारे उद्योग करून पिढ्यान्‌पिढ्या ही मंडळी आपली उपजीविका करीत आहेत. मध्य प्रदेशातील जेमतेम दोन जिल्ह्यात वस्ती असणारा हा समाज महाराष्ट्रातील गारुडी आणि मदारीप्रमाणे साप–नागावर आपली उपजीविका करतोय. पोटासाठी सतत गावोगावी भटकंती असल्याने कायमचे ठिकाण नाही, शेतीवाडी नाही, घरदार नाही, शिक्षण नाही अशी त्यांची अवस्था आहे. जिथे पोटाला मिळेल तिथे थांबायचं, नाही तर बायकापोरं घेऊन पुढच्या गावाला चालायचं. दिवसभर नाग, सापाला मिरवायचं. जिथे रात्र होईल तिथेच उघड्यावर पडायचं, असे बेभरवशाचं उपेक्षित जगणं सपेरीबाबू आजही जगतोय.

पैसे मिळविण्याची अजब तऱ्हा

आमच्या गप्पा चालू असताना अमरनाथचा दोन तीन वर्षाचा उघडा पोर माझ्याजवळ येऊन उभा राहिला. त्याच्या हातात पाच रुपयाची नोट मी ठेवली, ते पोर पैसे घेऊन त्यांच्या आईकडे गेलं. अमरनाथला पाच रुपये फारच कमी वाटले

असावेत. त्याने शेजारची सापाची टोकरी माझ्यासमोर ठेवली आणि म्हणाला 'साब, पाच रुपया तो हम बिडीकाडीके लिये खर्चा करता है। हमारे पेटको मत दो, ये नागराजके लिये तो दो।' असं म्हणून त्याने टोकरीचे झाकण उघडले. तेव्हा टोकरीतल्या काळचा कुळकुळीत नागाने फणा काढून माझ्याकडे पाहिले, मी फूटभर मागे सरकलो, तेव्हा अमरनाथ म्हणाला, 'ये नागराज बहोत खतरनाक होता है, घोयरा कहते है। उसका दर्शन हुवा तो लोग बीस पचीस रुपया देते है'। त्याचा हेतू माझ्या लक्षात येऊन मी म्हणालो, तुझ्या नागाचं दर्शन मला नको आहे, तुझ्या पोराला खाऊला पाच रुपये दिलेत. त्यावर तो हट्टाने म्हणाला, 'साब, घोयरा नागराजका दर्शन हुवा तो पांच-पचीस देनाही पडता है। उसके आँखमें केमेरा होता है। जो पैसा देता नाही, उसकी तसबीर नागराजकी आँखोमें निकलती है। आप जैसे बडे साबकी तसबीर निकलना अच्छा नही, खुशीसे कुछ तो दे दो' असं म्हणून त्याने त्या नागाला डिवचलं, तेव्हा त्याने जोराने फूत्कार टाकला. मला घाबरवून टाकून पैसे उकळण्याचा त्याच्या उद्देश माझ्या लक्षात आला होता. शेवटी तो त्याच्या पोटासाठी पैसे मागत होता, हे उघड होतं. नाग हे त्याचं माध्यम होतं. मी पुन्हा पाच रुपयाची नोट काढून त्याच्या हातावर ठेवली आणि त्याचा निरोप घेतला.



२२. मारवाडी माटी

कलावंत म्हणून समाजात प्रतिष्ठेने जगणारे आणि आपले वेगळे अस्तित्व जपण्यासाठी सतत धडपडणारे अनेक लोक आपण समाजात पहात असतो. अशा लोकांना त्यांच्या कलागुणांमुळे समाजमान्यता मिळते, सामाजिक प्रतिष्ठा मिळते. कलावंत म्हणून समाज त्यांचं कोडकौतुक करतो. एवढेच नव्हे तर इतर सर्वसामान्यांपेक्षा अशा कलावंताचे स्थान नेहमीच वेगळे समजले जाते. मग तो चित्रकार असो, गायक असो, वादक असो किंवा एखादा शिल्पकार, मूर्तीकार असो. त्याची समाजात काही प्रमाणात का होईना पण दखल घेतली जाते. परंतु याच समाज व्यवस्थेचा घटक असलेला, मात्र ज्याच्या वाटचाला कधी जीवनाची स्थिरता लाभली नाही, परंतु कला हेच ज्याचं जीवनाचं अविभाज्य अंग आहे, कलेवरच ज्याचं जगणं मरणं चालू आहे, अशा कितीतरी भटक्या समाजांना आणि त्या समाजांतील जातिवंत कलावंतांना स्वतःला प्रतिष्ठित समजणाऱ्या स्थिर समाजाने कलाकार म्हणून तर कधी स्वीकारलेच नाही. उलट त्यांना भटके, परके, परदेशी आणि उपरे म्हणूनच त्यांची आणि त्यांच्या कलागुणांची अवहेलना केली, उपेक्षा केली. त्यांना जाणून घेण्याचा, समजून घेण्याचा किंवा त्यांना सामावून घेण्याचा कधी कोणी प्रयत्न केलेला नाही. त्यामुळे अंगी उत्तम कलागुण असूनसुद्धा या भटक्या कलावंत समाजांना केवळ पोटासाठी आज इथं तर उद्या तिथं अशा अवस्थेत कवडी किंमतीने आपली कलाकृती रस्त्यावर बसून विकावी लागते. कारण पोटाबरोबर त्याचं जगणं–मरणंच रस्त्यावर आलेले आहे.

बैलांच्या व्यापाराकडून मूर्तीकडे

मारवाडी भाटी हा असाच एक रस्त्यावरचा उपेक्षित भटका कलावंत समाज आहे. मातीच्या मूर्ती करून विकायच्या हा त्याचा व्यवसाय. हमरस्त्याच्या कडेला मळकट कळकट ठोकलेल्या चारपाच ठेंगण्या पालांत त्यांचा उघड्यावरचा प्रपंच. तिथंच मातीला आकार द्यायचा, देवादिकांच्या छोट्यामोठ्या मूर्ती तयार करायच्या, त्या रंगवायच्या आणि पालासमोर विक्रीसाठी ठेवायच्या किंवा मूर्ती घेऊन घरोघर विक्रीला जायचं, हा त्यांचा दिनक्रम. लहानापासून थोरापर्यंत कुटुंबातील प्रत्येक स्त्री-पुरुष या व्यवसायात गुंतलेला दिसतो.

मारवाडी भाटी हा समाज तसं पाहिलं तर मूळचा राजस्थानातील. बारा-तेराव्या शतकात हे लोक बैलांचा व्यापार करीत असत. शेतीला आवश्यक असणारे बैल शेतकऱ्यांना विकायचे, त्या मोबदल्यात धान्य स्वीकारायचं आणि त्या धान्यावर कुटुंबाची उपजीविका करून उरलेले धान्य पुन्हा विकायचे असा त्यांचा व्यापार असे. या धंद्याबरोबरच सुतळचा, दोरखंड तयार करून विकण्याचा व्यवसायही त्यांच्यापैकी काही लोक करीत होते. परंतु राजस्थानातील भयंकर दुष्काळामुळे हे लोक गुजरातमध्ये स्थानिक झाले आणि त्यांनी मूर्ती तयार करण्याची कला अवगत केली. त्यावरच ते पुढील काळात आपली उपजीविका करीत राहिले. पर्यायाने व्यवसायासाठी भटकंती सुरू झाली आणि हे लोक भटकत भटकत महाराष्ट्रात येऊन अस्थिर जीवन जगू लागले.

भाविक व श्रद्धाळू समाज

मूळचा मारवाडी भाटी या नावाने ओळखला जाणारा हा समाज असला तरी, एकूण अडतीस पोटजातींत किंवा पोटकुळांत विभागलेला आहे. त्यात भाट, धांदलवार, मोतीरवारा, भुतिवारा, काराणी, भाटी, नांगरा, सोलंकी, मोहरी, मकवाना, लिलगवाडा, मजलवारा, सतराणी, सुजाणी, धर्माणी, सोनारा, लिमलावाडा, पांडूदरवाडा लुहारीया, वडियारा, आजाणी वगैरे प्रमुख कुळे आहेत. या कुळांनाच हे लोक पोटजाती समजतात.

वरील कुळाल किंवा पोटजातीत आपापसात रोटीबेटी व्यवहार केला जातो, परंतु एकाच कुळात बेटी व्यवहार होत नाही. ठराविक कुळांची प्रतिष्ठा समाजात आजही मानली जाते. त्यांना मानपान दिला जातो. प्रत्येक कुळाची कुलदैवते निराळी आहेत. कुळानुसार कुलदैवतांची विभागणी अगदी सुरवातीच्या काळापासून झालेली दिसते. खोडीयार माँ, जय सामुंडी, महाकाली, जय भवानी, जुगतकी जोगणी, महावीर, कालाभैरव आणि गोरा भैरव या नावाची काही त्यांची प्रमुख कुलदैवते आहेत.

हे लोक भाविक आहेत. देवदेवतांचे देव्हारे यांच्या पालात पाहावयास मिळतात. देवाला नवस करणे, त्यांच्या नावाने उपास तापास करणे, कोंबडं–बकरं कापणे किंवा देवदेवता अंगात आणणे असे सर्रास श्रद्धेचे आणि अंधश्रद्धेचे प्रकार हे लोक करीत असतात. विशेषत: कुलदेवीसमोर कापलेल्या बकऱ्याचं रक्त प्याले तर घरातील इडापिडा जाते, भूतबाधा होत नाही अशी यांची कल्पना आहे.

मारवाडी भाटी हे अग्नीला अत्यंत पूज्य मानणारे लोक आहेत. होळी हा या समाजाचा सर्वात मोठा आणि पवित्र सण म्हणून मानला जातो. होळीच्या दिवशी सर्वांनी रंगांची उधळण करावी, लहानांपासून थोरापर्यंत स्त्री पुरुषांनी दिवसभर रंगाने माखून जावं, वर्षभराच्या कष्टाचा शीण त्या दिवशी हलका करावा आणि सायंकाळी खावं प्यावं आणि मस्तीत नाचावं असं त्या दिवसाचं वैशिष्ट्य

म्हणून सांगितले जाते.

विवाहप्रथा

राजस्थानातून महाराष्ट्रात आलेल्या भटक्या समाजांची संख्या कमी नाही, परंतु या सर्व समाजांचे रीतिरिवाज सारखे नाहीत. इतर भटक्या समाजांपेक्षा मारवाडी भाटी या समाजाची लग्नाची पद्धतही जरा विचित्र वाटते. लहान वयात मुलामुलींची लग्नं ठरवायची, मात्र वयाची अठरा वर्षे पूर्ण झाल्यावर विधिपूर्वक लग्न लावायचं. किंवा लग्नावेळचं बाशिंग नवरा–नवरीच्या कपाळावर न बांधता उजव्या कानावर बांधायचं आणि लग्न मुलीच्या मामाने विधिपूर्वक लावायचं अशा काही प्रथा पिढचान् पिढचा या समाजात चालू आहेत.

लग्नानंतर जर सासऱ्याला आपली सून नको असेल, आणि मुलानेही एखाद्या मुलीचा (पत्नीचा) त्याग करायचे ठरविले तर मुलाच्या बापाने मुलीच्या बापाला फक्त नऊ रुपये देऊन काडीमोड घ्यायचा अशी प्रथा या समाजात पाहावयास मिळते. मात्र लग्नानंतर एखाद्या मुलीला तिचा पती पसंत नसेल किंवा त्याच्या बरोबर राहाण्याची तिची इच्छा नसेल तर मुलीच्या वडिलांनी तिच्या लग्नाला झालेल्या एकूण खर्चाच्या दुप्पट रक्कम मुलाच्या (नवऱ्याच्या) वडिलांना द्यावी लागते, तरच त्या दोघांना फारकत घेता येते. किंवा लग्नानंतर जर एखाद्या स्त्रीचा पती अपघाती मरण पावला तर पतीचे वडील तिच्या वडिलांना अठरा रुपये देतात आणि तिला तिच्या वडिलांच्या घरी पाठवितात. अशा प्रकारे स्त्रियांच्या बाबतीत काटेकोरपणे पाळले जाणारे अलिखित नियम आजही या समाजात आढळतात.

धंद्याच्या निमित्ताने गावोगावी भटकणारा हा समाज, त्याच्या नियमित भटकंतीमुळे शिक्षणापासून पूर्णपणे दूर असलेला आढळतो. लहान वयापासून वडिलांच्या धंद्याचे मुलांना शिक्षण मिळाल्याने उपजीविकेचे साधन म्हणून वडिलोपार्जित मूर्तीचा व्यवसाय करण्यातच हे लोक रमलेले आढळतात. व्यवसायाच्या निमित्ताने इतर समाजाचा त्यांच्याशी संबंध येत असला तरी, गिऱ्हाईक आणि मालक इतपतच त्याची मर्यादा राहिलेली आहे. व्यवसाय म्हणून तात्पुरता संबंध ठेवायचा, बाकी आपले वेगळे किंवा स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवायचे, इतर समाजात मिसळायचं नाही, दहा–पंधरा दिवसांपेक्षा अधिक एका गावात थांबायचं नाही आपला धंदा भला की आपण भले, इतके तटस्थपणे हे लोक जगत आहेत.

त्यांची भाषा, त्यांचा पेहराव, चालीरीती आणि परंपरा या अर्थातच वेगळ्या असल्याने स्थानिक लोकांना ते परके वाटतात. त्यामुळे इथंच जगणारे, इथंच राहाणारे, इथले नसल्यासारखे हे लोक. स्वभावाने अत्यंत नम्र आणि व्यवहारचतुर आहेत.

मारवाडी भाटी हे मूर्तीकार किंवा मूर्ती विकणारे म्हणून लोकांना परिचित

आहेत. केवळ त्यांच्या अस्थिर जीवनामुळे त्यांच्या कलागुणांना किंवा त्यांच्यातल्या कलावंताला नाकारणे हे न्याय्य होणार नाही. समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याचा प्रयत्न करून त्यांची भटकंती, काही प्रमाणात का होईना, थांबविण्याचा प्रयत्न झाला तर त्यांच्या पारंपरिक कलेला आणि जगण्याला काही अर्थ उरणार आहे असे वाटते. शासनाने आणि समाजाने, अशा भटक्या कलाकारांना सहकार्याचा हात दिला तर त्यांच्या जीवनाला नवी पालवी फुटल्याशिवाय राहाणार नाही.



२३. रमय्या

गेल्या अनेक वर्षांपासून 'फेरीचा' व्यवसाय करणारे म्हणून 'रमय्या' लोक ओळखले जातात. हे लोक शीख धर्मीय असून, शीख धर्मातील ज्या काही प्रमुख जमाती आहेत, त्यांपैकी रमय्या ही एक जमात आहे. हे लोक मूळचे उत्तर प्रदेशातील राहणारे असून व्यवसायाच्या निमित्ताने ते देशभर सतत भटकत असतात. भटकणे हा त्यांचा पिढीजात स्वभाव आहे. व्यवसायाच्या निमित्ताने सतत भटकणारा आणि आपल्या व्यवसायात रमणारा म्हणून त्यांना 'रमय्या' या नावाने लोक ओळखतात स्वतःची ओळख ते 'रमय्या' याच नावाने करून देतात असे या समाजातील श्री. गुरुदयालसिंग ध्यानसिंग पोथिवाल यांनी सांगितले.

'रमय्या' या जमातीचे लोक भारतात सर्वत्र आढळत असले आणि ते उत्तर प्रदेशातले राहाणारे असले तरी, त्यांची मूळ वस्ती बिजनोर जिल्ह्याशिवाय इतर कोठेही आढळत नाही. बिजनोर जिल्ह्यातील पंचवीस गावे ही या जमातींच्या लोकांची आहेत. तेथे त्यांची शेतीवाडी आणि घरेदारे पाहावयास मिळतात.

देशभरचा भटका

आपल्या पिढीजात व्यवसायात रमणारा रमय्या काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व्यवसायाच्या निमित्ताने एकएकटयाने नियमित भटकत असतो. त्याची पत्नी, मुलेबाळे ही त्याच्या मूळ गावात असतात. वर्षातले काही महिने रमय्या पुरुष धंदयासाठी घराबाहेर पडतात, तर ऐन पावळचाच्या वेळी या समाजातील सर्व पुरुष मंडळी आपापल्या मूळ गावी येऊन राहातात. त्या काळात ते मोठ्ठा सण साजरा करतात. घरात गोडधोड पदार्थ करून आनंद लुटत असतात.

स्त्रियांनी घरप्रपंच सांभाळायचा तर पुरुषांनी त्यांच्या उपजीविकेसाठी वर्षातील काही महिने गाव, घरदार, प्रपंच, बायकामुले सोडून भटकत राह्यचं हे कित्येक पिढ्या या समाजात सातत्याने चालू आहे. स्वतंत्र व्यवसाय करणे हे या समाजात प्रतिष्ठेचे मानले जाते.

औषधे, अत्तरे आणि कापड

झाडपाल्याची औषधे, उंची कापड आणि अत्तर वगैरे प्रकारच्या काही वस्तू

विकण्याचा व्यवसाय हे लोक करतात. व्यवसायाच्या निमित्तानें सतत भटकंतीमुळे, गावोगावच्या ठराविक लोकांशी त्यांचा परिचय झालेला असतो. त्या परिचयाचा उपयोग त्यांना धंद्याच्या वेळेला होतो. धंद्याचे साहित्य ठेवण्यासाठी किंवा विश्रांतीसाठी निवाऱ्यापुरती जागा त्यांना ओळखीच्या ठिकाणी मिळू शकते.

या समाजात काही प्रतिष्ठित गोत्रं मानली जातात, त्यांमध्ये पोथिवाल, राठोड, भट्टी, कापसे, पवार, रिटियान आणि सोड्डी या गोत्रांचा किंवा आडनावांचा समावेश होतो. एका गोत्रात सोईर संबंध केले जात नाहीत. असे संबंध ठेवण्याचा कोणी प्रयत्न केला तर समाज त्या व्यक्तीस बहिष्कृत करतो. त्याच्याशी कोणतेही संबंध ठेवले जात नाहीत किंवा अशा व्यक्तीला समाजातील कोणत्याही कार्याला बोलाविले जात नाही.

इतर भटक्या विमुक्त समाजांप्रमाणे रमय्या समाजात 'जातपंचायत' ही सामाजिक संस्था नाही, तर बिजनोर जिल्ह्यातील या समाजाच्या पंचवीस गावांपैकी प्रत्येक गावात समाजाचा मुख्य किंवा मुखिया असतो, तो गावचा न्यायनिवाडा करतो. त्या गावातील समाजाच्या बऱ्यावाईट घटनांचा तोच सोक्षमोक्ष लावतो. परंतु जर एखाद्या गावातील घटना ही त्या गावच्या प्रमुखाच्या शक्तीपलिकडची असेल, किंवा तो मुखिया त्या गावातील घटनेला योग्य न्याय देऊ शकत नसेल तर रमय्या समाजाच्या एकूण पंचवीस गावांतील प्रमुख एकत्र बसून संबंधित गावचा न्यायनिवाडा करतात. तो सर्वांना बांधील असतो.

रमय्या पुरुष ज्या ज्या वेळेला धंद्याच्या निमित्ताने गाव सोडून बाहेरगावी भटकतात तेव्हा त्या व्यक्तीच्या घरातील लोकांना अडीअडचणीच्या काळात सहाय्य करण्याचे काम गावप्रमुख करीत असतो. त्यामुळे घरातील कर्ते पुरुष वर्षातील आठ आठ महिने घरप्रपंच सोडून बाहेर राहिले तरीही त्यांना तशी काळजी नसते.

गुरुनिष्ठा हाच धर्म

'रमय्या' हा समाज शीख धर्मीय असला तरी शीख धर्मातील प्रत्येक जाती जमातीच्या रूढी परंपरा किंवा जगण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. प्रत्येक जमातीची लग्नपद्धत वेगळी आहे, व्यवसाय वेगळा आहे, जमातीचे कायदे वेगळे आहेत. मात्र शीख धर्माबद्दल आणि धर्मातील गुरूंबद्दल निष्ठा सर्वांच्या सारख्याच आहेत. मग तो भटका सिक्कल शीख असो किंवा व्यवसायात रमणारा रमय्या (शीख) असो. ग्रंथसाहेब हे त्यांचे पूज्य स्थान आहे, गुरु गोविंदसिंग हे त्यांनी थोर गुरू मानले आहेत.

इतर समाजाप्रमाणे रमय्या समाजातील लग्नपद्धती ही त्यांची परंपरागत मौलिक ठेव आहे असे ते मानतात. विवाहानंतर प्रत्येक जोडप्याने गुरुग्रंथसाहेबांना टेबलावर आदराने ठेवून त्यांच्या साक्षीने चार फेऱ्या मारल्यावर लग्नबंधन कायम केले जाते, त्याला ते 'आनंत कारज' असे म्हणतात.

या समाजात हुंडा देण्याघेण्याची प्रथा आहे. त्याला ते लगन असे म्हणतात. मुलीच्या घरच्या लोकांच्या ऐपतीप्रमाणे, पाच ते दहा हजारापर्यंत मुलाला हुंडा द्यावा लागतो. हुंडा हे या समाजात प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते.

शीख विवाहपद्धती

या समाजातील विवाह सोहळा पाच ते सात दिवस चालतो. पहिला लगन देणे, दुसरा मान (हळदी), तिसरा मढा (बारात), आणि चौथा व पाचवा विवाह असे क्रम ठरलेले आहेत. साधारणतः पाचवे दिवशी गुरुद्वारात ग्यानीजींच्या उपस्थितीत लग्नविधी पार पाडला जातो. ग्रंथसाहेबाला वधूवराने चार फेऱ्या मारल्या की विधी संपतो. वधूवरांनी एकमेकांना फुलाच्या माळा घालण्याऐवजी एकमेकांच्या वस्त्राची गाठ मारून फेऱ्या मारणे हाच लग्नविधीतील शेवटचा प्रसंग.

विवाहप्रसंगी नियोजित वराला त्यांच्या परंपरेने किंवा शीख धर्मपद्धतीने शेरा, कटचार, कंगन, फणी आणि गुलाबी फेटा दिला जातो, तर वधूला लाल रंगाची साडी आणि ब्लाऊज दिला जातो.

शीख धर्मातील स्त्रियांप्रमाणे सलवार–कुडता असा पोशाख रमय्या समाजातील स्त्रिया करीत नाहीत तर साडी, चोळी किंवा ब्लाऊज नेसणे हेच त्या पसंत करतात.

या समाजात अनेकपत्नीत्वाची चाल रूढ नाही. एकपत्नीत्व हे समाजात पवित्र आणि प्रतिष्ठेचे मानले गेले आहे. मात्र लग्नानंतर पति–पत्नीत बेबनाव झाला तर ते दोघेही विभक्त होऊ शकतात आणि आपल्या आवडीनुसार अन्य स्त्री-पुरुषाशी पुनर्विवाह करू शकतात. त्याला 'करवा' असे म्हणतात.

या समाजातील एखादया व्यक्तीची पत्नी अचानक मरण पावली तर पुरुष दुसरा विवाह प्रथम विवाहासारखाच मोठ्या धामधुमीत, थाटामाटात करू शकतो, परंतु लग्नानंतर नवरा मरण पावलेल्या स्त्रीस दुसरा विवाह 'समारंभ' म्हणून करता येत नाही, तर ज्याच्याशी पुनर्विवाह करायचा अशा पुरुषास गुरुद्वारात नेऊन ग्रंथसाहेबाच्या साक्षीने शपथ घ्यावी लागते. अशा पुनर्विवाहाला समाजमान्यता मिळते.

सातव्या दिवशी नामकरण

रमय्या समाजात कुटुंबात मुलगा जन्मणे हे मोठे भाग्याचे लक्षण मानले जाते. या समाजात मुलगा जन्माला आला तर बाळंतिणीचा सव्वा महिन्याचा विटाळ फक्त पाच दिवस मानला जातो. पाच दिवसांनंतर बाळ–बाळंतिणीला अंगणात आणले जाते, त्याला 'बहारी' असे म्हणतात. 'बहारी' हा कुटुंबातील अत्यंत खुषीचा दिवस मानला जातो. या दिवशी अंगणात मंडप घातला जातो, बँड ताफा बोलावला जातो, आणि स्पीकर लावून मुलगा झाल्याचा आनंद साजरा केला जातो. त्या रात्री धार्मिक विधी केला जातो, नाच-गाणी केली जातात, आणि सातव्या

दिवशी मुलाचे नाव ठेवले जाते.

मात्र जर कुटुंबात मुलगी जन्माला आली तर बाळ-बाळंतिणीला सातवे दिवशी अंगणात आणले जाते, त्या दिवशी मुलीचा फक्त नामसंस्कार विधी केला जातो आणि शेजाऱ्यांना बोलावून ऐपतीप्रमाणे जेवण दिले जाते. या दिवसाला किंवा प्रसंगाला या समाजात 'छूतक' असे म्हणतात.

रमण्या समाजातील मैत ही खर्चाची बाब मानली जात असे. परंतु गेल्या काही वर्षापासून प्रत्येकाला आपल्या कुवतीनुसार खर्च करण्यास समाजाने मान्यता दिलेली आहे. या समाजातील व्यक्ती मृत झाल्यास बँड–वाजंत्री लावून प्रेत स्मशानात नेले जाते, तिथे शीख धर्माच्या परंपरेनुसार संस्कार केले जातात, प्रेताचे दहन केले जाते तेराव्या दिवशी, तेरावा पाळला जातो, आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार तीन किंवा वीस गावांना जेवण द्यावे लागते. असे जेवण दिल्यानंतरच मृतात्म्यास शांती मिळते असा समज आहे.

असा हा स्वतःच्या पारंपरिक व्यवहारात रमणारा आणि गावोगावी सतत भटकणारा समाज. त्याच्या पिढीजात भटक्या व्यवसायामुळे आणि भटकंतीमुळे किंवा विशिष्ट स्वभावामुळे मिळालेल्या 'रमण्या' या नावात आजही वेगळी प्रतिष्ठा मानतो आहे, आणि भटकेपणात वेगळा आनंद आहे असे अभिमानाने सांगतो आहे. कारण स्वतःचं घरदार आणि कुटुंब एका ठिकाणी स्थिर ठेवून तो एकलेपणाने भटकतो आहे. म्हणूनच महाराष्ट्रातल्या पिढीजात भटक्या विमुक्त समाजाचं आणि केवळ धंद्यासाठी भटकणाऱ्या रमण्याचं नातं एक असू शकत नाही स्थिर जीवनाचा वाटेकरी असलेला असा हा शीख धर्मीय, हिंदी भाषिक रमण्या व्यवसायापुरताच भटका समाज आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही.

२४. कठपुतळीवाला भाट

भर दुपारची वेळ. हमरस्त्याच्या कडेला पादचारी पथावर माणसांचा घोळका जमलेला, रस्त्यावरून जाणारे येणारे त्या घोळक्यात दाटीवाटीने घुसतात. मीही त्यांच्याबरोबर घुसण्याचा प्रयत्न करतो... घोळक्यामध्ये एक चाळीशीचा इसम बाहुल्यांना हाताच्या बोटात अडकविलेल्या तंतूच्या दोराच्या सहाय्याने जमिनीवर नाचवत असतो. रंगीबेरंगी पोशाख केलेल्या आणि दागदागिन्यांनी मढविलेल्या त्या दोन बाहुल्या बोटाच्या हालचालीबरहुकुम डोलू लागतात. तिथेच त्या इसमाच्या शेजारी राजस्थानी पेहरावातील प्रौढ महिला ढोलकं वाजवून कथा सांगत असते– एक होता राजा, एक होती राणी...

काही वेळात कथा संपते, खेळही संपतो, घोळक्यातली काही माणसे पाच-दहा पैशाची नाणी जमिनीवर फेकून निघून जातात. तो इसम जाणाऱ्यांच्या दिशेने काहीशा तिरसट नजरेने पहात, जमिनीवर पडलेली नाणी वेचतो आणि पुटपुटतो- 'साला, रंडीभी इससे जादा पैसा कमाती है!'

मी त्याच्या जवळ जातो. तो बोलत रहातो... साब–कलजूगने कलाकारको भिकारी बना दिया.

पोटासाठी कला

मला त्याची वेदना कळालेली असते. त्याचा मूड पाहून मी तिथेच बैठक मारतो, तो सांगत असतो. 'आम्ही मूळचे राजस्थानातले कठपुतळीवाले भाट. पूर्वीच्या काळी राजे महाराजांच्या दरबारी आमचे पूर्वज कलावंत म्हणून राजांचे आश्रित होते. राजे लोक कलेचे चहाते होते, कलावंताची कदर करणारे होते. अकबर बादशहाच्या दरबारात अशाच बाहुल्यांचा खेळ करून बादशहाला आमचे लोक खुश करीत असत. आमच्या कलेवर खुश होऊन त्या काळी राजे लोकांनी आम्हाला जहागिऱ्या दिल्या. वतनी जमिनी दिल्या. पुढे राजे गेले आणि शेठ सावकारांनी आमच्या जहागिऱ्या हिसकावल्या, राजस्थानातल्या जाट रजपुतांनी आमच्या जमिनी लाटल्या...आम्हाला राजस्थान सोडावे लागले–आम्ही महाराष्ट्रात आलो. पिढीजात चालत आलेला बाहुलीचा खेळ दाखवून लोकांचे मनोरंजन करीत आम्ही उपजीविका करीत राहिलो. यातूनच पोटासाठी भटकंती वाट्याला आली, आज

इथं उद्या तिथं असा जगण्याचा प्रवास सुरू झाला. बाहुलीचा खेळ करणारे म्हणून कठपुतळीवाले या नावाने लोक आम्हाला ओळखू लागले. 'कलेनं पोटाला जगवलं आणि पोटाने कला जिवंत ठेवली' एवढंच समाधान!

बाहुलीला देवपण

मूळचा राजस्थानातील भाट समाज कलावंत समाज म्हणून ओळखला जातो. भैभाट, बारोट, कवि भाट, चरण भाट, शाहिरी भाट, आणि कठपुतळीवाले भाट अशा विविध नावाने हे भाट लोक ओळखले जातात, त्यांची मातृभाषा मारवाडी, पण ते खेळाच्या वेळी सर्रास हिंदी बोलताना आढळतात. राजस्थानात त्यांना 'भट-काळ' असे म्हणतात.

कठपुतळीवाले हे खास बाहुल्यांचा खेळ करूनच आपली उपजीविका करतात. तो त्यांचा पिढीजात व्यवसाय आहे. बाहुल्यांच्या खेळात महिलांचा सहभाग महत्त्वाचा असतो. बाहुल्या पुरुषाने नाचवावयाच्या तर त्याच्या पत्नीने ढोलकं वाजवून साथ करायची, कथा सांगायची.

या समाजात बाहुलीला अत्यंत पवित्र स्थान असते. हे लोक स्वतःच सागाच्या किंवा आंब्याच्या लाकडापासून बाहुल्या तयार करतात, त्यांना रंगवतात, त्यांना कपडे शिवतात, साज चढवितात. लग्न कार्यात किंवा सणासुदीला बाहुलीची पूजा करतात, त्यांचे कार्यक्रम दाखवतात. बकरं कापून त्याचा नैवेद्य बाहुलीला दाखवतात. कठपुतळी ही घरातील माऊली (मावली) मानली जाते. सात बाहुल्या सात 'मावलाया' म्हणून मानल्या जातात, त्यांना विशिष्ट लाकडी पेटीत ठेवले जाते. शक्यतो बाहुलीला विटाळ होऊ नये म्हणून काळजी घेतली जाते, सात मावलाया ठेवलेल्या पेटीला बाईचा स्पर्श झाला किंवा तिचा पदर पेटीवर पडला तर पाप घडते किंवा एखादी व्यक्ती चुकून त्या पेटीवर बसली तर तिचे तोंड किंवा हात-पाय वाकडे होतात अशी समजूत या समाजात आहे. वर्षातून दोनदा अमावस्या आणि पौर्णिमेला 'मावलायां'ची पूजा केली जाते. त्यांना दही भाताचा प्रसाद दिला जातो. धंद्यात बरकत येऊ दे सुख मिळू दे, असा नवस केला जातो.

पोटासाठी सतत भटकंती करणारे हे लोक, समाजाची बंधने अतिशय काटेकोरपणे पाळतात. आंतरजातीय विवाह यांना मान्य नाही. 'जातीचं ओझं जातीचं जातीनं घ्यायचं' अशी यांची रीत. त्यामुळे चुकून एखाद्या स्त्रीने किंवा पुरुषाने परजातीशी संबंध ठेवले तर त्या व्यक्तीस समाजातून बहिष्कृत केले जाते, त्याला १०१ रुपयांपर्यंत दंड केला जातो.

लग्न कार्य, मैत, उत्सव किंवा छोटया मोठया समारंभात पंचायतीला प्रमुख स्थान आणि मान आहे. पंचायतीचे निर्णय अंतिम मानले जातात.

विचित्र प्रथा–पद्धती

महाराष्ट्रातील बहुतेक भटक्या जमातींमध्ये हिंदु, मुसलमान, शीख धर्मांचे

रिवाज, किंवा श्रद्धा एकत्रित पाळल्या जातात, कठपुतळीवाले भाट त्याला अपवाद नाहींत. भाटलोक घरात मूल जन्माला आल्यानंतर 'अल्लाच्या' नावाने पिंड बनवतात, त्याला ते 'चुरमा' म्हणतात. सव्वा किलोचा गूळ–भाकरीचा मलिदा करून अल्लाच्या नावाने प्रसाद म्हणून समाजात वाटला जातो. तोच 'चुरमा.'

मूल सहा महिन्याचे झाले की त्याचे जावळ काढून त्याच्या गळ्यात 'उलटा भैरव' (कुलदैवत) बांधला जातो. गुळाचा बोकड करून त्यापुढे कापला जातो.

विशेषत: हिंदु धर्मातील काही उच्चवर्णीय समाजात मुलांची मुंज करतेवेळी कणकीची गाय करून कापण्याची प्रथा रूढ होती. तशीच भाट समाजात लहान बाळाचे जावळ काढतेवेळी गुळाचा बोकड करून कापण्याची प्रथा आहे. जोपर्यंत गुळाचा बोकड कापला जात नाही तोपर्यंत बाळाच्या आईने कसलेही मांस खायचे नाही असा संकेत आहे.

याशिवाय आणखी एक विचित्र प्रथा भाट समाजात आढळते. लहान बाळाला भूत पिशाच्चाची बाधा होऊ नये म्हणून उलटचा भैरवापुढे जिवंत बोकड कापायचा आणि बोकडाच्या (आतड्यातून) पोटातील त्या बाळास सात वेळा इकडून तिकडे बाहेर ओढायचे. नंतर त्या बोकडाची कातडी विकून त्यातून मिळणाऱ्या पैशातून 'उलटचा भैरवाच्या' मुद्रेची, पण ताईतासारखी दिसणारी पेटी त्या बाळाच्या गळ्यात बांधायची.

महागडे मरण

पोटासाठी वणवण फिरणारा आणि रस्त्यावर बाहुलीचा खेळ करून पैसा जमविणारा हा भाट समाज आयुष्यभर उपास करीत जगेल, मात्र मेल्यावर हजारो रुपये वर्षश्राद्धासाठी खर्च करेल. त्याला ते 'मोसर' करणे असे म्हणतात.

भाट समाजातील मरण अतिशय महागडे समजले जाते. एका व्यक्तीच्या मृत्यूला किमान पंधरावीस हजार रुपये खर्च केले जातात. मृत व्यक्तीच्या 'मोसरचे' वेळी शे–पाचशे लोकांना निमंत्रित केले जाते, आणि त्या प्रत्येकाला मैतीच्या घरातील लोकांनी दहा किलो गहू, पाच किलो तांदूळ, अडीच किलो साखर–एक किलो तूप, इतके जिन्नस एकावेळी द्यावे लागतात, तरच मृतात्म्यास शांती मिळते असे समजले जाते. ही प्रथा आजही या समाजात पाळली जाते.

यातला गंमतीचा भाग असा की या समाजातील काही मंडळी जिवंत असतानाच स्वत: वर्षश्राद्ध (मोसर) घालतात. त्याचे कारण असे की, मेल्यानंतर आपले नातेवाईक वर्षश्राद्ध घालतीलच यावर त्यांचा विश्वास नसतो. त्यामुळे उगाचच आपला मृतात्मा अतृप्त राहू नये अशी या मागची कल्पना आहे.

इतर भटक्या विमुक्त समाजाप्रमाणे भाट समाजातही कुळांची प्रतिष्ठा मानली जाते. समाजातील कुळांची उच्चनीचता आजही पाळली जाते. त्यात प्रामुख्याने भाट, कावा, जागा, कालेट, धोकरवाल, पडपड, धनावत, भांड, घाडसी, रेमनका

या नावांची काही प्रमुख कुळे आहेत. प्रत्येक कुळाची समाजातील प्रतिष्ठा वेगळी आहे. मात्र सर्वजण पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या बाहुली नाट्याच्या (कठ–पुतळी) कलेवरच उपजीविका करीत आहेत.

कलेची उपेक्षा

स्वातंत्र्योत्तर काळात करमणुकीची वेगवेगळी साधने निर्माण झाली. कलेकडे आणि कलावंताकडे पाहण्याची दृष्टी बदलली. कला म्हणजे वेळापव्यय एवढं सरळ सोपं समीकरण आधुनिक काळात रूढ झालं. त्यामुळे पिढ्यान्‌पिढ्या छोट्या मोठ्या कलेवर उपजीविका करणाऱ्या महाराष्ट्रातील भटक्या कलावंतांची उपेक्षा झाली. कोल्हाटी, डोंबारी, माकडवाले, दरवेशी, गारुडी, नंदीबैलवाले, कठपुतळीवाले, अशा कितीतरी भटक्या कलावंतांना पारंपरिक कलेच्या आधारे जगणं अवघड झाले. त्यामुळे त्यांना बदलत्या काळानुरूप स्वतःच्या जगण्याची साधने बदलावी लागली आहेत.

बाहुल्यांचा खेळ करून कसेबसे जगणारा कठपुतळीवाला अलिकडे लाकडी घोडे आणि कापडाचे हत्ती करून घरोघर विकताना दिसतो.

कठपुतळी किंवा बाहुलीनाट्य ही कला प्राचीन समजली जाते. इतर कलांची ती जननी समजली जाते. कठपुतळीच्या खेळातून नाट्यकलेचा उगम झाल्याचे सांगितले जाते असा हा बाहुलीनाट्याचा (कठपुतळीचा) आकर्षक आणि मोहक करमणूकप्रधान, परंतु हस्तकौशल्य प्रकार शासनाच्या लक्षात आल्याने १९६८ साली कला विभागात बाहुलीनाट्याचाही समावेश करण्यात आला. १९७१ पासून पुणे शहरात शिक्षणशास्त्र संस्थेत बाहुलीनाट्याचा समावेश करून प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या शिक्षकांना कठपुतळीचे शिक्षण देण्यासाठी या समाजातील श्री. बाबुलाल कल्याणजी भाट यांची सहाय्यक बाहुली नाटककार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. दृक्‌श्रवण शिक्षण संस्था, सांग अँड ड्रामा या कलाविभागातूनही बाहुली नाट्याचा समावेश करून भाट समाजातील या कलावंतांना ही कला इतरांना शिकवण्यासाठी वरील संस्थेत घेतलेले आहे.

महाराष्ट्रातील इतर भटक्या कलावंतांना जर शासनाने आणि समाजाने समजून घेतले तर समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर गेलेला हा भटका समाज किमान कलेच्या माध्यमातून समाजप्रवाहाच्या काठावर तरी येऊ शकेल असे वाटते.

❋

२५. शबरी भिल्ल

भिल्ल हा आदिवासी समाज म्हणून ओळखला जातो. त्यांना वनवासी असेही म्हटले जाते. या लोकांचे वास्तव्य मुख्यतः डोंगराळ भागात जंगल प्रदेशात असून प्राण्यांची शिकार करणे आणि झाडपाल्यांची जंगली औषधी वनस्पती गोळा करणे हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. जंगली प्राण्यांचं मांस आणि कंदमुळे हे यांचं प्रमुख अन्न आहे.

नागरी संस्कृतीपासून दूर असलेला परंतु जंगलात आपलं स्वतंत्र अस्तित्व जपणारा असा हा अत्यंत मागासलेला समाज आहे. मध्यप्रदेश, ओरिसा, आंध्र या प्रांतांच्या सीमेवरील घनदाट जंगल भागात यांची प्रामुख्याने वस्ती आढळते. पिढ्यान् पिढ्या जंगलातच वास्तव्य असल्याने यांचा हिंस्त्र श्वापदांशी रोजचा संबंध येतो. त्यामुळे हे लोक अत्यंत चपळ आणि शिकार करण्यात तरबेज असतात. प्राण्यांपासून संरक्षण करण्यास आणि प्राण्यांची शिकार करण्यास तीरकमठा हे यांचं प्रमुख शिकारीचे साधन आहे. जंगली प्राण्यांची शिकार करायची, त्याचं मांस भाजायचं किंवा कच्चं खायचं, मोहाची दारू भरपूर प्यायची आणि रात्री जंगल जागवत बेहोश होऊन नाचायचं–गायचं हा यांचा दिनक्रम.

जंगलाचा सततचा संबंध असल्याने जंगलातील औषधी वनस्पतींचे ज्ञान या लोकांना असते. गेल्या काही वर्षात, स्वतःच्या उपजीविकेसाठी औषधी वनस्पती घेऊन हे लोक गावोगावी आणि शहरात भटकू लागले आहेत. जंगलातील झाडांच्या झावळ्या किंवा मोठमोठी पानं लज्जा रक्षणासाठी गुंडाळणारा आणि काखेत तीरकमठा घेऊन प्राण्यांच्या शिकारीसाठी जंगलात भटकणारा भिल्ल आता पांढरी शुभ्र धोती, कमरेला मोरपिसांचा विणलेला सुंदर पट्टा, डोक्यावर विशिष्ट पद्धतीने बांधलेली रंगीत तल्ला (पगडी), पगडीत खोवलेलं मोरपीस, गळ्यात वेगवेगळ्या रंगीत मण्यांच्या माळा, कानात रामजीका कुंडल आणि कपाळाला दंतेश्वरी मातेचे गंध अशा पेहरावात भटकताना दिसतो. खेड्यापाड्यातले लोक यांना रामलोक म्हणून ओळखतात.

भिल्लांच्या अनेक पोटजाती किंवा तत्सम जाती आहेत. नागा भिल्ल, फोला भिल्ल, मुरिया भिल्ल, मारिया भिल्ल, कोरकु भिल्ल, संताल भिल्ल, तवडी भिल्ल, कुमार, राजगौड, गुरा, मुंडा, खादीयाल, नितगोंड अशी त्यांची नावे आहेत. शबरी

भिल्ल ही त्यापैकीच एक प्रमुख भिल्ल जात मानली गेली आहे.

जडीबुटीचा व्यवसाय

स्वातंत्र्योत्तर काळात जंगले सरकारच्या ताब्यात गेली. जंगलतोड कायद्याने थांबली. प्राण्यांची हत्या करणे कायद्याने गुन्हा ठरला, त्यामुळे भिल्ल समाजाला उपजीविकेचे साधन म्हणून, जंगली औषधी वनस्पती विकून पोट भरण्याचा व्यवसाय स्वीकारावा लागला. आणि अशी औषधी वनस्पती विकण्याच्या निमित्ताने हे लोक गावोगावी भटकू लागले, महाराष्ट्रात आले.

रामायणातील रामाच्या वनवासाचा संदर्भ देऊन, रामाला ज्या शबरीने बोरे खायला दिली ती शबरी या भिल्ल जमातीची पूर्वज मानली जाते, हे लोक स्वत:ची ओळख 'शबरी भिल्ल' अशी करून देतात असे एकाने सांगितले.

भिल्ल समाजात गोत्रांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. कच्छवा, बिर्ला, ठूपनो, थिग्गा, लकडा, मच्छा, कच्छा आणि थिरो या नावांची प्रमुख गोत्रे मानली गेली आहेत. या गोत्रांत आपापसात रोटीबेटी व्यवहार होतात, मात्र एकाच गोत्रात बेटी व्यवहार केले जात नाहीत.

शबरी भिल्ल हे लोक मुख्यत: आंध्र प्रदेशातून व्यवसायाच्या निमित्ताने महाराष्ट्रात आलेले आहेत. त्यांची मातृभाषा तेलगू असून आंध्रामध्ये एस. सी. म्हणून हे लोक ओळखले जातात. आंध्रप्रदेशात या लोकांना काही शासकीय सवलती मिळतात असे सांगण्यात आले.

भिल्ल समाजातील वैशिष्ट्य सांगताना या समाजातील शिक्षित तरुण रामचंद्र नरकुटी (भिल्ल) याने सांगितले की, या समाजात प्रत्येक कुटुंबात एक अनुभवी वैद्य आहे. हा वैद्य वेगवेगळ्या जंगली वनस्पतींचा औषध म्हणून सतत प्रयोग करीत असतो. हत्तीरोग, पंडूरोग अशा रोगांवर इलाज करण्यासाठी तो सतत प्रयोग मग्न असतो. झाडपाल्याचे लेप तयार करणे, वस्त्रगाळ पावडर तयार करणे, किंवा झाडपाल्याच्या छोट्या छोट्या गोळ्या करणे यातच त्याचा बराच वेळ जात असतो. भिल्ल वैद्याची झोपडी किंवा पाल म्हणजे त्याची छोटी औषधी प्रयोगशाळाच असते. कोणत्याही व्यक्तीला औषध देण्यापूर्वी तो प्रथम स्वत:वर त्या औषधाचा प्रयोग करतो असे सांगण्यात आले.

जात पंचायतीचे महत्त्व

इतर भटक्या विमुक्त समाजाप्रमाणे भिल्ल समाजातही जात पंचायत ही सामाजिक संस्था आहे, जात पंचायतीचे प्रमुख पद हे परंपरेने विशिष्ट गोत्रात देण्यात आलेले आहे. जात पंचायतीच्या प्रमुखास 'मुखिया' या नावाने ओळखले जाते. मुखियाचा निर्णय हा अंतिम मानला जातो. जातीअंतर्गत भांडण तंटा, विवाह या प्रसंगी मुखियाला महत्त्व असते. जमातीची परंपरा मोडणाऱ्या व्यक्तीस अत्यंत

कडक शिक्षा करण्याची प्रथा या समाजात आहे. विशेषतः भिल्ल समाजातील एखाद्या व्यक्तीनें समाजातील स्त्रीच्या मनाविरुद्ध तिच्याशी अनैतिक संबंध ठेवला, किंवा जाती बाहेरच्या स्त्रीशी संबंध ठेवला तर अशा व्यक्तीस पंचायतीचा मुखिया झाडाला टांगण्याची शिक्षा देतो, जमातीतील लोक त्याला फांदीला टांगतात, आणि खाली जमिनीवर टोकदार काटे अंथरून ठेवतात. चुकून ती व्यक्ती फांदीवरून निसटली तर सरळ टोकदार काटचावर पडेल अशी व्यवस्था केलेली असते. त्यामुळे भितीपोटी समाजातील लोक असे गुन्हे करण्यास धजावत नाहीत, असे सांगण्यात आले.

शबरी भिल्ल समाजातील विवाह पद्धत ही त्यांना रुचेल अशी आणि त्यांच्या नेमबाजीच्या पराक्रमावर आधारित आहे. एखाद्या भिल्ल तरुणाचा विवाह करावयाचा असेल तर त्याच्या पसंतीची मुलगी निवडली जाते. जात पंचायतीची मिटिंग बसते, जमातीची मंडळी एखाद्या नियोजित ठिकाणी एकत्र जमतात, नंतर पंचायतीचा प्रमुख तोंडाने फुर्रर्र असा आवाज काढतो. तो आवाज ज्या अंतरापर्यंत ऐकू येईल तिथपर्यंत नियोजित वधूने डोक्यावर माठ घेऊन चालत जायचे, आणि आवाज ऐकू येणार नाही अशा अंतरावर जाऊन थांबायचे. तिथे तिने डोक्यावर घेतलेल्या माठावर एक लिंबू किंवा कोणतेही फळ ठेवले जाते. ज्या तरुणाने लग्नासाठी त्या मुलीची निवड केलेली असते, त्याने हातात तीरकमठा घेऊन जात पंचायतीच्या मिटिंगमधे उभे राहायचे आणि, त्या मुलीच्या डोक्यावर ठेवलेल्या माठावरील फळ तीरकमठ्याने अचूक टिपायचे. जर त्याने ते फळ अचूक टिपले तरच ती मुलगी त्याच्याशी विवाहाला तयार होते, अन्यथा त्याचा नेम चुकला तर ती मुलगी त्याच्याशी विवाह करीत नाही.

अशा प्रकारे जो तरुण नेमबाजीत पारंगत असेल अशाच तरुणाशी मुलीचा विवाह पक्का केला जातो. त्या रात्री, मोहाची दारू पिऊन सर्वजण नाचगाणी करतात. अशा वेळी, विवाह जमलेल्या त्या तरुण तरुणीने नाचता नाचता, तिथून जंगलात निघून जायचे आणि तीन दिवसानंतर पुन्हा आपल्या घरी यायचे असा रिवाज आहे. याचे कारण विचारता त्यांच्यातील एकाने असे सांगितले की, एकमेकांना जाणून घेण्यासाठी असे गुपचूप जंगलात जायचे असते. जंगल संस्कृतीशी एकजीव झालेला हा समाज, हळूहळू बदलतो आहे. इतर लोकांच्या सान्निध्यात किंवा व्यवसायाच्या निमित्त लोकांच्या सहवासात येत असल्याने, त्यांच्यात बदल होत आहे. शिवरात्र, रामनवमी, दसरा, होळी हे यांचे काही प्रमुख सण आहेत. शिवरात्र हा सर्वात मोठा सण मानला जातो. हे लोक शिव पार्वतीचे भक्त असल्याने नऊ दिवस ते शिवाचा उपवास करतात. या नऊ दिवसात शिव पार्वतीच्या विवाहाचा प्रमुख कार्यक्रम असतो. शिव पार्वतीच्या लग्न वेळी समाजात दोन भाग पाडले जातात. एक गट फक्त मुली असणारांचा असतो. तो पार्वतीच्या बाजूने लग्नात उभा असतो, तर दुसरा गट, ज्यांना मुलगे आहेत आशांचा असतो. मुलगेवाली मंडळी शिवाच्या बाजूची वऱ्हाडी मंडळी म्हणून लग्नाला उपस्थित असतात. लग्न


वेळी, शिव पार्वतीच्या मूर्ती मंदिरात आणतात. समाजातील बाल ब्रह्मचारी व्यक्ती मंगलाष्टके म्हणते. शेवटी सर्वजण तांदुळाच्या अक्षता, शिव–पार्वतीच्या मूर्तीवर टाकतात. त्यावेळी डमरू, मृदुग डपू आणि इरनाल या नावाची वाद्ये जोरजोराने वाजवली जातात. अशा प्रकारे शिव पार्वतीचा लग्न सोहळा पार पाडला जातो.

श्रद्धाळू समाज

शबरी भिल्ल हे लोक श्रद्धाळू आहेत. शिव-पार्वती आणि राम यांचे शिवाय दंत्तेश्वरी माता ही या समाजाची मुख्य देवता मानली जाते. वर्षातून एकदा या देवतेचा उत्सव हे लोक मोठ्या प्रमाणात साजरा करतात. देवीला नवस करणे, उपास तापास करणे, देवीला प्राण्यांचा वळी देणे किंवा देवी अंगात येणे, असे प्रकार या समाजात आढळतात. दंत्तेश्वरी माता अंगात येण्याच्या प्रकाराला ते 'शिगम' असे म्हणतात.

भिल्ल समाजात, दारूला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. लग्न असो, धार्मिक कार्यक्रम असो की देवतांचा उत्सव असो, दारूशिवाय काहीही केले जात नाही. दारूला हे लोक 'सोमरस' म्हणतात. सोमरस पिऊन रात्रभर नाचगाणी करणे हा यांचा आवडता छंद आहे. बहुजन समाजाप्रमाणे, स्त्री-पुरुष संबंधाविषयी संकुचित आणि बंदिस्त प्रथा भिल्ल समाजात नाहीत. प्रत्येकाच्या आवडीवर, इच्छेवर असे संबंध अवलंबून आहेत. रात्री सोमरस पिऊन नाचगाणी म्हणत असताना, आवडणाऱ्या मुलीला, तिच्या सम्मतीने एखादा तरुण जंगलात घेऊन जाऊ शकतो. त्यांच्या जाण्याला कोणीही आडकाठी करीत नाही. पती किंवा पत्नी निवडण्याचे स्वातंत्र्य ज्याला त्याला मुक्तपणे दिलेलं आहे. असे करणे या समाजात पाप मानले जात नाही. या प्रकाराला ते 'घोटूल' असे म्हणतात.

असा हा आदिवासी किंवा वनवासी म्हणून ओळखला जाणारा समाज निसर्गाची कूस सोडून हळूहळू, पोट भरण्याच्या निमित्ताने, चाकोरीबद्ध अशा नागरी संस्कृतीमध्ये मिसळू पाहत आहेत. तो त्याचे जंगलाचे रिवाज विसरून जात आहे, स्थिर समाजाचे जीवन जगण्याचा तो प्रयत्न करीत आहे. पण, त्याच्या वाटचाला आलेली पोटार्थी भटकंती त्याला एके ठिकाणी स्थिर होऊ देत नाही. वनस्पती औषधी विकण्याच्या निमित्ताने, आज इथं तर उद्या तिथं असा त्याचा अस्थिर प्रवास चालू आहे. शिक्षण नाही, कायमची जागा नाही, सरकारी सवलतींचा फायदा नाही. कुठे तरी उघड्या माळरानावर एखादं पाल ठोकायचं, वर आकाश खाली धरती या आधारानं झोपायचं. आणि उजाडताच दिवसभराच्या वनस्पती औषधाची बोचकी खांद्याला अडकवून रस्त्याला लागायचं. आपलं पोट भलं की आपला धंदा भला इतकंच जगणं आज तरी त्यांच्या वाटचाला आलेलं आहे. हे सगळं पाहून असं वाटतं– वनवासातून आलेली ही भिल्ल माणसं इथे अज्ञातवासात तर जगत नाहीत ना ?



परिशिष्टे

परिशिष्ट १

भटक्या विमुक्त जाती–जमातींची यादी

महाराष्ट्र शासन समाज कल्याण सांस्कृतीक क्रीडा व पर्यटन विभाग परिपत्रक क्र. सी. बी. सी. १६८४ जोप ५९२ १९९९ वी. सी. डब्ल्यू. ५, मंत्रालय मुंबई, १९ फ्रेब्रु. १९८६.

विमुक्त जाती

जाती	तत्सम जाती
१) बेरड	नाईकवाडी, तलवार, वाल्मिकी
२) बेस्तर	संचलु, वड्डार
३) भामटा	भामटी, गिरणी, कामाटी, पाथरुट, टकारी, उचले
४) कैकाडी	धोंतले, कोरवा, माकडवाले किंवा कींचो कोरवा, पायलोट, कोरवी.
५) कंजारभाट	छारा, कंजार, नाट.
६) कटाबु	
७) बंजारा	गोर बंजारा, लंबाडा, लंबाटा, लभाणी, चारण बंजारा, लमान, बंजारा, लमाण, लमाणी, लबान, धाडी, ढालीया, सिगारी, नावी, बंजारा, जोगी बंजारा, बंजारी.
८) वगळले	पालपारधी.
९) राजपारधी	गावपारधी, हिरण शिकारी
१०) राजपूतभामटा	परसुशी भामटा, परदेशी भामटा.
११) रामोशी	
१२) वडार	गाडी वड्डार, जाती वडार, माती वडार, पाथरवट
१३) वाघरी	सलाट, सलाट वाघटी.
१४) छप्परबंद	

भटक्या जमाती

जाती	जमाती (उप किंवा पोटजाती)
१) गोसावी	बावा, बैरागी, भारती, गिरी गोसावी, भारती गोसावी सरस्वती पर्वत, सागर, बान किंवा वान, तीर्थ आश्रम. रण्य धरभारी, संन्याशी, नाथपंथी गोसावी.
२) बेलदार	ओड
३) भराडी	अ) बाळ संतोषी ब) किंगरीवाले क) नाथबाबा ड) नाथजोगी इ) नाथपंथी डवरी गोसावी
४) भुते	भोपे
५) वगळले	
६) चित्रकथी	
७) गारुडी	
८) घिसाडी	घिसाडी लोहेार किंवा गाडी लोहार किंवा चित्तोडी लोहार, रजपूत लोहार
९) गोल्ला	गोल्लेवार, गोलेर, गोलकर
१०) गोंधळी	
११) गोपाल	अ) गोपाल भोरपी ब) खेळकरी
१२) हेळवे	हिलव
१३) जोशी	अ) बुडबुकी ब) डमरुवाले क) कुडमुडे ड) मेढंगी इ) सरोदे फ) सहदेव जोशी ग) सरवदे ह) सरोदा
१४) काशीकापडी	
१५) कोल्हाटी	डोंबारी
१६) मैराळ	अ) दांगट ब) वीर
१७) मसणजोगी	१) सुदगडसिद्ध २) मसाणजोगी
१८) नंदीवाले	तिरमल
१९) पांगूळ	
२०) रावळ	राऊळ किंवा रावळपयोगी
२१) सिक्कलगर	कटारी
२२) ठाकर (रत्नागिरी जिल्हा)	
२३) वैदू	वगळण्यात आले
२४) वासुदेव	
२५) भोई	झिंगा भोई, परदेशी भोई, राजभोई, भोई, मल्हार गोडिया कहार, धुरिया कहार, किराब, मछुआ, मांझी

जातिया, केवट, ढीवर, धीवर, धीमर, पालेवार, मछेंद्र, नावाडी, मल्हार, माल्हव, भोई, गाढवभोई, खाडी भोई, खारे भाई, ढेवरा.

२६) बहुरुपी
२७) ठेलारी
२८) ओतारी — अ) ओतनकर, ब) ओतकर, क) वतारी ड) ओझारी

परिशिष्ट २

मुस्लिम धर्मीयांतील जाती आणि जमाती

१) मदारी
२) छप्परबंद
३) दरवेशी
४) रीचवाला
५) बदिया
६) हकीम
७) कलंदर
८) सपेरेनाथ
९) फकीर
१०) सिक्कलगार
११) नालबंद
१२) खाटीक
१३) पिराली
१४) ठाकराई
१५) दर्जी
१६) जोलाटा
१७) रंगरेज
१८) बारी
१९) भाटियारा
२०) चीख
२१) चूडीहार
२२) दाई
२३) धावा
२४) धुनिया
२५) गढी
२६) कलाल
२७) कसाई
२८) कुला कुंजरा
२९) लहेरी
३०) महिफरोश
३१) मल्लाह
३२) नलिया
३३) निकारी
३४) आब्दल
३५) बाको
३६) बेदिया
३७) भट
३८) चंभा
३९) दफाली
४०) धोबी
४१) हजाम
४२) मोची
४३) नागरची
४४) नंट

४५) पनवरिया
४६) मदारिया
४७) तुंतिया,
४८) भानर
४९) हलालखोर
५०) हिजरा
५१) कसबी
५२) लालबेगी
५३) मोगता
५४) मेहतर

वरील प्रत्येक जाती-जमातींची स्वतंत्र जातपंचायत आहे.

परिशिष्ट ३

भटक्या-विमुक्त जमाती आणि त्यांची दैवते

विमुक्त जमाती	दैवते
१) कैकाडी	मशाम्मा, खंडोबा, उरम्मा, कुरकुंभची देवी, काळूबाई, मरिमाता, जलदेवी, शेडी देवूर अम्मा, फिरस्ती अम्मा, देव्हार कुलर अम्मा.
२) कुंची कोरवा	मरिमाता, यल्लम्मा, मारुती, दुर्गामाता.
३) कंजारभाट	महाकाली, खोडियारमाता, जीनमाता, हनुमान, शंकर, जगदंबा, दुर्गादेवी,
४) पारधी	अंबाबाई, भवानी माता,
५) रजपूत भामटा	दुर्गामाता, तुळजा भवानी
६) लमाण	अंबाबाई, मरिआई, मारुती, तिरुपती, बालाजी, गुरुनानक,
७) रामोशी	खंडोबा, काळूबाई, नाथबाबा
८) माती वडार	नाथसाहेब, लक्ष्मीआई, म्हसोबा, कान्होबा, खंडोबा,
९) गाडी वडार	व्यंकटेश्वर, खंडोबा, कान्होबा, म्हसोबा, सकलादी बाबा, सैलानी बाबा,
१०) वेडू वाघरी	अंबाजी, कालिका, अंबेमाता, फोरका माता, खोडियार माता, मेलडी माता, बेचराजी माता,
११) छप्परबंद	अल्ला, पीर,
१२) घ्यारे (कंजर)	कानिफनाथ, माता टुकराणी.
१३) मांग गारुडी	खंडोबा, वाघुर आई, सवास्नी, भवानी आई, मन्हारी,

भटक्या जमाती	दैवते
१) गोसावी	धारदेवी, राजामोगल देवी, सात देवी, अंबिका, लक्ष्मी,

	सितला देवी, (नवनाथ कुळीनुसार दैवते)
२) लवंगी गोसावी	मरिआई, खंडोबा लक्ष्मीआई, अंबाबाई, पीर,
३) नाथपंथी डवरी गोसावी	काळा भैरवनाथ, (गुरुगादी–सोनारी, परांडा)
४) वेलदार	भवानी माता, कानिफनाथ, खंडोबा,
५) घिसाडी	ज्योतिबा, अंबाबाई, लक्ष्मी आई, भैरोबा खंडोबा.
६) गाडी लोहार	एकलिंगजी/शंकर
७) भराडी गोंधळी	चतुश्रृंगी, मानकेश्वरची सटवाई, औंधचाम्हसोबा, तुळजापूरची भवांनी, तिरुपती, बालाजी,
८) गोपाळ	खंडोबा, सखलादी बाबा, पीर, ज्योतिबा,
९) कुडमुडे जोशी	पीर, पैगंबर, मरिआई, (हिंदू व मुस्लिम दोन्ही धर्माचे रिवाज पाळतात, ताबूत बसवतात, मोहरम मध्ये उपवास करतात, पंजे बसवतात)
१०) मेढंगी	कान्होबा, भैरोबा, मारुती, मुंजाबा, खंडेराया, मरिआई
११) काशीकापडी	कंदळवार (धार्मिकगुरु, दैवत), तिरुपती बालाजी, तुळजापूरची भवानी
१२) कोल्हाटी	खंडोबा, भैरोबा, कान्होबा, तुळजापूरची देवी.
१३) डोंबारी	कान्होबा, मरिआई
१४) ढवळा नंदीवाला	महाकाली, म्हसोबा, नाथ, बाबा धावजी बाबा, मौनीनाथ शंकर, अंबाभवानी, दुर्गामाता, बालाजी,
१५) रावळ	शंकर-नवनाथांचे अवतार
१६) सिक्कलगार	सितलादेवी, माता मसानी, (गुरु गोविंद सिंह, गुरु नानक, धार्मिक गुरु, दैवत)
१७) वैदू	शंकर हनुमान, फिरस्तीमाता म्हैसाम देवी, फिलोर स्वामी,
१८) परदेशी भोई	दुर्गादेवी महाकाली,
१९) बहुरूपी	शंकर, खंडोबा,
२०) ओतारी	महालक्ष्मी, शिव, पार्वती,
२१) रमय्या	(शीखधर्मीय) गुरुनानक (धर्मगुरु)
२२) मारवाडी भाटी	खोडियार माता, जय सामुंडा, महाकाली, जयभवानी, जगत की जोगनी, महावीर, काला भैरव, गोरा भैरव,
२३) मदारी	अल्ला, पीर, कानिफनाथ
२४) दरवेशी	अल्ला, पीर, कानिफनाथ
२५) सपेरेनाथ	कृष्ण, गंगा, बजरंग, बाबा, सितला माता, काली माता, चंडकी माता, नरदमाता, भैरू महाराज,
२६) मरिआईवाला	मरिआई, लक्ष्मीआई, तुळजापूरची भवानी, काळूबाई,

	खंडोबा, मानकेश्वरची आई.
२७) रायरंद	लक्ष्मीआई,
२८) वाघ्या मुरळी	खंडोबा,
२९) राजगौंड	(आदिवासी) मरिआई (इतर हिंदू देवदेवता)
३०) शबरी भिल्ल	(आदिवासी) दंतेश्वरीमाता, शंकर.
३१) कठपुतलीवाला	चावंड (कुलदैवत-जोतपूर)
३२) स्मशान जोगी	महाभैरव, चामुंडा,

परिशिष्ट ४

भटक्या-विमुक्तांचे सण

१) नागपंचमी	८) पितृपंधरवडा,
२) महा शिवरात्री,	९) महादेवाची जत्रा,
३) दसरा	१०) रंगपंचमी,
४) नवरात्र उत्सव,	११) चैत्र मास
५) आषाढी,	१२) चंपाषष्ठी
६) खंडोबाची जत्रा,	१३) देवदेवतांचे उत्सव.
७) कान्होबाची जत्रा,	१४) रमजान (ईद)

परिशिष्ट ५

भटक्या-विमुक्तांची जातपंचायतीची बैठकींची गावे

१) मढी (अहमदनगर)	८) अन्नाड
२) माळेगाव	९) रजापूर
३) जेजुरी,	१०) अडूळ
४) सोनारी	११) लासूरे
५) बार्शी,	१२) बारामती
६) आळंदी,	१३) चाळीसगाव,
७) चिखली	१४) पाथर्डी (अहमदनगर)

१५) नारायणगाव
१६) शिगोळा
१७) कुंभारी
१८) बीड
१९) खर्डा,
२०) देऊळगाव राजा (बुलढाणा)
२१) परंडा,
२२) करमाळा

परिशिष्ट ६

भटक्या–विमुक्त जमातींची व्यवसायाप्रमाणे वर्गवारी

(उपजीविकेची साधने)

१) देवभक्त जमाती : गोंधळी, वाघ्ये-मुरळी, रावळ, आराधी जोगती, जोगे, मरीआईवाला, भोपे, गोसावी

२) पशुपालक जमाती : गोपाळ, दांगट, मैराळ, गोल्ला, डवरी गोसावी, नंदीबैलवाला; दरवेशी, रायरंद,

३) कलावंत जमाती : कोल्हाटी, मदारी, सापगारुडी, चित्रकथी, बहुरूपी, रायरंद, कठपुतलीवाला, मारवाडी भाटी, डोंबारी


४) भविष्य सांगणाऱ्या जमाती : मेढंगी, तिरमाळी, कुडमुडे जोशी, ठोके जोशी, वासुदेव, मनकवडे, डमरूवाले जोशी, सरोदे,

५) शिकार करणाऱ्या जमाती : पारधी, भिल्लपारधी, फासेपारधी, चित्तरपारधी, वैदू, भिल्ल (आदिवासी)


६) व्यवसाय करणाऱ्या जमाती : सिक्कलगार, कैकाडी, वडारी, कुंची कोरवा, वाघरी, घ्यारे, कंजर बेलदार, घिसाडी, काशी कापडी, ओतारी, रमण्या, वैदू, गाडी लोहार, राजगोंड (आदिवासी)

७) मागत्या जमाती : गोसावी, बैरागी, वैदू, स्मशान जोगी, मरिआईवाला,

८) शारीरिक कष्ट करणाऱ्या जमाती : वडारी, लमाण, बेलदार, गाडीवडार, मातीवडार,




REFBK-0025893



रामनाथ चव्हाण यांनी, मोठ्या हौसेने आणि उमेदीने 'आज इथं तर उद्या तिथं' अशी भटकंती करणारांशी जवळीक साधून त्यांच्या हाती जे येऊ शकलं ते इथं मांडलं आहे...

समाजशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या लोकांना, संशोधकांना अगर विचारवंतांना या विविध प्रकारच्या भटक्या जमातींतील चालीरीती पुष्कळ काही सहज सांगून जातात. म्हणून या लेखांचा बारकाईने विचार करीत असताना काही प्रसंग असे लक्षात येतात की तिथं आपली अक्कल एकदम थंडावून जाते...

या पुस्तकातील अशी समाजरचनेतील जगावेगळी वाटणारी कितीतरी उदाहरणं इथं देता येतील. पण प्रत्यक्षात सगळं वाचण्यात जी मजा आहे, तिच्यापासून वंचित होण्यापेक्षा इथंच थांबलेलं बरं...

मी वाचकांना विनंती करीन की मुळातूनच हे सगळं पुस्तक त्यांनी वाचावं म्हणजे जग काय आहे, कसं आहे, त्यातला बारकावा त्यांच्या लक्षात येईल. समाजसुधारकाच्या संदर्भात काम करणाऱ्यांना हे पुस्तक पुष्कळच काही सांगून जाईल असं मी म्हणेन...

